नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष १६ * अंक ३१५ * * भंडारा * सोमवार, दिनांक १२ मे २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## पंजाबमध्ये दोन पाकिस्तानी हेरांना अटक

■ वृत्तसंस्था, मालेरकोटला, दि. ११ :
पंजाबच्या मालेरकोटला पोलिसांनी भारतीय सैन्याशी संबंधित गोपनीय माहिती पाकिस्तानला पाठवणाऱ्या दोघांना अटक केली आहे. ही माहिती दिल्लीतील पाक उच्चायुक्तालयात (राजनयिक दूतावास) तैनात असलेल्या एका पाकिस्तानी अधिकाऱ्याला पाठवली जात होती. या आरोपींना ऑनलाइन पेमेंट मिळत होते. ते पैशाच्या बदल्यात भारतीय सैन्याच्या कारवायांची माहिती पाकिस्तानला पाठवत असे. पोलिसांना ठोस माहिती मिळाल्यावर, प्रथम एका व्यक्तीला पकडण्यात आले, ज्याने चौकशीदरम्यान दुसऱ्या व्यक्तीचे नाव सांगितले आणि त्यालाही अटक करण्यात आली. त्यांच्याकडून दोन मोबाईल फोन जप्त करण्यात आले आहेत आणि गुन्हा (एफआयआर) दाखल करण्यात आला.

अग्राग्रलेख

खरीखरी..

## अखेर युद्ध विराम

पाकिस्तान वरील शनीची वक्रदृष्टी काल अखेर स्थगित झालेली दिसते. कालच सायंकाळी पाच वाजता शस्त्र संधीची घोषणा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केली. पाकिस्तानने शिमला करार मोडीत काढल्यानंतर हे शक्य होते. शिमला करारात दोन्ही देशातील लढाई, समस्या किंवा प्रश्न केवळ भारत आणि पाकिस्तान यांनी चर्चा करून सोडवायचे होते. पण भारताने सिंधू करार बासनात गुंडाळला आणि त्याचबरोबर पाकिस्तानने शिमला कराराची बोळवण केली. म्हणजेच हे दोन्ही करार दोन्ही देश पाळणार की नाही. यावर चर्चा सोमवारी होणार आहे. भारताने यापुढे आतंकवादी हल्ला झाला. तर युद्ध म्हणून गणला जाईल असे सांगितले आहे. याशिवाय फक्त पाकिस्तान कडून फोन आला. भारताने तो मान्य केला आणि अमेरिकेने त्याचे श्रेय घेतले. या शस्त्र संधीच्या घटनेची गंमत अशी आहे की, एवढे होऊनही रात्रीच पाकिस्तानने आपली 'फितरत' दाखवली. आणखी दोन-तीन दिवस ही आस्मानी लढाई चालली असती. तर पाकिस्तानला आणि पाकिस्तानच्या सेनेला लहान सहान कारवाया आणि छिठपुट गोष्टी करण्याशिवाय दुसरे काहीच करता आले नसते. भारताची संरक्षण यंत्रणा जबरदस्त होती. आपण पुराणात वाचतो किंवा सिरीयल मध्ये पाहतो. त्याप्रमाणे आधुनिक शस्त्रांची क्षमता किती प्रभावशाली ठरते ते भारताने दाखवून दिले. एका झटक्यात आपण पीओके मधील पाच आणि पाकिस्तानातील चार दहशतवाद्यांचे अड्डे उध्वस्त केलेले होते. भारताने केवळ दहशतवाद्यांचे नऊ अड्डे उध्वस्त केले आणि शंभर दहशतवादी मारले. हे पाकला मान्यच नाही? सर्व प्रकारची सिद्धता करून पाकिस्तानला पाचव्यांदा ठेचण्यासाठी भारत सज्ज होता. पाकिस्तानला इतर राष्ट्रांच्या मदतीशिवाय काहीच करता येणे शक्य नव्हते. जागतिक बँकेने पाकिस्तानला तात्काळ मोठे कर्ज दिले. हे कर्ज अमेरिकेच्या होकाराशिवाय अजिबात मिळाले नसते. आता भारताची 'ऑपरेशन सिंदूर' मोहीम पूर्णत्वास गेली. असे म्हटले तर अजूनही पाकिस्तानात आतंकवाद्यांचे बारा अड्डे जसेच्या तसे कायमच आहेत. दहशतवाद्यांचे हे सर्व अड्डे पाकिस्तानातील राजकीय नेत्यांनाही पोसावे लागतात. पण त्यांचे खरे पालक म्हणजे पाकिस्तानचे लष्करच असते. यावेळी झालेल्या सैन्य कारवाईच्या वेळी भारतामधील काँग्रेससह तमाम विरोधी पक्षांनी सरकारला बिनशर्त आणि एकमुखी पाठिंबा जाहीर केला होता. हे महत्त्वाचे आहे. भारतीय जनमानसाला पहलगाम येथील अमानुष हत्याकांडाचा बदला घेतला जाणे गरजेचेच वाटत होते. अपेक्षे प्रमाणे तुर्की आणि चीन यांच्याशिवाय कोणीही उघडपणे पाकिस्तानची बाजू घेतली नाही. ही कारवाई होत असताना अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री दोन्ही देशाच्या संपर्कात होते, असे म्हणतात. जर हे खरे असेल तर यापुढील द्विपक्षीय निर्णय आता अमेरिकेच्या दबावाखाली होणार आहे काय, हा प्रश्नही विचारला गेला पाहिजे. आता त्यापेक्षाही महत्त्वाचा प्रश्न आहे तो काश्मीरचा. काश्मीरचा हजार वर्षांचा प्रश्न सोडवण्याचा इरादा ट्रम्प जाहीर करतात. पाकव्याप्त काश्मीरचा प्रश्न इतक्या लवकर सुटेल असे अजिबात वाटत नाही. ऑक्टोबर १९४८ मध्ये पाकिस्तानने काश्मीर बळकवण्याकरता केलेली सैन्य कारवाई जवळजवळ १४ महिने चालवली होती. त्यावेळी संयुक्त भारताची सैनिक संख्या पाच लक्ष होती. त्यापैकी दोन लक्ष २० हजार सैनिक पाक जवळ होते. विशेष म्हणजे ते सर्व काश्मीर साठी लढायला सज्ज होते. भारताच्या दोन लक्ष ८० हजार सैनिकांपैकी एक लक्ष सैनिक जुनागढ, हैदराबाद यासारख्या संस्थानांच्या अंतर्गत कारवायांमध्ये विभागले गेलेले होते. त्यामुळे १४ महिन्यांनंतरही भारताला पाकिस्तानने बळकावलेला भूभाग मिळवता आला नव्हता. म्हणून तो प्रश्न युनेस्कोकडे नेण्यात आला होता. आता जोपर्यंत दोन्ही देश ही गोष्ट मान्य करीत नाहीत. तोपर्यंत या प्रश्नाचे एवढे कंगोरे आहेत की, तो प्रश्न निव्वळ चर्चेद्वारे खरोखर सुटू शकत नाही. पाकिस्तानच्या लष्कराला तो प्रश्न कायमच धगधगता ठेवणे गरजेचे वाटते. तरीही उतावळ्या ट्रम्प यांना हा प्रश्न सोडवण्यासाठी मध्यस्थी करावी असे वाटते. त्याला एकदा पाकिस्तान मान्यता जाईल. पण भारत मान्यता देणार नाही. हे तुम्ही लिहून ठेवा. कालचा युद्ध विराम तात्पुरता न ठरो आणि पाकिस्तानच्या अविश्वसनीयतेचा नमुना पुन्हा न दिसो. एवढीच अपेक्षा आहे.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# पाकने युद्धबंदी तोडल्यास प्रत्युत्तर देऊ

### ऑपरेशन सिंदूरमध्ये शत्रूचे ४० सैनिक-अधिकारी मारले; १०० हून जास्त दहशतवादी ठार : सैन्याची माहिती

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ११ :
भारत आणि पाकिस्तानमधील युद्धबंदीच्या २५ तासांनंतर, तिन्ही सैन्यांनी रविवारी पत्रकार परिषद घेतली. यामध्ये, लष्करी ऑपरेशन्सचे महासंचालक (डीजीएमओ) लेफ्टनंट जनरल राजीव घई, व्हाइस ॲडमिरल एएन प्रमोद आणि एअर मार्शल अवधेश कुमार भारती यांनी ऑपरेशन सिंदूरबद्दल माहिती दिली.




लेफ्टनंट जनरल राजीव घई म्हणाले - पहलगाम हल्ल्यात २६ लोक किती क्रूरतेने मारले गेले हे तुम्हा सर्वांना माहिती आहे. यानंतर, भारतीय सैन्याने पाकिस्तान आणि पीओकेमधील दहशतवादी तळांना लक्ष्य केले. यामध्ये शत्रूंचे मोठे नुकसान झाले. घई म्हणाले की, ऑपरेशन सिंदूर अंतर्गत ७ मे रोजी केलेल्या कारवाईत आम्ही सीमेपलीकडे ९ ठिकाणी १०० दहशतवाद्यांना ठार मारले. यामध्ये कंधार अपहरण आणि पुलवामा हल्ल्यात सहभागी असलेले ३ मोठे दहशतवादी चेहरे देखील होते.

७ मे रोजी झालेल्या कारवाईनंतर, पाकिस्तानने आपल्या सीमावर्ती राज्यांमध्ये असलेल्या लष्करी तळांवर ड्रोन आणि क्षेपणास्त्रांनी हल्ला करण्याचा प्रयत्न केला. आम्ही त्यांना हवेत हाणून पाडले. एकाही लक्ष्याला यश मिळू दिले नाही.

यानंतर, आम्ही पाकिस्तानला प्रत्युत्तर म्हणून कठोर कारवाई केली, ज्यामध्ये पाकिस्तानी सैन्याचे ३५ ते ४० सैनिक आणि अधिकारी मारले गेले. सीमा आणि नियंत्रण रेषेवर पाकिस्तानी सैन्याने केलेल्या गोळीबारात आपले पाच जवान शहीद झाले आहेत. लष्कराने म्हटले आहे की, पाकिस्तानी लष्कर आणि हवाई दलाने आपल्या सीमेत घुसखोरी केली नाही. आपण निवडलेल्या लक्ष्यावर नियोजित नुकसान पोहोचवले. आमचे काम लक्ष्य हिट करणे आहे, किती लोक मारले गेले हे पाहणे नाही.

## ऑपरेशन सिंदूर संपले नाही : पंतप्रधान




■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ११ :
भारत आणि पाकिस्तानच्या राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार आणि परराष्ट्र मंत्र्यांमध्ये कोणताही संवाद झाला नसल्याचे वृत्त एएनआय या वृत्तसंस्थेने सूत्रांच्या हवाल्याने दिले आहे. ही चर्चा फक्त दोन्ही देशांच्या आर्मी ऑपरेशन्स महासंचालकांमध्ये (डीजीएमओ) झाली. ऑपरेशन सिंदूर अजून संपलेले नाही, असा दावाही अहवालात करण्यात आला आहे. जर पाकिस्तानने काही केले तर त्याचे उत्तर आणखी विनाशकारी आणि कठोर असेल, असे पंतप्रधान मोदी म्हणाले होते.

जर तिथून गोळी झाडली तर आपण इथून गोळे झाडू. युद्धबंदीच्या घोषणेनंतर पाकिस्तानने २६ ठिकाणी हल्ले केले. भारतानेही त्यांच्या तळांवर हल्ला करून याला जोरदार प्रत्युत्तर दिले. मोदी म्हणाले काश्मीरबाबत आमची भूमिका अगदी स्पष्ट आहे, आता फक्त एकच मुद्दा उरला आहे- पाकव्याप्त काश्मीर (पीओके) परत करणे. याशिवाय बोलण्यासारखे काही नाही. जर ते दहशतवाद्यांना सोपवण्याबद्दल बोलत असतील तर आपण बोलू शकतो. माझा इतर कोणत्याही विषयावर बोलण्याचा हेतू नाही. आम्हाला कोणाचीही मध्यस्थी नको आहे. आम्हाला कोणाच्याही मध्यस्थीची गरज नाही.

## युद्धबंदीवर इमानदार राहू पंतप्रधान शाहबाज

■ वृत्तसंस्था, इस्लामाबाद, दि. ११ :



पाकिस्तानने आश्वासन दिले आहे की ते लढाई थांबवण्याच्या निर्णयाचे प्रामाणिकपणे पालन करेल. परराष्ट्र मंत्रालयाने ट्विटरवर पोस्ट करत म्हटले आहे की, युद्धबंदीनंतरही भारतीय सैनिक काही भागात हल्ले करत आहेत. असे असूनही, पाकिस्तानी सैनिक जबाबदारीने आणि संयमाने परिस्थिती हाताळत आहेत. दरम्यान, पंतप्रधान शाहबाज शरीफ यांनी पुन्हा एकदा डोनाल्ड ट्रम्प यांचे कौतुक केले आहे. त्यांनी इंस्टाग्रामवरील एका पोस्टमध्ये लिहिले आहे की, पाकिस्तानला राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्या रूपात एक उत्कृष्ट भागीदार मिळाला आहे, जो दोन्ही देशांमधील पूर्वीसारखे मजबूत आणि विशेष संबंध पुन्हा स्थापित करू शकतो. हे केवळ व्यापार आणि गुंतवणुकीतच नव्हे तर इतर क्षेत्रातही संबंध मजबूत करू शकते. याआधीही पंतप्रधान शाहबाज यांनी ट्रम्प यांचे कौतुक केले होते. शनिवारी एका टीव्ही भाषणात त्यांनी भारत आणि पाकिस्तानमध्ये युद्धबंदी आणल्याबद्दल त्यांचे कौतुक केले.

## राजस्थान-पंजाब, जम्म काश्मिरात परिस्थिती सामान्य

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ११ :
रविवारी सकाळी सीमेला लागून असलेल्या राजस्थान, पंजाब, जम्मू आणि काश्मीरमधील परिस्थिती सामान्य दिसून आली. बाजारपेठा उघडत आहेत, व्यवहार सामान्य होत आहेत. दरम्यान, भारतीय हवाई दलाने सांगितले की, आम्ही ऑपरेशन सिंदूरचे उद्दिष्ट साध्य केले आहे. हे ऑपरेशन अजूनही चालू आहे. वेळ आल्यावर आम्ही तुम्हाला माहिती देऊ. अफवा टाळण्याचे आवाहन हवाई दलाने केले आहे. पहलगाम हल्ल्याच्या दिवशी, २२ एप्रिलपासून ते १० मे पर्यंत, पाकिस्तानी गोळीबारात ६ सैनिक शहीद झाले आहेत, तर ६० जण जखमी झाले आहेत. याशिवाय २५ जणांचा मृत्यू झाला आहे आणि ५० हून अधिक जण जखमी झाले आहेत. दुसरीकडे, युद्धजन्य परिस्थिती लक्षात घेता, राजस्थानमध्ये रद्द केलेल्या १६ आणि अंशतः रद्द केलेल्या ११ रेल्वे गाड्या पूर्ववत करण्यात आल्या आहेत. रविवारी जयपूर विमानतळावरून चंदीगडला जाणारी दोन उड्डाणे रद्द करण्यात आली.

### रावळपिंडीपर्यंत ब्राह्मोसचा आवाज गेला, ते आपल्या सैन्याच्या ताकदीचे प्रतीक : राजनाथ सिंह

## लखनऊमध्ये ब्रह्मोस क्षेपणास्त्र युनिटचे उद्घाटन

■ वृत्तसंस्था, लखनौ, दि. ११ :
संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी लखनऊमध्ये ब्रह्मोस क्षेपणास्त्र युनिटचे ऑनलाइन उद्घाटन केले. यावेळी त्यांनी पाकिस्तानला इशारा देत म्हटले की, आता दहशतवादी सीमेपलीकडेही सुरक्षित नाहीत. आम्ही हे जगाला दाखवून दिले आहे. यावेळी आवाज रावळपिंडीपर्यंत ऐकू गेला.



ते म्हणाले- भारतीय सैन्याने आपले शौर्य दाखवले आहे. आम्ही कधीही त्यांच्या नागरिकांना लक्ष्य केले नाही. भारतीय सैन्याने शौर्य आणि धैर्यासोबत संयम दाखवला. भारतविरोधी आणि दहशतवादी संघटनांनी भारतमातेच्या शिरपेचावर हल्ला केला. अनेक कुटुंबांमधून सिंदूर पुसले गेले. ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून लष्कराने न्याय मिळवून देण्याचे काम केले आहे. हे ऑपरेशन भारताच्या प्रबळ इच्छाशक्तीचे प्रदर्शन आहे. आजचा दिवस खूप खास आहे. आज राष्ट्रीय तंत्रज्ञान दिन आहे. १९९८ मध्ये आजच्याच दिवशी पोखरणमध्ये अणुचाचणी करण्यात आली. हा दिवस शास्त्रज्ञ आणि अभियंत्यांच्या कठोर परिश्रमाचा सन्मान करण्याचा दिवस आहे. मला चांगलं आठवतंय जेव्हा मी म्हटलं होतं की तुम्ही ते लवकरात लवकर पूर्ण करा. तुम्ही ते ४० महिन्यांत पूर्ण केले.

आज आपल्या सभोवतालच्या परिस्थितीचा विचार करता हे आवश्यक आहे. यामागे मुख्यमंत्री योगी यांचे मोठे योगदान आहे. तुम्ही लोक दिवसरात्र कष्ट केले. तुमच्या मेहनतीचे मी कौतुक करतो. जेव्हा आमच्या सरकारने उत्तर प्रदेशात संरक्षण कॉरिडॉरच्या दिशेने वाटचाल केली, तेव्हा उत्तर प्रदेशला एक मोठे उत्पादन केंद्र म्हणून विकसित करणे हे देखील एक उद्दिष्ट होते.

कानपूर हे उत्पादनासाठी प्रसिद्ध होते. पण, नंतर तो मागे पडला. मी त्या कारणांमध्ये जाणार नाही. जर कानपूरने विकासाच्या त्या उंची गाठल्या तर ते पश्चिमेचे कानपूर म्हणून ओळखले जाईल. आता संरक्षण कॉरिडॉरमध्ये अधिक उपकरणे तयार केली जातील. यामध्ये मोठी गुंतवणूक करण्यात आली आहे. खाजगी आणि सार्वजनिक दोन्ही क्षेत्रांचा सहभाग दिसून येतो. लखनौमध्ये पीटीसी द्वारे टायटॅनियम सुपरप्लांट उभारण्याची चर्चा आहे. ब्रह्मोस हे जगातील सर्वात वेगवान सुपरसॉनिक क्षेपणास्त्र आहे. हे फक्त एक क्षेपणास्त्र नाही तर एक संदेश आहे.

## महाराष्ट्र आणि मध्य प्रदेशमध्ये करार

### विदर्भ व उत्तर महाराष्ट्राचा पाणी प्रश्न मिटणार

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ११ :
महाराष्ट्र आणि मध्यप्रदेश या दोन राज्यांमध्ये मोठा करार झाला आहे. तापी मेगा रिचार्ज प्रकल्पासाठी एका महत्त्वपूर्ण आणि ऐतिहासिक करार झाला आहे. सुमारे १९,२४४ कोटी रुपयांच्या या प्रकल्पामुळे विदर्भ आणि उत्तर महाराष्ट्रातील खारपणा पट्ट्यातील शेतकरी आणि नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे.

भोपाळ येथे महाराष्ट्र आणि मध्य प्रदेश आंतरराज्य नियंत्रण मंडळाची बैठक पार पडली. या बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री डॉ. मोहन यादव यांच्यासह दोन्ही राज्यांचे जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, तुलसीराम सिलावट, कुंवर विजय शाह आणि दोन्ही राज्यांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत माहिती देताना सांगितले की, भोपाल, मध्य प्रदेश येथे मुख्यमंत्री डॉ. मोहन यादव यांच्या उपस्थितीत "संयुक्त सिंचन आणि जलविद्युत प्रकल्पांसाठी महाराष्ट्र - मध्य प्रदेश अंतरराज्यीय नियंत्रण




मंडळाची २८ वी बैठक" पार पडली. या बैठकीत मी सहभागी झालो होतो. बैठकीनंतर तापी बेसिन मेगा रिचार्ज प्रकल्पा संदर्भात महाराष्ट्र आणि मध्य प्रदेश सरकार यांच्यात सुमारे १९,२४४ कोटींच्या ऐतिहासिक सामंजस्य करारावर संयुक्तपणे स्वाक्षऱ्या करण्यात आल्या.

पुढे बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, या प्रकल्पामुळे महाराष्ट्र आणि मध्य प्रदेश सरकारांना मोठा लाभ होणार आहे. अंदाजे मध्य प्रदेशातील १,२३,०८२ हेक्टर आणि महाराष्ट्रातील २,३४,७०६ हेक्टर जमीन सिंचनाखाली येणार आहे. तसेच अकोला, बुलढाणा आणि अमरावतीसह विदर्भ आणि उत्तर महाराष्ट्रातील खारट पाण्याच्या भागांना विशेष लाभ होणार आहे. या प्रकल्पामुळे त्या भागातील पिण्याच्या पाण्याची समस्या कायमची सुटणार आहे.

## राज्यात पुढील पाच दिवस पावसाचे

■ महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. ११ :
पुढील पाच दिवस कोकण, गोवा, मध्य महाराष्ट्र, मराठवाड्यात १३ व १४ मे रोजी तर विदर्भात ११ मे व १२ मे दरम्यान काही ठिकाणी तुरळक पाऊस पडण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. ११ ते १३ मे दरम्यान नाशिक, छत्रपती संभाजीनगर येथे तसेच ११ मे रोजी धुळे, नंदुरबार, पुणे, सातारा, जालना, बीड जिल्ह्यात तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह सोसाट्याचा वारा व विजांच्या कडकडाटासह ताशी ४० ते ५० किमी वाऱ्यासह हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवलेली आहे. तसेच यंदा मान्सून देखील ३ ते ६ जून दरम्यान महाराष्ट्रातील किनारपट्टी भागात धडकण्याची शक्यता वर्तवण्यात आली.

### अग्रवालच्या फार्महाऊसवरील ड्रग्जपार्टीवर छापा

## आक्षेपार्ह स्थितीत चार तरुणी

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर , दि. ११
नवीन कामठी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील आशा हॉस्पिटलच्या बाजुला असलेल्या एस. फार्म नावाच्या फार्महाऊसवर व्यापाऱ्यांची ड्रग्जपार्टीसह तरुणींच्या डान्सवर पैसे उडविणे सुरु असतानाच पोलिसांनी छापा घातला.

या छाप्यात चार तरुणी नको त्या अवस्थेत फार्महाऊसवर पार्टी करताना आढळल्या. पोलिसांनी चार पुरुष आणि चार तरुणींवर गुन्हा दाखल करुन आरोपींना ताब्यात घेतले. छाप्यात पोलिसांनी २६ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई शनिवारी मध्यरात्रीनंतर दोन वाजता करण्यात आली.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, सुनील शंकरलाल अग्रवाल (वय ६१, रा रामलक्ष्मी कॉलनी, कामठी) हे कामठी रोडवरील एस. फार्म नावाच्या फार्महाऊसवर पार्टी करण्यासाठी गेले होते. त्यांच्यासोबत अन्य व्यापारी मित्र गौतम सुशील जैन (वय ५१, रा रामदास पेठ, सीताबर्डी), निलेश बाबूलाल गडीया (वय ६१, रा कमल पॅलेस, रामदास पेठ, सीताबर्डी) आणि मितेश मनोहरलाल खक्कर (वय ५०, रा रामदास पेठ, सीताबर्डी) हे सुद्धा पार्टीसाठी उपस्थित होते. फार्महाऊसवर चार तरुणींनाही बोलाविण्यात आले होते. मध्यरात्रीनंतर डीजेच्या मोठ्या आवाजावर ड्रग्ज, हुक्का यासह पार्टीला सुरुवात झाली. चारही तरुणी झिंगलेल्या अवस्थेत नृत्य करीत होत्या. तर चारही आरोपी तरुणींसोबत नृत्य करण्यात व्यस्त होते. दरम्यान, या ड्रग्जपार्टीची माहिती पोलिसांना मिळाली. त्यामुळे गुन्हे शाखेचे युनिट क्रमांक चारचे पथक, अनैतिक मानवी वाहतूक विरोधी पथक, सामाजिक सुरक्षा पथक आणि स्थानिक पोलिसांनी फार्महाऊसवर छापा घातला.

अंमली पदार्थाच्या धुंदीत सुनील अग्रवाल, गौतम जैन, मितेश खक्कर आणि निलेश गडीया हे तरुणींसोबत नाचत होते. चारही तरुणी हुक्का हातात घेऊन नको त्या अवस्थेत आढळून आल्या. महिला पोलिसांनी चारही तरुणींना ताब्यात घेतले. तसेच अन्य चार पुरुष आरोपींना पोलिसांनी ताब्यात घेतले. तरुणींसह व्यापाऱ्यांना नवीन कामठी पोलीस ठाण्यात आणण्यात आले. त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला.

## पंतप्रधान नरेंद्र मोदींकडून देशासाठी शिवकार्य : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

■ महासागर प्रतिनिधी, सिंधुदुर्ग, दि. ११ :



मालवणच्या ऐतिहासिक राजकोट किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांच्या नव्याने उभारण्यात आलेल्या भव्य पुतळ्याचे लोकार्पण आज, ११ मे २०२५ करण्यात आले आहे. या भव्य सोहळ्यास राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय मंत्री नारायण राणे, तसेच राज्य मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले आणि नितेश राणे यांची उपस्थिती होते. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी माध्यमांशी संवाद साधला आहे.

एकनाथ शिंदे म्हणाले, राजकोट येथे छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य-दिव्य असा पुतळा उभारण्यात आला आहे. त्यांच्या प्रतिमेचे पूजन पार पडले आहे. हा पुतळा इथे येणाऱ्या प्रत्येकाला प्रेरणा देणारा असा हा पुतळा आहे. महाराष्ट्राचे स्वाभिमान आणि शौर्याचे प्रतीक म्हणून या पुतळ्याकडे पहिले जाईल.

पुढे बोलताना एकनाथ शिंदे म्हणाले, पूर्वी जो शिवाजी महाराजांचा पुतळा होता त्याचे लोकार्पण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झाले होते. त्यानंतर आता हा नव्याने जो पुतळा उभारण्यात आला आहे, आज मी म्हणेल की मोदीजी तिथे देशाची रक्षा करत आहेत, शिवकार्य करत आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांना अभिप्रेत काम करत आहेत आणि पाकिस्तानला सडेतोड उत्तर देत आहेत. आपले जे भारतीय सैन्य आहे त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहेत. त्यामुळे मी आदरणीय मोदीजींचे सुद्धा अभिनंदन करतो.

आजचा दिवस आमच्यासाठी आनंदाचा, अभिमानाचा आणि स्वाभिमानाचा आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा हा अश्वारूढ पुतळा शौर्याचे देदीप्यमान प्रतीक म्हणून उभा आहे. या पुतळ्याची दुर्घटना झाल्यानंतर, आम्ही तातडीने निर्णय घेतला की, हातात समशेर असलेला पुतळा पुन्हा त्याच ठिकाणी उभा करायचा, असे एकनाथ शिंदे म्हणाले.

मी शिल्पकार राम सुतार यांना त्वरित दूरध्वनी करून या पुतळ्याची माहिती दिली आणि त्यांना विक्रमी वेळेत हा पुतळा उभारण्याचे आवाहन केले. आज खऱ्या अर्थाने हा भव्य आणि दिव्य पुतळा उभा राहिला आहे. छत्रपती शिवरायांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या या भूमीवर, त्यांच्या या पुतळ्यामुळे प्रत्येकजण प्रेरणा आणि ऊर्जा घेतल्याशिवाय राहणार नाही.

## मनी लॉंड्रिंग प्रकरणात १८८ कोटी रुपयांची मालमत्ता जप्त

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ११ :
ज्ञानराधा मल्टिस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड (डीएमसीएसएल) शी संबंधित मनी लॉंड्रिंग प्रकरणात अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) १८८.४१ कोटी रुपयांची स्थावर आणि जंगम मालमत्ता तात्पुरती जप्त केली आहे.

सुरेश कुटे यांच्या नेतृत्वाखालील डीएमसीएसएल व्यवस्थापनाने ४ लाखांहून अधिक गुंतवणूकदारांची फसवणूक केल्याचे तपासात उघड झाले आहे आणि वैयक्तिक फायद्यासाठी कुटे ग्रुपच्या संस्थांना निधी वळवला आहे. ईडीच्या मुंबई विभागीय कार्यालयाने ९ मे २०२५ रोजी मेसर्स ज्ञानराधा मल्टिस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड (डीएमसीएसएल), सुरेश कुटे आणि इतरांच्या बाबतीत मनी लॉंडरिंग प्रतिबंधक कायदा (पीएमएलए), २००२ च्या तरतुदींनुसार तात्पुरत्या स्वरूपात १८८.४१ कोटी रुपयांच्या स्थावर आणि जंगम मालमत्तेवर तात्पुरती जप्ती केली आहे. सुरेश कुटे आणि इतरांनी मेसर्स ज्ञानराधा मल्टिस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड मार्फत गुंतवणूकदारांशी केलेल्या फसवणुकीच्या संदर्भात मे ते जुलै २०२४ दरम्यान महाराष्ट्रातील विविध पोलिस ठाण्यांमध्ये आयपीसी, १८६० आणि कलम एमपीआयडी कायदा, १९९७ च्या विविध कलमांखाली नोंदवलेल्या विविध एफआयआरच्या आधारे ईडीने चौकशी सुरू केली.

### राजकोटावर शिवाजी महाराजांचा दिमाखदार पुतळा

## मुख्यमंत्र्यांच्या हस्ते लोकार्पण

■ महासागर प्रतिनिधी, सिंधुदुर्ग, दि. ११ :
मालवणच्या ऐतिहासिक राजकोट किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांच्या नव्याने उभारण्यात आलेल्या भव्य पुतळ्याचे लोकार्पण आज, ११ मे २०२५ करण्यात आले आहे. या भव्य सोहळ्यास राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय मंत्री नारायण राणे, तसेच राज्य मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले आणि नितेश राणे यांची उपस्थिती होते.

यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, राजकोट येथे छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा त्याच स्वाभिमानाने आणि अधिक भव्यतेने उभारला आहे. मागच्या काळात ज्यावेळी दुर्दैवी घटना झाली होती, त्यावेळी आमच्या सरकारने निर्धार केला होता की विक्रमी वेळेत हा पुतळा या ठिकाणी आम्ही पुन्हा प्रस्थापित करू. आज त्याचे पूजन आम्ही केले आहे. मी सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभिनंदन करतो.



सार्वजनिक बांधकाम विभागाचे तत्कालीन मंत्री रवींद्र चव्हाण असतील किंवा आताचे मंत्री शिवेंद्र भोसले असतील यांनी अतिशय वेगाने हे काम केले आहे. त्यासोबत सुतार साहेब यांनी अतिशय उत्तम पुतळा तयार केला आहे. त्याच्यासोबत आयआयटीचे विद्यार्थी होते, जे जे स्कूल ऑफ आर्ट्सचे विद्यार्थी होते. इथे कोकणात वेगवेगळे वादळ येतात, त्या सगळ्या वादळांचा अभ्यास करून हा पुतळा राहू शकेल अशी रचना करण्यात आली आहे. जवळपास ९१ फूटांचा हा पुतळा आहे. ज्यात १० फूट पेडेस्ट्रॉल आहे.

देशातील महाराजांचा हा सर्वात उंच पुतळा म्हणून याकडे पाहता येईल. किमान शंभर वर्ष कुठल्याही प्रकारच्या वातावरणात हा पुतळा टिकेल. तसेच १० वर्ष देखभालीची जबाबदारी ज्यांनी पुतळा तयार केलेला आहे, त्यांच्याकडे देण्यात आली आहे. जी काही दुर्दैवी घटना मागे घडली होती, तेव्हा आम्ही निर्धार केला होता की कुठल्याही परिस्थितीत महाराजांना साजेसे स्मारक तयार करण्यात

## कामगार कर्मचारी धोरणाच्या विरोधात २० मे ला आयटकचा भव्य मोर्चा

**महासागर प्रतिनिधी**

**भंडारा , दि. ११ मे :** केंद्र व राज्य सरकारच्या कामगार कर्मचारी विरोधी व जन विरोधी धोरणांच्या विरोधात तसेच सर्वसामान्य जनतेला भेडसावणाऱ्या प्रश्नावर आयटक व केंद्रीय ट्रेड युनियनच्या देशव्यापी संपाच्या आवाहनानुसार दिनांक २० मे २०२५ ला भंडारा जिल्हा जिल्हाधिकारी कार्यालय व जिल्हा परिषदेवर भव्य मोर्चा काढण्यात येणार आहे.

दिनांक ११ मे २०२५ ला दुपारी १ वाजता राणा भवन भंडारा येथे आयटकच्या भंडारा जिल्हा कौन्सिल ची सभा कॉम्रेड माधवराव बांते यांच्या अध्यक्षतेखाली व भाकपचे राष्ट्रीय कौन्सिल सदस्य कॉम्रेड शिवकुमार गणवीर यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाली.

त्या सभेत वरील निणऱ्य घेण्यात आला. प्रस्तावना व संचालन तसेच मागील सभेचा आढावा आयटक चे भंडारा जिल्हा सचिव कॉम्रेड हिवराज उके यांनी सादर केले. सभेत विविध कामगार कर्मचारी संघटनेचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

त्यात प्रामुख्याने कॉम्रेड गजानन पाचे, गजानन लाडसे, जयप्रकाश मेहर, ताराचंद देशमुख, आशिष मेश्राम, कल्पना अत्तकर, स्मिंकल लोणारे, संतोष शेंडे, लक्ष्मी सकतेल, ज्ञानेश्वर वाघाये इत्यादींची उपस्थिती होती.

## राज्याच्या सीमावर्ती गावांमध्ये पाणीटंचाईचे संकट

### बावनथडी नदी पडली कोरडी जलस्तर खालावला, भाजीपाला शेती धोक्यात

**महासागर प्रतिनिधी**

**सिहोरा :** बावनथडी नदी पात्र कोरड्या झालेल्यामुळे महाराष्ट्र व मध्य प्रदेशाच्या सीमावर्ती गावांमध्ये भीषण पाणीटंचाईचे संकट ओढावले आहे. या संकटाचा सामना करत असलेल्या नागरिकांनी आता पाण्यासाठी आंदोलनाचा मार्ग निवडला आहे. मध्य प्रदेशातील मोवाड गावात गेल्या पंधरवड्यात नागरिकांनी भंडारा-बालाघाट राष्ट्रीय महामार्ग रोखून राजीव सागर धरणाचे पाणी बावनथडी नदीपात्रात सोडण्याची मागणी केली.

सध्या या आंदोलनाची धग महाराष्ट्रातील दुसऱ्या टोकावर पोहोचली असून, तिथले शेतकरी आणि नागरिक देखील आंदोलनाच्या तयारीत आहेत. एप्रिल महिन्याच्या कडक उन्हामुळे विहिरींचा जलस्तर खालावला असून, नदीपात्र पूर्णपणे कोरडे झाले आहे. यामुळे शेतकऱ्यांचे भाजीपाला उत्पादन धोक्यात आले असून, जनावरांनाही पाणी मिळवणे कठीण झाले आहे. राजीव सागर धरण हे महाराष्ट्र व मध्य प्रदेश शासनाच्या निधीतून बांधण्यात आले असून, याचे पाणी बावनथडी नदीत सोडण्याची मागणी राज्यांच्या सीमावर्ती गावांतून होत आहे. मात्र, अद्याप याबाबत ठोस पावले उचलण्यात आली नसल्यामुळे पाण्यासाठी संतप्त झालेल्या नागरिकांनी रस्त्यावर उतरावे लागले आहे. मोवाड येथील रास्ता रोको आंदोलन हे या संतापाचे पहिले रूप होते, परंतु आता महाराष्ट्रातील चुल्हाड, सिहोरा परिसरातही हे आंदोलन शिगेला पोहोचण्याची शक्यता आहे. नद्यांच्या काठावरील गावांमध्ये नळ योजनांची पंपगृहं असूनही पाण्याचा पुरवठा कोलमडलेला आहे. नदी पात्रात पाणी राहील या आशेवर शेतकऱ्यांनी भाजीपाला पिकांची लागवड केली होती, परंतु आता ही पिके सुकण्याच्या मार्गावर आहेत. जनावरांनाही पाण्यासाठी लांब अंतरावर न्यावे लागत आहे, तरीही समाधानकारक पाणी उपलब्ध होत नाही. सीमावर्ती गावांमध्ये शेतकऱ्यांकडे मोठ्या प्रमाणावर जनावरे आहेत. परंतु नदीपात्र कोरडे पडल्याने जनावरांना पाणी पाजण्यासाठी पशुपालकसह शेतकरी अक्षरशः हतबल झाले आहेत. पाणीटंचाईचा हा प्रश्न केवळ नागरिकांचा नाही, तर संपूर्ण कृषी व पशुधन व्यवस्थेच्या अस्तित्वाचा आहे.

***शासनाकडून तातडीची कारवाई हवी.....***

राजीव सागर धरणातील पाणी तत्काळ बावनथडी नदीच्या पात्रात सोडण्यात यावे, अशी जोरदार मागणी सीमावर्ती गावांतील नागरिक व शेतकरी करत आहेत. अन्यथा महाराष्ट्रात देखील आंदोलन उफाळण्याची शक्यता नाकारता येत नाही. एवढे मात्र खरे आहे.

***शेतकरी अडचणीत.....***

नद्यांच्या काठावरील गावांना पाणीपुरवठा करण्यासाठी नळ योजनांचे पंपगृह बांधकाम करण्यात आले आहे. नदीच्या शेजारी असणाऱ्या शेतकऱ्यांनी नदीच्या पात्रात पाणी राहत असल्याने भाजीपाला उत्पादन लागवड केली आहे.

परंतु, एप्रिल महिन्यात नद्यांचे पात्र कोरडे पडण्यास सुरुवात झाली आहे. यामुळे शेतकरी आणि नागरिक अडचणीत आले आहेत. नदीपात्रात पाणी राहत असल्याने सीमावर्ती गावातील दोन्ही टोकांवरील शेतकऱ्यांनी भाजीपाला उत्पादन घेण्यासाठी लागवड केली आहे.

# डॉ. परिणय फुके यांच्या नेतृत्वाखाली भंडाऱ्यात संघटनात्मक बळात मोठी वाढ



## उबाठा गटाचा भाजपामध्ये भव्य प्रवेश

**महासागर प्रतिनिधी**

**भंडारा , दि. ११ मे :** भंडारा जिल्ह्यात भारतीय जनता पक्षाच्या संघटनात्मक बांधणीस आज मोठे यश मिळाले. उबाठा गटाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि युवा नेते यांनी आज जाहीरपणे भाजपामध्ये प्रवेश केला.

आज बेला भंडारा येथील हॉटेल फ्लेव्हर येथे भाजपा भव्य प्रवेश कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला होता. हा प्रवेश डॉ. परिणय फुके यांच्या प्रभावी नेतृत्वात संपन्न झाला. त्यांच्या मार्गदर्शनामुळे भाजपात नव्याने सहभागी होणाऱ्यांमध्ये उत्साह आणि आत्मविश्वास दिसून आला.

या प्रवेश सोहळ्यामुळे पक्षाच्या तालुका व जिल्हा पातळीवरील संघटनात्मक बळात मोठी भर पडली आहे. पक्षाचे विचार, कार्यपद्धती आणि नेतृत्व - विशेषतः मा. देवेंद्र फडणवीस साहेबांचे पारदर्शक, विकासाभिमुख नेतृत्व व डॉ. परिणय फुके यांचे सक्रिय मार्गदर्शन यांवर दाखवलेला विश्वास नव्या कार्यकर्त्यांसाठी प्रेरणादायी ठरला.

भाजपने मागील काही वर्षांत ग्रामीण विकास, पायाभूत सुविधा, जलसंधारण, कृषी सुधारणा, महिला सक्षमीकरण व युवा संधी यांसारख्या विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य केले आहे. हेच कार्य समाजातील अनेक घटकांना भाजपाशी जोडण्यास कारणीभूत ठरत आहे.

या विशेष प्रसंगी भाजपाचे जिल्हा महामंत्री चैतुजी उमाळकर, जिल्हा परिषद सदस्य विनोदजी बांते, माजी उपसभापती प्रशांत खोब्रागडे, तसेच इतर अनेक मान्यवर कार्यकर्ते आणि स्थानिक पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

भाजप हा फक्त निवडणुकांसाठीचा पक्ष नसून जनतेशी सतत जोडलेला, सेवाभावी विचारांचा पक्ष आहे, हेच या प्रवेशाने अधोरेखित झाले.

या नव्या कार्यकर्त्यांच्या सहभागामुळे भाजपाचा विस्तार अधिक प्रभावी होणार आहे, असा विश्वास पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांनी व्यक्त केला.

## चुल्हाड पशु दवाखान्याची अवस्था दयनीय : पशुपालक त्रस्त

### जनावरांच्या लसीकरणाचा प्रश्न ऐरणीवर

**महासागर प्रतिनिधी**

**सिहोरा , दि. ११ मे :** चुल्हाड जिल्हा परिषद क्षेत्र अंतर्गत येणाऱ्या चुल्हाड आणि देवरी देव या दोन गावांसाठी मंजूर करण्यात आलेल्या चुल्हाड पशु दवाखान्याची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे.

पशुपालक आणि त्यांच्या जनावरांच्या आरोग्यासाठी कार्यरत असावा, असा हा दवाखाना प्रत्यक्षात फक्त कागदोपत्री सुरू आहे. ना इमारत आहे, ना पशुधन अधिकारी कार्यरत आहेत. त्यामुळे जनावराच्या लसीकरणाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

जिल्हा परिषद क्षेत्रातील चुल्हाड गावात जनावरांच्या लसीकरण आणि आरोग्य सेवेच्या उद्देशाने हा दवाखाना मंजूर करण्यात आला होता. परंतु, आज या दवाखान्याची फक्त आठवण उरली आहे. यापूर्वी या ठिकाणी डॉ. भैसारे यांच्यासारखे अधिकारी कार्यरत होते.

त्यांच्या बदलीनंतर मात्र हा दवाखाना पूर्णतः अकार्यक्षम झाला आहे. सुरुवातीला ग्रामपंचायतीच्या जुन्या इमारतीत सुरू असलेला दवाखाना इमारत कोसळल्यानंतर ग्रामपंचायतीच्या व्यापारी संकुलातील एका खोलीत हलविण्यात आला, परंतु तेथे फलकसुद्धा लावण्यात आलेला नाही. सध्या तालुक्यात ७ पशु दवाखाने मंजूर असले तरी त्यापैकी ६ ठिकाणी पशुधन अधिकाऱ्यांची पदे रिक्त आहेत. हरदोली गावात एकमेव अधिकारी कार्यरत असून उर्वरित ठिकाणी ही पदे भरली गेलेली नाहीत. जिल्हा प्रशासनाकडून अहवाल दिले गेले असले तरी राज्यस्तरीय निर्णय घेतला जात नाही, त्यामुळे परिस्थिती जसच्या तस राहिली आहे. शेकडो जनावरांच्या लसीकरणाचा प्रश्न आज ऐरणीवर आहे. लसीकरणाचे शिबिर या भागात आयोजितच होत नसल्याने पशुपालकांना खाजगी उपचारांचा पर्याय निवडावा लागत आहे, त्यासाठी पशुपालकांना अधिकचा आर्थिक खर्च सहन करावा लागत आहे.

जेव्हा शासनाने दवाखाना मंजूर केला आहे, तर त्याचा उपयोग का होत नाही ? असा प्रश्न पशुपालक स्थानिक जनप्रतिनिधींना विचारीत आहेत. प्रशासनाने पशु दवाखान्याच्या अस्तित्वाची आणि कार्यक्षमता तपासणी करून आवश्यक त्या उपाययोजना तत्काळ राबवाव्यात, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

## स्मारकभूमी आकर्षण केंद्र - साकोली शहरात अनेक ठिकाणी सुशोभीकरणाचे काम सुरू

**महासागर प्रतिनिधी**

**साकोली , दि. ११ मे :** हे शहर पूर्वीच्या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६ वर वसलेले आहे, ज्याला आता नव्याने ५३ व्या क्रमांकाचे नाव देण्यात आले आहे. हे शहर एकेकाळी ग्रामीण भागात वसलेले होते. पण आधुनिक काळात हे शहर बदलले आहे. राष्ट्रीय महामार्गावर उड्डाणपूल बांधल्यामुळे या शहराचे नागरीकरण आणखी वाढले. शहराला नगरपरिषदेचा दर्जा मिळाल्यानंतर नागरीकरण झपाट्याने होऊ लागले आहे.

किमान गेल्या १० वर्षांतील शहराचा आढावा घेतला, तर ते इष्टतम आहे असे म्हणता येणार नाही, परंतु किमान ते 'सुंदर आणि ध्यानी' आहे असे म्हणता येईल. ग्रामीण भागाच्या दृष्टिकोनातून साकोलीतील विविध ठिकाणचे सुशोभीकरण सुरू झाले आहे. नागरिकांचे लक्ष वेधून घेणाऱ्या साकोलीतील ठिकाणांमध्ये आता तहसील स्मारक भूमीचा समावेश झाला आहे. सद्य:स्थितीत तहसील मेमोरियल भूमी राष्ट्रीय महामार्गावरून वाहतूक प्रतिबंधित आहे.

***लोकांचे लक्ष वेधून घेते***

तालुका स्मारक भूमी परिसरात होत असलेल्या विकासकामांमुळे शहराला वेगळी ओळख मिळू लागली आहे. साकोलीच्या आसपासच्या धार्मिक स्थळांवर नजर टाकली तर शिवनिबंध जलाशय परिसरातील शिवमंदिर, कुंभलीतील दुर्गाबाई डोह, उकारा फाटा येथील देवालय, गडकुंभलीतील शिव मंदिर, साकोलीतील संत लहरी बाबा देवस्थान आणि आता स्मारकभूमी ही प्रेक्षणीय स्थळे आहेत.



***धार्मिक स्थळ पिकनिक स्पॉट झाले***

तहसीलमधील निसर्गरम्य ठिकाणे नागरिकांसाठी पिकनिक स्पॉट बनली आहेत. तहसील स्मारक भूमीने आता नव्या रूपात, नव्या पद्धतीने विकसित केले आहे आणि अलीकडेच एक सुसज्ज आणि सुंदर परिसर म्हणून तहसीलमध्ये एक नवीन ओळख निर्माण केली आहे. हे ठिकाण साकोलीच्या मध्यभागी असल्याने सर्वांच्या सोयीचे झाले आहे. शासकीय पर्यटन स्थळ म्हणून घोषित होण्यासाठी स्मारक भूमीने पुढचे पाऊल टाकले असून, सध्या तहसील स्मारक भूमीचे अध्यक्ष दीपक साखरे यांच्या देखरेखीखाली कार्यक्षमतेने काम सुरू आहे.

साकोली तालुका स्मारक भूमी ही भविष्यात साकोली तहसीलसाठी अभिमानाची बाब ठरणार आहे, हे निश्चित.

## जिवाने ठार मारुन व जखमीला जिवाने ठार मारण्याचा प्रयत्न

तुमसर : पोलीस स्टेशन अंतर्गत आहे की, दिनांक २३मार्च २०२५ रोजी सुभाष वार्ड देव्हाडी येथे यातील आरोपी रामेष्वर (मुन्ना) संपत बिरनवारे वय ३५ वर्ष रा. आंबेडकर वार्ड, देव्हाडी, जिल्हा-भंडारा व मृतक अंकुष श्रीपत हेमराज साठवणे वय ३५ वर्ष रा. सुभाष वार्ड देव्हाडी, ता. तुमसर हे मित्र असुन मृतकचे आरोपीचे पत्नीसोबत अनैतिक संबंध असल्या कारणामुळे नमुद आरोपीने फिर्यादीचे घरी पोर्चमध्ये जावुन मृतकला जिवाने ठार मारण्याचे उद्देषाने कमरेतुन एक धारदार चाकु काढुन मृतकचे पोटावर, मांडीवर, पाठीवर चाकुने वार केल्याने फिर्यादी व तिचे नातीन मध्यस्ती आले असता आरोपीने फिर्यादीची नातीन जखमी कु. आकांक्षा संतोष साठवणे वय १६ वर्ष रा. सुभाष वार्ड देव्हाडी, हीला चाकु मारुन तिला गंभीर जखमी केले. आरोपीने मृतकला जिवाने ठार मारुन व जखमीला जिवाने ठार मारण्याचा प्रयत्न केल्याचे फिर्यादी श्रीपत हेमराज साठवणे वय ६३ वर्ष रा. देव्हाडी, जिल्हा भंडारा याने दिलेल्या कलम १०३(१), १०९ भारतीय न्याय संहीता-२०२३. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

## स्व. बिंदू माधव जोशी यांच्या पुण्यतिथी निमित्त ग्राहक मार्गदर्शन सेवा केंद्राचे उद्घाटन

**महासागर प्रतिनिधी**

**भंडारा , दि. ११ मे :** नगर कार्यकारिणी भंडारा , अखिल भारतीय ग्राहक पंचायत यांच्या वतीने स्वर्गीय बिंदू माधव जोशी (नाना) यांच्या पुण्यतिथीनिमित्त विनम्र अभिवादन कार्यक्रम आणि ग्राहक मार्गदर्शन सेवा केंद्राचे उद्घाटन श्री सिध्द चिंतामणी गणेश मंदिर , फ्रेंडस कॉलनी , खात रोड भंडारा येथे मोठ्या उत्साहात पार पडले. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन आणि स्वर्गीय बिंदू माधव जोशी यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून करण्यात आली.

हया कार्यक्रमाला नगर कार्यकारिणी अध्यक्ष श्री. रवींद्र तायडे हे अध्यक्ष स्थानी होते .प्रमुख पाहुणे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे विदर्भ प्रांत पर्यावरण सहसंघटक श्री .अतुलजी दिवाकर ,अखिल भारतीय ग्राहक पंचायत राष्ट्रीय कार्यकारिणी दिल्लीचे पश्चिम प्रांत संघटन मंत्री श्री. नितीनजी काकडे ,नगर कार्यकारिणी चे सचिव श्री.लोकेशजी मोहबंशी होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा सचिव श्री. अनिलजी शेंडे आणि संचालन श्री. जयंतजी सब्जीवाले यांनी केले.

यावेळी सुरुवातीला श्री. संजय आयलवार यांनी स्वर्गीय बिंदू माधव जोशी (नाना) यांचे चरित्र आणि कार्य यावर सविस्तर माहिती दिली. त्यांनी ग्राहक संरक्षण क्षेत्रातील योगदान, ग्राहक चळवळीचा इतिहास आणि संसदेतून ग्राहक संरक्षण कायदा संमत होण्याची प्रक्रिया यावर सखोल मार्गदर्शन केले.

त्यानंतर प्रमुख पाहुणे यांचे हस्ते फीत कापून ग्राहक मार्गदर्शन सेवा केंद्राचे उद्घाटन करण्यात आले. अखिल भारतीय ग्राहक पंचायत राष्ट्रीय कार्यकारिणी दिल्लीचे पश्चिम प्रांत संघटन मंत्री श्री. नितीनजी काकडे यांनी स्वर्गीय बिंदू माधव जोशी यांच्या लाभलेल्या भेटीतील अनुभव आणि त्यांची कर्तव्य दक्षता , तसेच ग्राहक संरक्षण आणि भविष्यात ही चळवळ अधिक जोमाने वाढविण्यासाठी आणि त्याची व्यापकता वाढविण्यासाठी कार्यकर्त्यांना अधिक कार्य करण्यासाठी मार्गदर्शन केले.



राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे विदर्भ प्रांत पर्यावरण सहसंघटक श्री. अतुलजी दिवाकर यांनी स्वर्गीय बिंदू माधव जोशी यांच्या सहवासातील अनुभव, तसेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची पंचसूत्री यावर मार्गदर्शन केले. त्यांनी प्रत्येक नागरिक कसा स्वयंपूर्ण, सक्षम आणि पर्यावरणपूरक विचार सरणी अवलंबून सामाजिक दृष्ट्या सुजाण जागरूक नागरिक बनू शकतो यावर सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच अखिल भारतीय ग्राहक पंचायतच्या या अभिनव उपक्रमाला त्यांनी शुभेच्छा दिल्या. तसेच नगर कार्यकारिणीचे सचिव श्री. लोकेशजी मोहबंशी यांनी ग्राहक हक्क संरक्षणाच्या कार्याबाबत आपली कटीबद्धता व्यक्त करित, या चळवळीसाठी भांडवली योगदान आणि मार्गदर्शनाचे महत्व अधोरेखित केले.

नगर कार्यकारिणीचे सदस्य श्री.चंद्रशेखर साठे यांनी नवीन विद्यूत स्मार्ट मीटर तांत्रिकदृष्ट्या आणि आर्थिकदृष्ट्या ग्राहक यांच्या हितावह नाही याबाबत माही दिली. यासाठी शासकीय यंत्रणेला या नवीन विद्यूत स्मार्ट मीटरला ग्राहकांनी तीव्र नकार देण्यासाठी जोरदार चळवळ व्हावी यासाठी मार्गदर्शन केले.

अखिल भारतीय ग्राहक पंचायत जिल्हा भंडाराचे विधी सल्लागार अधिवक्ता श्री.राहुल देवगडे यांनी सुद्धा त्यांच्या शुभेच्छा दिलेल्या आहेत.

नगर कार्यकारिणी अध्यक्ष श्री. रवींद्र तायडे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी स्वर्गीय बिंदू माधव जोशी आणि ग्राहक चळवळीतील योगदान देणाऱ्या महान व्यक्तींचे आचरण अवलंबून धर्म, वंश, जात, वर्ण यापलीकडे जाऊन सामाजिक दायीत्वाने ग्राहक मार्गदर्शनाचे कार्य यशस्वीरीत्या पार पाडण्याचे अभिवचन दिले. तसेच या केंद्रासाठी जागा उपलब्ध करून दिल्याबद्दल श्री सिध्द चिंतामणी गणेश मंदिराच्या विश्वस्तांचे विशेष आभार मानले.

**कार्यक्रमाचे मुख्य मुद्देः**

स्वर्गीय बिंदू माधव जोशी यांच्या योगदानावर प्रकाश, ग्राहक मार्गदर्शन सेवा केंद्राचे उद्घाटन आणि उद्दिष्टे, ग्राहक संरक्षण आणि हक्क यावर सखोल चर्चा, ग्राहक चळवळ अधिक जोमाने वाढविण्याचा संकल्प, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या पंचसूत्रीवर मार्गदर्शन या कार्यक्रमाच्या माध्यमातून ग्राहक हक्कांसाठी प्रभावी पावले उचलली गेली असून, नव्याने सुरू झालेल्या ग्राहक मार्गदर्शन सेवा केंद्राच्या माध्यमातून ग्राहकांना न्याय मिळवण्यासाठी महत्त्वपूर्ण मदत मिळणार आहे. कार्यक्रम यशस्वितेकरिता जिल्हा संघटन मंत्री श्री.जयंतजी सब्जीवाले ,जिल्हा सचिव श्री.अनिलजी शेंडे यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमास जिल्हा तथा नगर कार्यकारिणी चे सदस्य श्री.चंद्रशेखर साठे ,श्री. संजय आयलवार ,मो.सईद शेख ,जेष्ठ कार्यकर्ते श्री.अविनाशजी पनके , प्रा. डॉ. सौ .अनिता महाजन , श्री. भूनेश्वर शिवणकर .श्री. रमेश पारधी , सक्षमचे श्री.गोविंद कापगते , श्री.धनराजजी ढोके ,श्री.हटवार सर, अतुल वर्मा आणि इतर कार्यकर्ते उपस्थित होते. आभार प्रदर्शन प्रा. डॉ. सौ. अनिता महाजन यांनी व्यक्त केले.

## गावतलावाचे सौंदर्यीकरण की विद्रूपीकरण?



**महासागर प्रतिनिधी**

**साकोली , दि. ११ मे :** एकीकडे मुख्य शहर गणेश वार्ड ते तलाव प्रभागातील गावतलावाचे सौंदर्यीकरणाचे सुसज्जीत कार्य प्रगतीपथावर आहे. तर दुसरीकडे काही बेजबाबदार जनता तलाव बायपास मार्गावर अन्यत्र कचरा आणि घरातील खरकटे अन्न आणून टाकतात. यावर येथील जनता किती जागरूक आहेत याची प्रचिती नुकतीच घडलेली असून माजी नगरसेवक अँड. मनिष कापगते यांनी हा संतापजनक प्रकार लक्षात आणून दिला.

जनतेचे कार्य काय असते.? निव्वळ पत्रकार व पोलीसच समस्या सोडविण्यासाठी वारंवार जनतेच्या मदतीला धावणार काय.? तर जनतेनेही जागरूक होऊन जनतेचे कर्तव्य काय हे समजून घेणे आज आवश्यक आहे. जनतेला याचे थोडेही भान नाही की, आपल्याच घरासमोरून सुसज्ज तलाव सौंदर्याचे काम सुरू आहे. करोडो रुपये खर्च करून शासन जनतेसाठी हिरव्या वातावरणात एक सौंदर्यात भर घालून हा परीसर प्रकाशझोत आणित आहेत. परंतु काही बेजबाबदार जनतेच्या अश्या या उर्मट वागण्यामुळे शहरात घाणीचे साम्राज्य पसरले आहे. हे जनतेला समजून घेणे आवश्यक आहे. साकोली शहरातील सामाजिक कार्यकर्त्यांनी समस्त जनतेला विनंती आवाहन केले आहे की, सर्वांनी आपले शहर स्वच्छ कसे राहील व आपण जनतेचे काय कर्तव्यदक्ष कार्य आहे हे समजून घेतले पाहिजे. आपणच घाण करू तर इतरही घाण करतील म्हणून आपला वार्डात, आपल्या घरासमोर स्वच्छता कशी कायम राहील याची काळजी घ्यावी व सार्वजनिक सौंदर्य निर्माण स्थळांवर कुणीही घाण कचरा आणून टाकू नये असे आवाहन 'साकोली मिडीया व व्हाट्सअप ग्रुप वर फोटो टाकून' समस्त साकोली सेंदूरवाफा शहरातील जनतेला केले आहे.



'प्रभाग कुणाचाही असो परंतु, नागरिकांची सुद्धा जबाबदारी आहे. नगरपरिषदेच्या कचरा गाडी दारावर येतात. या व्यतिरिक्त महामार्गावर सुद्धा नगरपरिषदेच्या गाड्या कचरा गोळा करतात आणि दोष फक्त प्रशासनावरच द्यायच्या का?'

**राजेश बैस,**
**अध्यक्ष तालुका पत्रकार संघ,**
**साकोली.**

RNI No.- MAHAMAR-2010/35801 महासागर भंडारा
**मालक, मुद्रक, प्रकाशक** - श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर - १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, गांधी चौक समोर, भंडारा येथे प्रकाशित केले. **संपादक**- श्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन -०७१२-२७६७६२८- ९३७३११७०४२ * स्थानिक संपादक-**सुरेश लक्ष्मण कोटगले,** फोन -८७९३१९१२१३ * (पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांचेवर राहील.)

# २६ ला शितला माता मंदिरात शनिदेव जयंती व नवग्रह उत्सवाचे आयोजन

**महासागर प्रतिनिधी**

**भंडारा :** खांबतलाव परिसरात असलेल्या श्री आदिशक्ती शितला माता मंदिर येथे शनिदेव जयंती व नवग्रह उत्सवाचे आयोजन सोमवार दिनांक २६ मे २०२५ ला सायंकाळी ४ वाजता मोठ्या उत्साहात करण्यात येणार आहे. त्या निमित्ताने सोमवार दिनांक २६ मे २०२५ दुपारी ४ वाजता अभिषेक व सायंकाळी ६ वाजता आरती तसेच ७ वाजता मंदिराच्या प्रागणात महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. तरी भाविक भक्तांनी जास्तीत जास्त संख्येनी उपस्थित राहुन महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन श्री आदिशक्ती शितला माता मंदिर देवस्थानचे अध्यक्ष ईश्वरलाल काबरा, सचिव सत्यनारायण व्यास, कोषाध्यक्ष धनराज धुर्वे व संचालक मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

# जात प्रमाणपत्र पडताळणी समितीनी दर आठवडयात मंगळवार व गुरुवारला त्रुटी पूर्तता शिबीर

**भंडारा:** १०० दिवसांच्या कृती आराखडया अंतर्गत जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती विविध कार्यक्रम राबविणार १०० दिवसांच्या कृती आराखडया अंतर्गत जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती विविध विविध मोहिम राबवूणप्रलंबीत प्रकरणे निकाली काढणार आहे. यात त्रूटी पूर्ततेसाठी प्रलंबीत असलेली प्रकरणे जलद गतीने निकाली काढण्यासाठी दर आठवडयात मंगळवार व गुरुवार ला त्रुटी पूर्तता शिबीर सकाळी १०.०० सायंकाळी ५.०० वाजता पर्यंत आयोजीत करण्यात येणार आहे. त्यामुळे अर्जदारांनी त्रुटीची पूर्तता करताच प्रकरण निकाली काढणार असून त्यामध्ये जात प्रमाणपत्र पडताळणी अर्ज कसा भरावा, अर्जासोबत कोण-कोणती कागदपत्रे जोडावी, याबाबत मार्गदर्शन करण्यासाठी वेबीनारचे आयोजन करण्यात येणार आहे. तरी विशेष मोहिमेत जास्तीत जास्त विद्यार्थी पालक अर्जदार यांनी सहभागी व्हावे असे आव्हान उपायुक्त तथा सदस्य, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, भंडारा यांनी कळविले आहे.

# बीटीबी संस्थेवर न.प.ची कोटयावधीची थकबाकी

***सन २०१२पासून ते २०२२ पर्यंत थकबाकी**
***नगर परिषद प्रशासनाची वसुलीस टाळाटाळ**
***परमानंद मेश्राम यांचा पत्रपरिषदेतुन आरोप**
*** न.प.च्या काही अधिकाऱ्यांकडुन बीटीबीची पाठराखण**

**महासागर जिल्हा प्रतिनिधी**

**भंडारा, दि.११ मे :** भंडारा शहरातील बीटीबी सब्जीमंडी व्यापारी असो.वर भंडारा नगर परिषदेचे कर स्वरूपात सन ०३/०३/२०१२ पासून ते सन २१/०५/२०२२ पर्यंत जागेचे सन २०१२ चे मुल्यांकन व त्यावरील व्याजाची रक्कम २ कोटी ७३ लाख ५५ हजार ९८० रूपये थकबाकी असतांना सदर कराची वसुली करण्यास भंडारा नगर परिषद प्रशासन टाळाटाळ करीत आहे.

भंडारा नगर परिषदेतील काही अधिकारी तसेच भंडारा नगर परिषदेच्या पॅनलवर असलेले वकील हे आजही बीटीबी या संस्थेची पाठराखण करीत असल्याचा आरोप बीटीबी बचाव संघर्ष समितीचे मार्गदर्शक तथा सामाजिक कार्यकर्ते परमानंद मेश्राम आणि महात्मा फुले भाजी मंडी मार्केटचे अध्यक्ष महेंद्र मेंढे यांनी आज पत्रकार परिषदेतुन केला.

भंडारा शहरातील जलशुध्दी करणाच्या बाजुला असलेली शासकीय रिकामी जागा ही भंडारा नगर परिषदेने बीटीबी या संस्थेला ९ वर्षासाठी भाजीमंडी करीता लिजवर विकासक म्हणुन दिली होती.मात्र बीटीबी संस्थेने व्यापाऱ्यांकडुन पाच लाख रूपये घेवुन तिथे भाजी मंडी उभारली.तसेच तिथे येणाऱ्या शेतकरी व व्यापाऱ्यांडुन प्रति बोरा पाच रूपये वसुल करण्यात येत होते साधारण दर दिवशी जवळपास तीन लाख रूपये अवैधरित्या वसुल करण्यात येत होते.या विरोधात बीटीबी हटाव संघर्ष समितीखाली आम्ही आवाज उठविला. त्याकरीता आम्हाला अनेक आंदोलन,मोर्च काढावे लागले.त्या आंदोलनाला यश आल्याने अखेर बीटीबी संस्थेकडुन भाजीमंडीचे अधिकार काढण्यात आले.मात्र बीटीबी कडे नगर परिषदेचे कर स्वरूपात असलेले सन ०३/०३/२०१२ पासून ते सन २१/०५/२०२२ पर्यंत जागेचे सन २०१२ चे मुल्यांकन व त्यावरील व्याजाची रक्कम २ कोटी ७३ लाख ५५ हजार ९८० रूपये मागील नऊ वर्षापासुन थकीत असुन नगर परिषदेने त्याची तात्काळ वसुली करणे गरजेचे होते मात्र नगर परिषद प्रशासन बीटीबी ला पाठीशी घालत असल्याचा आरोप परमानंद मेश्राम यांनी यावेळी केला.



**बीटीबी तर्फे अवैध बांधकाम**

तत्कालीन बीटीबी मार्केटमध्ये बीटीबी संस्थेने नगर परिषदेची कुठलीही परवानगी न घेता किंबहुना त्याची सुचना न देता शेतकऱ्यांसाठी प्रशिक्षण केंद्राच्या आरक्षीत जागेवर स्वतःचे आलीशान कार्यालय थाटले तसेच कुठलेही अधिकार नसतांना मार्केटमध्ये उपहारगृहाचे अवैधरित्या बांधकाम करून ते भाडेतत्वावर दिले व त्या उपहारगृहाचे भाडेस्वरूपात मिळणारी रक्कम प्रति महिना ४० हजार रूपये हि बीटीबी संस्थेच्या वैयक्तिक खात्यात जमा होत असल्याचा आरोप यावेळी पत्रकार परिषदेतुन करण्यात आला.

***एमपीडीए नुसार कारवाई व्हावी!***

बीटीबी मार्केटमध्ये बीटीबी संस्थेने अवैधरित्या पैशाची वसुली केल्याने नगर परिषद प्रशासनाच्या तक्रारीवरून बीटीबी या संस्थेविरूध्द अवैधरित्या वसुलीचा गुन्हा नोंदविण्यात आला आहे.मात्र झालेली लुटमार ही कुण्या एका व्यक्तीने केली नसुल बीटीबी या संस्थेने केली असल्याचे तक्रारीत नमुद करण्यात आल्याने ही संघटीत गुन्हेगारी असल्याचे दिसुन येते त्यामुळे या प्रकरणी एमपीडीए नुसार कारवाई करण्याची मागणी यावेळी करण्यात आली.

**तत्कालिन जिल्हाधिकारी योंगेश कुंभेजकर यांनी उपरोक्त विषयाचे अनुसंगाने या कार्यालयाचे संदर्भ क्रमांक ४ चे पत्रांवर महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग शासन परिपत्रक क्रमांक जमीन ११/ २००८ प्रकरण.क्रमांक १६८/ ज.१, दिनांक ४/ १०/ २०१० च्या मार्गदर्शन निर्देशानुसार मौजा भंडारा येथील सीट क्रमांक ५४ प्लॉट क्रमाक २०/४ मधील १.५ एकर जागेवर ठोक भाजी बाजारा करिता होत असलेला वापर तात्काळ बंद करण्यात यावा व दिनांक २८/ ५/ २०१२ रोजी बाजारा करिता वापर करणे बाबत त्या करारनामा करण्यात आल्याने त्या दिनांकास सदर जागेचे वाणिज्य वापरासाठी असलेल्या बाजार मूल्य दरानुसार होणारे मूल्यांकन व त्यावरील व्याज शासनाकडे भरणा करण्याबाबतची कारवाई करण्यात यावी ,अन्यथा सदरहू जागा शासन जमा करण्यात येईल .जागेच्या वापरातील बदला बाबतचे उपरोक्त नमूद रक्कम अदा केल्याशिवाय यापुढे सदर जागेच्या वापराबाबत बीटीबी शी कोणताही करारनामा करण्यात येऊ नये ,असे आपल्याच कळविण्यात आले आहे .**

**संदर्भ क्रमांक ५ अन्वयेसह जिल्हा निबंधक वर्ग १ तथा मुद्रांक जिल्हाधिकारी भंडारा यांनी मौजा भंडारा येथील शिट क्रमांक ५४ प्लॉट क्रमांक २०/४ मधील १.५ एकर जागेचे सन २०१२ चे मूल्यांकन रुपये एक कोटी ३५ लाख रुपये सादर केलेले आहे .**

**प्रत यासह जोडून पाठविण्यात येत आहे .तरी सदर मूल्यांकन व सन २०१२ पासून त्यावरील व्याजाची खालील प्रमाणे परिगणणा करून होणारी रक्कम शासन जमा करण्यात यावी असे पत्र तत्कालीन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी दिनांक ८ मे २०२३ रोजी नगर परिषद भंडारा व जिल्हा प्रशासन अधिकारी न.मा.प्र. भंडारा यांना सादर केले होते.**

# महालगाव मार्गावर जीवघेणा खड्डा :वाहने शेतात कोसळण्याची भीती

## देखभाल दुरुस्तीच्या नावावर कंत्राटदारांची हुलकावणी

**सिहोरा :** गोंडीटोला ते महालगाव या ३ किमी अंतराच्या मार्गाचे डांबरीकरण करण्यात आले. मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेच्या अटी व शर्तीला अधीन राहून कंत्राटदाराने ही कामे केली. पाच वर्षात मार्गाचे देखभाल आणि दुरुस्तीला कंत्राटदार करारबद्ध होते. परंतु अलीकडे कंत्राटदारांनी हुलकावणी दिली आहे. याच मार्गावरील खड्डा आता चारचाकी आणि दुचाकी वाहनाला जीवघेणा ठरणारा झाला आहे. शेतात वाहने कधी कोसळतील याचा नेम नाही. यामुळे गावकऱ्यात संताप निर्माण झाला आहे. मार्गाची देखभाल आणि दुरुस्तीला ५ वर्षे जबाबदार धरण्यात आले आहे.

परंतु देखभाल आणि दुरुस्तीच्या कामासाठी कधी कंत्राटदार फिरकले नाहीत.

या मार्गावर पंचायत समिती सदस्य कांचनलाल कटरे यांच्या शेताच्या शेजारी जीवघेणा खड्डा तयार झाला आहे. शेताच्या शिवारात मार्गात पाईप घातले होते. पाईप खचला आहे. चारचाकी आणि दुचाकी वाहने चालवताना धोक्याचे झाले आहे. या मार्गावर अद्याप देखभाल आणि दुरुस्ती झाली नाही. फक्त फलकावर देखभाल आणि दुरुस्तीची नोंद करण्यात आली आहे. परिसरात सुकळी नकुल ते चुल्हाड मार्गाची हीच अवस्था झाली आहे. गोंडीटोला ते मालगाव मार्गावर जागोजागी खड्डे पडले आहेत. मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेच्या कामांना कंत्राटदारांनी हरताळ फासला आहे. नियम आणि अटी, शर्ती धाब्यावर बसविण्यात आले आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाची यंत्रणा या मार्गाची पाहणी करीत नसल्याने गावकरी चांगलेच वैतागले आहेत.

**दिलेला शब्द कधी पाळणार**

महालगाव ते नाकाडोंगरी या १८ किमी मार्गाचे डांबरीकरण करण्यात आले नाही. मार्गाचे डांबरीकरण करण्यासाठी राष्ट्रीय महामार्गावर आंदोलन झाले होते.

मार्गाचे सिमेंटीकरण करण्याचे आश्वासन देण्यात आले होते. या मार्गावर वाहनाची वर्दळ राहत आहे. ६ गावे याच मार्गावर असून मध्यप्रदेश राज्याला जोडणारा मार्ग आहे. परंतु मार्गाच्या दुरुस्तीकडे सातत्याने दुर्लक्ष करण्यात येत आहे. पुन्हा गावकरी आंदोलनाच्या तयारीत आहेत.

**३ किमी मार्गाचे डांबरीकरण**

गोंडीटोला ते महालगाव या ३ किमी अंतराच्या मार्गाचे डांबरीकरण बांधकाम झाल्यानंतर त्या मार्गाची देखभाल दुरूस्ती करण्याचे ठरले होते. मात्र रस्ता बांधकामानंतर रस्त्यावर खड्डे पडले तरी कोणतेही अधिकारी किंवा कंत्राटदार यांनी रस्ता दुरूस्तीचे सौजन्य दाखविले नाही. परिणामी नागरिकांत संताप व्याप्त आहे.

# शिवरायांची मूर्ती व फुलेंचा पुतळा उभारण्याचा प्रस्ताव बारव्हा ग्रामपंचायतीत मांडला

**लाखांदूर :** तालुक्यातील ग्रामपंचायत बारव्हा येथे गुरुवार २४ एप्रिल च्या बैठकीत इतिहास आणि समाज परिवर्तनाचे प्रतीक ठरलेल्या दोन महापुरुषांचा गौरव करणारा महत्त्वपूर्ण ठराव सादर करण्यात आला. ग्रामपंचायत सदस्या करिश्मा नवीनराज मेश्राम यांनी शिवाजी महाराजांची गावाच्या प्रवेशद्वारावर मूर्ती उभारणे आणि मुख्य बाजारपेठेचे 'महात्मा फुले बाजारपेठ' असे नामकरण करून तेथे महात्मा फुले यांचा पुतळा उभारण्याचा प्रस्ताव मांडला. 'हा केवळ एक प्रस्ताव नाही, तर गावाच्या सामाजिक आणि वैचारिक जडणघडणीकडे नेणारा ठोस टप्पा आहे. प्रेरणा हवी असेल, तर ती आपल्या मातीतील थोर पुरुषांमधूनच घ्यावी लागते,' असे ठाम मत करिश्मा मेश्राम यांनी मांडले. या प्रस्तावामुळे गावकऱ्यांमध्ये नवीन ऊर्जा आणि सामाजिक जागरूकतेची लहर निर्माण झाली असून, ग्रामपंचायतीने लवकरात लवकर या प्रस्तावाला मंजुरी देऊन प्रत्यक्ष कार्यवाही सुरू करावी, अशी अपेक्षा गावकऱ्यांनी व्यक्त केली आहे. ग्रामसभा बोलावून निर्णयावर शिक्कामोर्तब करणे, शासकीय परवानग्या घेणे, निधी उभारणे व मूर्ती निर्मितीसाठी तज्ज्ञ मूर्तिकारांशी समन्वय करणे - ही कार्यवाही तत्काळ सुरू करावी, अशी जोरदार मागणी करण्यात येत आहे.

या उपक्रमामुळे बारव्हा गावाची ओळख सामाजिकदृष्ट्या अधिक भक्कम होणार असून, नव्या पिढीला थोर नेत्यांच्या विचारांचे दर्शन घडणार आहे.

# माणिकराव सुखदेवे विद्यालयात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**महासागर प्रतिनिधी**

**भंडारा, दि.११ मे :** माणिकराव सुखदेवे विद्यालय अशोकनगर, फुलमोगरा येथे महाराष्ट्र दिन, कामगार दिन व वार्षिक परीक्षेचा निकाल घोषित करण्यात आला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक सुनिल घोलूर होते. प्रमुख अतिथी म्हणून गजानन लिचडे उपस्थित होते. याप्रसंगी महाराष्ट्र दिनानिमित्त मुख्याध्यापक सुनिल घोलूर यांचे हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

महाराष्ट्र दिनाच्या निमित्त्याने विद्यालयाचा वार्षिक परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात आला.यामध्ये प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांचा पुष्पगुच्छ व गुणपत्रिका देऊन सत्कार करण्यात आला.



वर्ग ५ वी मधून प्रथम क्रमांक सुहानी इंगळे, द्वितीय क्रमांक आस्था कढव व तृतीय क्रमांक अथर्व गेडाम यांनी पटकवीला.

वर्ग ६ वी मधून संयुक्ती निंबार्ते प्रथम, स्मित निंबार्ते द्वितीय क्रमांक व स्वर्णम राखडे याचा तृतीय क्रमांक आला. वर्ग ७ वी तुन नैतिक गेडाम याचा प्रथम क्रमांक, सुहानी राऊत हिचा द्वितीय क्रमांक, सोहम रोडगे याचा तिसरा क्रमांक आला. वर्ग ८ वी मधून श्रावणी कढव हिचा प्रथम, आरुषी वासनिक हिचा द्वितीय तर अंतरा घरडे हिचा तृतीय क्रमांक आला. वर्ग ९ वी मधून सौम्य घोलूर याचा प्रथम क्रमांक, आरुषी बागडे द्वितीय क्रमांक, संगिनी बागडे हिचा तृतीय क्रमांक आला. या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे संचालन ईश्वरदास लाखडे यांनी केले. आभार प्रतिभा जीभकाटे यांनी मानले.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी श्रावण चव्हाण, जयश्री घोलूर, रश्मी खोब्रागडे, अंगणवाडी सेविका शामकला गजभिये, मदतनीस परमी बागडे, चंचल डुंभरे,राजेश मेश्राम, देवा वाट, धनंजय सेलोकर आदिनी सहकार्य केले.

# आधुनिकतेत कमी होतोय स्वदेशी फ्रिजची क्रेज

## मातीच्या भांड्याची मागणी कमी झाल्याने कुंभार व्यवसायाला लागली उतरती कडा :जनतेचा ऑरो पाण्याकडे कलह :माठ झाले हद्दपार?

**निश्चय रामटेके**

**गोंडउमरी, दि. ११ मे :** आधुनिक काळाच्या बदलानुसार व वातावरणामुळे समाज व जीवनशैलीत व्यापक बदल झालेला आहे सध्या देशात देसी फ्रिज म्हणून ओळखला जाणारा 'मातीचे माठ 'यावर विपरीत परिणाम झाल्याने पहावयाला मिळत आहे एकेकाळी ग्रामीण भागात आठवडी बाजार माठांचा बाजार म्हणून प्रसिद्ध झाले होते परंतु आता ती ओळख हरवण्याच्या मार्गावर आहे आजच्या आधुनिक वातावरणात माठाची जागा इलेक्ट्रिकलत फ्रिज ने घेतली आहे साधन संपत्ती पासून बनलेले असल्याने त्यात भरलेले पाणी अधिक शुद्ध आणि आरोग्यदायी मानले जाते असे असताना या देशी फ्री चे ट्रेंड कमी होताना दिसत आहे आपले पूर्वज उन्हाळा आला की कुंभार आणि बनवलेली भांडे पसंत करत होते व पारंपारिक पद्धतीने बनलेली भांडी वापर करीत होते पण आजच्यावापर कमी केला आहे इलेक्ट्रिक फ्रिज मधील पाणी जास्त प्रमाणात वापरला जातात व बाहेरून घरी आल्या परतल्यावर भांड्यात पाणी न मागता फ्रिज मधून पाणी मागतो त्याचा परिणाम माठाच्या कुंभार व्यवसाय वर पडलेला आहे व फार मोठे संकट कोसळलेली आहे समाज बांधववर आर्थिक संकट गडत होता ' पूर्वीच्या तुलनेत माठाची मागणी कमी झाली आहे पूर्वी बैल बंडी ने माठ प्रत्येक गावोगावी नेले जात होते आता मात्र कोणताच कुंभार व्यवसाय महाड गावात विक्रीसाठी नेत नाही :रामदास वडद कुंभार व्यवसाय 'देसी फ्रिज च्या नावाने प्रसिद्ध असलेल्यामार्च स्वस्त व किपाशी राय तसेच ते तयार करण्यासाठी मातीचा वापर केला जातो आणि त्यामुळे जेव्हा आपण त्यात भरलेले पाणी वापरायला सुरुवात करतो तेव्हा त्यातील जीवनसत्वे खनिजे प्रथिनेतो आपल्या शरीरात पोहोचू लागतात' शरीरातील रोगप्रतिकारशक्ती माठातील पाण्याने वाढतो जीवन निरोगी असतो मात्र फ्रीज



पाण्यामुळेआरोग्याला हानिकारक असते व ते पाणी दूषित असते मातीच्या भांड्याचे गुणकारी असून माठावर संकेत आलेला आहे .

# मैय्या सहेली ग्रुपच्या 'रामजी की नन्ही सेना' साठी मोफत ५ दिवसीय योग शिबिर उत्साहात पार पडले

**महासागर प्रतिनिधी**

**भंडारा, दि.११ मे :** मैय्या सहेली ग्रुपद्वारे संचालित 'रामजी की नन्ही सेना' या उपक्रमासाठी ५ दिवसीय मोफत योग शिबिराचे आयोजन स्थानिक शितला माता मंदिराच्या सभागृहात उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आले. या शिबिराचा समारोप १०मे २०२५ रोजी झाला.

आर्ट ऑफ लिव्हिंगचे मनोज पुडके सर यांनी मुलांना अतिशय सहज आणि आनंददायी वातावरणात योग शिकवले. ओंकार, रामधुन, ध्यान, भस्त्रिका प्राणायाम, सूर्य नमस्कार आणि विविध योगासने मुलांना आकर्षक पद्धतीने शिकवण्यात आली. नव्या खेळांच्या माध्यमातून मुलांचे मनोरंजन करण्यात आले. दररोज मुलांना पौष्टिक नाश्ता वाटप करण्यात आला, जो सर्व घरी बनवून आणण्यात आला होता.

आजच्या धावपळीच्या जीवनात



स्वतःला ताजेतवाने व तंदुरुस्त कसे ठेवावे हे शिकवण्यात आले.

पर्यावरण रक्षणासाठी भाज्या, फळांचे बियांचे संवर्धन माती व शेणखताचे बॉल बनवून कसे करावे, याची माहिती रजनी गायधने यांनी दिली. सुमारे ४० मुलांनी या शिबिराचा लाभ घेतला. समारोप समारंभात मनोज पुडके सर तसेच सामाजिक कार्यकर्ते सईद भाई शेख यांचे फुलांच्या गुलदस्त्याने स्वागत करण्यात आले.

शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी श्री ईश्वरलालजी काबरा, गीता सारडा, उर्मिला सारडा, ज्योती झंवर, मंगला हेडा, कौशल्या मुंदडा, कंचन मंत्री, शैलजा शर्मा, सरोज मिश्रा, श्वेता शर्मा, दिव्या जैन, श्वेता तलदार, सरिता डहारे, अनिल बुधवानीजी इत्यादींचे अमूल्य योगदान लाभले.

शिबिराचे संचालन आणि आभार प्रदर्शन श्रीमती सुषमा मुंदडा यांनी केले.

# बचत गटातील महिलांची १६ लाखांनी फसवणूक

**महासागर प्रतिनिधी**

**साकोली, दि.११ मे :** जवळील सावरबंध येथील एका कॅडर सीआरपी पदावरील 'बबली' महिलेने बचत गटातील महिलांच्या कष्टांच्या १६ लाख ४५ हजार ९०० रूपयांनी बँकेतून फसवणूक केलीआहे.

याप्रकरणी सर्व १५० च्यावर महिला साकोली पोलिस ठाण्यावर धडकल्या. सदर मास्टरमाईंड बबलीवर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला असून तिला साथ देणारा 'बंटी' कोण? याचा शोध घेतला जात आहे. सध्या १५० महिलांची फसवणूकः तपास आर्थिक गुन्हे शाखेकडे हे प्रकरण आर्थिक फसवणूकीचे असल्याने साकोली पोलिसांनी आर्थिक गुन्हे अन्वेषण शाखेकडे सुपूर्द केले आहे.

महिला बचत गटाच्या माध्यमातून सावरबंध येथील बचत समूह विभागातील कॅडर सीआरपी पदावरील महिला सविता भालेकर हिने विविध १३ बचत गटातील पैसे घेऊन बँकेत भरल्याच्या बनावट पावत्या महिलांना दाखविल्या. परंतू सदर रक्कम बँकेत जमा केली नाही.




सावरबंध परिसरातील या समुहात पंचशील समुह, शारदा समुह, वैष्णवी समुह, लक्ष्मी समुह, निसर्ग समुह, सफलता समुह, सुरभी समुह, शिल समुह, मातोश्री समुह, एकलव्य समुह, आधार समुह, मैत्री केंद्र समुह आणि योगिता बडवाईक ग्रामसंघ समुह लिपिका यांचा समावेश आहे. हे सर्व गट मिळून १६ लक्ष ४५ हजार ९०० रूपयांनी फसवणूक करण्यात आली आहे.

आरोपी महिलेने सर्व समुहाकडून पैसे घेतल्याचे महिलांसमोर कबूल केले. पण सदर पैसे एका अज्ञात कंत्राटदार म्हणजेच 'बंटी' सोबत हा पैसा कुठे वापरला, याचा तपास सुरू आहे.

याप्रकरणी सावरबंध गावातील गोरगरीब महिला अत्यंत संतापलेल्या असून या दोन्ही 'बंटी और बबली'च्या विविध करारनाम्यांची खमंग चर्चा गावात रंगली आहे. सदर आरोपी महिलेने काही गोरगरीब महिलांना पाहून घेण्याचीही भ्याड धमकी दिली आहे. ही सविता भालेकर महिलांसोबत उर्मटपणे वागत आहे, असा समस्त महिलांचा आरोप आहे.

**बँकेतून चोरला शिक्का**

आरोपींनी वडद गावातही अशीच फसवणूक केल्याचे समोर आले आहे. आरोपी महिलेने एका कंत्राटदारासोबत जाऊन साकोली येथील बँक ऑफ इंडिया शाखेत ही फसवणूक केली आहे.

बँक ऑफ इंडियातील 'पेड' शिक्का चोरून ही फसवणूक केली आहे.

आता हे प्रकरण साकोली पोलिस ठाणे येथून आर्थिक गुन्हे अन्वेषण शाखेकडे सुपूर्द केले आहे.

स्थानिक चौकशी पोलिस निरीक्षक आचरेकर यांचे मार्गदर्शनात सहाय्यक पोलिस निरीक्षक दिपक वानखडे तपास करीत आहेत.



# चौथ्या स्तंभाकडून लढाईच्या बातम्यांबाबत देशवासियांचा भ्रमनिरास!

भारत पाकिस्तान युद्धाची वार्ता ऐकण्यासाठी अनेकजण आतुर असतात. प्रत्येक जण आपल्या राजकीय सोयीप्रमाणे युद्धाचा व्हिडीओ शोधत आहे आणि मीडियाच्या अल्गोरिदम तंत्राप्रमाणे तसा मिळूनही जात आहे. पण मागील काही वर्षांपासून प्रसारमाध्यमांची विश्वासार्हता धोक्यात आली आहे. एक नागरिक म्हणून सत्य जाणण्याचा हक्क आणि उत्सुकतेपोटी प्रसारमाध्यमांकडे बघितले जाते, पण या चौथ्या स्तंभाकडून जेव्हा नागरिकांचा भ्रमनिरास होतो तेव्हा मोर्चा समाजमाध्यमांकडे मोठ्या अपेक्षेने वळतो. तथापि, येथेही भ्रमाचा भोपळा फुटून सर्वत्र खोट्या बातम्यांचा विस्फोट अनुभवायला मिळतो. आजच्या आधुनिक माहिती युगात खोट्या बातम्या जास्त पसरवल्या जात असल्याने नागरिकांनी सतर्क असणे गरजेचे आहे. कारण अशा खोट्या बातम्यांमुळे सर्वत्र गोंधळसदृश परिस्थिती निर्माण होऊन कायदा सुव्यवस्था धोक्यात येते. कृष्णाच्या शांती प्रयत्नांना लाथाळून अहंकारी दुर्योधनाने सुईच्या टोकाएवढा प्रदेशही पांडवांना देणार नाही. मग पाच गावांचा तर प्रश्नच येत नाही, अशा अविर्भावात युद्ध वल्गना झाल्या आहेत. दोन्ही बाजूंचे दुर्योधन सत्तेच्या घोड्यावर स्वार होऊन सैराट झाले आहेत आणि यामुळे संपूर्ण जगात शांतता धोक्यात आली आहे. युद्धापेक्षा शांती कधीही श्रेष्ठच, पण शांतीकडे जाणारा मार्ग खूप आव्हानात्मक असतो. कारण राजकीय आणि आर्थिक बदल केल्याने शांती प्रस्थापित होते हा अनेक देशांचा गैरसमज आहे. तथापि, मानवी स्वभावात आमूलाग्र बदल केले तरच शांती स्थापित होऊ शकते, ही साधी गोष्ट आज जगाला समजून घेणे गरजेचे होऊन गेले आहे. शांततेतून सहअस्तित्व टिकवण्यासाठी सर्वप्रथम स्वतःवर अतूट विश्वास असणे आवश्यक आहे. नेमका याच विश्वासाचा अभाव असल्याने क्षणोक्षणी श्रेष्ठ मानवी मूल्यांचे अवमूल्यन होत असताना जग पुन्हा तिसऱ्या महायुद्धाच्या उंबरठ्यावर उभे असल्याचे भीषण चित्र दिसत आहे. "वसुधैव कुटुंबकम" ची संकल्पना जगाने म्हणूनच समजून घेतली तर मानवी मूल्य समृद्ध होऊन युद्धे टळू शकतात. नेत्यांच्या हातात सत्तेची चावी सोपवून दिली असल्याने शांतता प्रक्रिया अशक्य होऊन गेली आहे. समाजमाध्यमांतील अर्धवट आणि खोट्या बातम्यांमुळे आज कधी नव्हे एवढा कमालीचा द्वेष व तिरस्कार आणि प्रतिशोधाच्या ज्वाला जगाच्या आसमंतात भडकत आहे. याच विद्वेशाच्या कठीण काळात रुग्णालयांवरही बॉम्बहल्ले होत आहेत. भारतीय सेना दलाच्या कर्नल सोफिया कुरेशी आणि विंग कमांडर व्योमिका सिंग यांनी 'ऑपरेशन सिंदूर' बद्दल प्रेस कॉन्फरन्स केली. इंडियन एअर फोर्सने दहशतवादी अड्डयावर केलेल्या जांबाज हल्ल्याची सविस्तर माहिती या दोघींनी दिली. पाक लष्कर प्रमुख कांही दिवसापूर्वी धर्माच्या आधारावर भारतात दोन राष्ट्र आहेत हा सिद्धांत मांडत होता, त्याला ही चपराक ठरली. भारतामध्ये पहलगाम हल्ल्याचं निमित्त करून हिंदू मुस्लिम द्वेष पसरवणाऱ्यांच्याही जबरदस्त थोबाडीत आहे. शिवाय टिकली कां लावली नाही? म्हणून भारतीय नारी शक्तीचा अवमान करणाऱ्या तथाकथीत गुरुजींचाही हा पराभव ठरला.

भारत पाक युद्ध सुरू झाल्यावर दिल्ली, राजस्थान येथील सर्व शासकीय कर्मचा-यांची सुट्टी रद्द झाली. भारताने पाकिस्तानची तीन लढाऊ विमाने, आठ मिसाईल आणि शेकडो ड्रोन हल्ले नेस्तनाबूत केले. भारतीय S 400 एअर डिफेन्स सिस्टीमची बहादुर कामगिरी नजरेत भरणारी ठरली. इस्रायलकडून भारताची प्रशंसा झाली. ते म्हणतात की, अचूक लक्ष साधून हल्ला करण्यात आपल्यापेक्षाही भारतीय युद्धनीती अधिक सरस असल्याचे म्हटलं. भारतीय सेना पाकिस्तान हद्दीत घुसून कारवाई करीत असल्याच्या बातम्या ऐकल्यावर नागरिक टीव्हीच्या खोक्यापुढून हलायला तयार नव्हते. पण गेल्या दोन दिवसांपासून अनेकांनी टीव्ही पाहणे सोडून दिले. आपलं लष्कर सक्षम आणि धैर्यवान आहे. समोर आलेल्या प्रत्येक स्थितीला सामोरं जाण्याची क्षमता लष्करात आहे. घडणाऱ्या घटनांची आवश्यक तेवढी माहिती, सूचना सरकार आणि लष्कर आपल्याला देईलच. पण उत्साहाच्या भरात आपण आपल्याच लष्कराला, अधिकाऱ्यांना, सरकारला अडचणीत आणायला नको आहे. प्रत्येक जवान आणि नागरिकांचे प्राण अमूल्य आहेत. भारत पाकिस्तानला सर्व बाजूंनी घेरत असल्याचं चित्र आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधी अर्थात आयएमएफने पाकिस्तानला कर्ज देण्यास मान्यता दिली आहे. आयएमएफ कडून पाकिस्तानला साडे आठ हजार कोटींचं कर्ज मंजूर झालं आहे. मात्र पाकिस्तान या निधीचा वापर दहशतवादी कारवायांना पाठिंबा देण्यासाठी करत असल्याची शक्यता भारताकडून करण्यात आली आणि त्याच पार्श्वभूमीवर पाकिस्तानला कर्ज देण्यास भारताने विरोध केला होता. तसेच आयएमएफच्या मतदानासाठीही भारत अनुपस्थित राहिला होता. मात्र यानंतरही आयएमएफने पाकिस्तानला कर्ज दिलं आहे. त्यामुळे जागतिक पातळीवर आपल्यालाच मोठा पाठिंबा आहे असा दावा आपल्याला देखील करता येणार नाही. अशा अवस्थेत भारतीयांनी देशाची एकसंघता लावून धरली पाहिजे. सध्या युद्धजन्य परिस्थिती आहे. व्हॉट्सअ‍ॅप व यूट्यूब वरून बातम्या व व्हिडिओचा मारा चालू आहे. खरे-खोटे याचा विचार न करता आपण पण लगेच फॉरवर्ड करून देशप्रेम दाखवतोय. पण हे पूर्णपणे अयोग्य आहे. खोटे व्हिडिओ किती पसरत आहेत त्यावर देशाची प्रतिमा बिघडत आहे. आपल्या इथे बसून काय माहित तिथली नक्की परिस्थिती? त्यामुळे भावनिक न होता थोड्या धीराने गोष्टी घेतल्या पाहीजे. खरं तर युद्धाविषयीच्या पोस्ट किंवा व्हिडिओ फॉरवर्ड करणे टाळलेच पाहीजे. त्याऐवजी आपल्या सैनिकांचे मनोधैर्य वाढवण्याची जबाबदारी आपली आहे. त्यांच्या कुटुंबीयांना आधार दिला पाहीजे. प्रसार माध्यमांची जबाबदारी आता खूप मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. पण आता टीआरपी मिळविण्याच्या नादात भारतीयांच्या भावनांशी खेळ सुरू झाला आहे. कारण फिलाडेल्फीया येथे तीन महिन्यांपूर्वी झालेल्या प्लेन क्रॅश घटनेचा व्हिडीओ पाकिस्तानातली दृश्य म्हणून दाखवली जात आहेत व लोक टीव्ही समोर बसून टाळ्या पीटीत आहेत. त्यामुळे न्युज चॅनल्सवर विश्वास ठेवावा की नाही? देशहिताच्या विरुद्ध अत्यंत बीभत्स खोटेपणा सुरू झाला आहे. २०२३ मधल्या गाझा बॉम्बस्फोटाचे दृश्य दाखवून ते पाकिस्तानातल्या सियालकोटची भारतानं केलेली अवस्था म्हणून दाखवून लोकांना उल्लु बनवले जात आहेत. जे खरं आहे तेच सांगितले पाहिजे. पण त्याऐवजी अतिरंजीत दृश्य दाखवून भारतीय वाहिन्यांनी आपली विश्वासार्हता धोक्यात आणली आहे. एवढेच नव्हे तर ३१ जानेवारी २०२५ ला फिलाडेल्फियात विमान कोसळले होते. ते दृश्य दाखवून 'आयएनएस विक्रांतन कराची बंदर उद्धवस्त केलं' म्हणून दाखविले. ज्या महाभागांनी आपल्या वाहिनीला अशी दृश्य दाखविण्यास भाग पाडले तो देशद्रोह होणार नाही का? २८ एप्रिल २०२५ ला बलुचिस्तानमध्ये ऑईल टँकर ब्लास्ट झाला होता. तो व्हिडीओ हे लोक, 'भारतानं पाकिस्तानवर केलेला ड्रोन हल्ला' म्हणून दाखवत, आपल्याच देशाला चुना लावत आहेत. याला निर्लज्जपणाचा कळस म्हणायचे नाही तर काय? सगळा देश 'भारतीय जवानांच्या' पाठीशी आहे. बॉर्डरवर 'जान हथेली पे' घेऊन लढणारी पोरं आपले हिरो आहेत. भारतीय लष्कराला त्यांचे काम करु दिले पाहिजे.




जयंत महाजन
jayantmahajansir@gmail.com
मोबा. ९४२०६९९४२०

## बहुतांश जवान ही शेतकऱ्यांचीच मुले आहेत

आज जे सिंदूर शस्त्र चालू आहे ते शत्रू राष्ट्रा विरूद्ध आहे. आपला लढा भारत विरुद्ध इंडीया असा आहे. आज आपलीच पुढची पिढी इंडीयात सामील व्हायला धडपडत आहे. मग अशा परिस्थितीत आपणच आपल्या पुढच्या पिढीवर क्षेपणास्त्र सोडायचे का? आपल्यावर अन्याय स्वातंत्र्य मिळाल्यापासून होतो आहे. त्या आधीही हा अन्याय होतच होता. पण शासक इंग्रज होते. ते आपल्यावर अन्याय करतच होते. ते त्यांच्या देशाच्या हितासाठी अन्याय करत होते. आज अन्याय होतो आहे, त्याचा लाभ शेती क्षेत्राच्या बाहेर असलेल्या समाजासाठी केला जातो आहे. ज्यात आपल्याच जातकुळातली जनता आहे. पण त्या जनतेला आपल्यावर आलेल्या संकटाबद्दल काहीही खेद वाटत नाही. ह्याचाच फायदा सर्वच राजकीय पक्ष घेत आले आहेत. आपल्या मरणाचं कोणाला सोयरसुतक नाही. ह्या शोषण धोरणाचा विरोध करायला शेतकरी संघटीत झाला. पण आपल्यातलेच राजकीय फायद्यासाठी फुटून निघाले. सामान्य शेतकरी तसाच राहिला. आज भारत पाकिस्तान युध्द सुरू आहे. पण बहुतांश जवान ही शेतकऱ्यांचीच मुले आहेत, याचे भान ठेवावे लागणार आहे. संपूर्ण देश शेतकऱ्यांच्या जीवावरच चालू आहे. शेतकऱ्यांच्या भरोशावरच देश पोसला जात आहे. पण भारतीय जनतेला हे सर्व पटेल काय?

## पाकिस्तानला उद्ध्वस्त करून अद्दल घडवावी

पहलगाम हल्ल्याचा बदला अखेर भारताने घेतला असून ऑपरेशन सिंदूर अंतर्गत



अतिरेकी तळांवर केलेल्या हल्ल्यात ९ ठिकाणांना लक्ष्य करत, अतिरेकी आणि त्यांची उगमस्थाने नष्ट करत पाकिस्तानचे कंबरडे मोडले आहे. सोफिया कुरेशी आणि व्योमीका सिंह या धाडसी महिला कर्नलनी केलेली कारवाई अभिमानास्पद आणि संपूर्ण देशाची छाती गर्वाने फुलण्यास कारणीभूत करणारी ठरली आहे. मुस्लिम - मुस्लिम या नावाने सदैव बोंब मारणाऱ्या प्रखर जातीयवादी विचाराला आणि सर्वधर्मसमभाव या पवित्र शब्दाला कस्पटासमान लेखनाऱ्या प्रवृत्तीला सोफिया कुरेशी या भारतीय मुस्लिम कर्नलच्या धाडशी मोहिमेमुळे सडेतोड चपराक बसली आहे. कोरोना काळात समस्त मुस्लिमांनी हिंदू बांधवांना सर्वोतोपरी मदत केली, परिवारातील सदस्य त्या कोरोना झालेल्या नातेवाइकाजवळ जाण्यास घाबरत असताना, विविध मुस्लिम ट्रस्टच्या मुस्लिम कार्यकर्त्यांनी शेकडो हिंदू बांधवांच्या मृत शरीरास मुखाग्नी दिला. महापुरात जातपात न पाहता हजारो जेवणाची पाकिटे हिंदू बांधवांना देण्यात आली आणि सर्वोतोपरी मदत करण्यात आली. तात्पर्य, जातीपातीच्या घृणास्पद भिंती कधीच उध्वस्त झालेल्या असताना, केवळ प्रसिद्धीसाठी मुस्लिमविरोधी वक्तव्य करून, मुस्लिमांविरोधात संभ्रम निर्माण करून काय साध्य होणार आहे? आज जाणीवपूर्वक हिंदू - मुस्लिम बांधवांच्या मनात जातीय विषवल्ली पसरवण्याचे षडयंत्र रचले जातं आहे, त्या कृतीला पाकिस्तान वर बॉम्बचा वर्षाव करत, पाकिस्तानला चारीमुंड्या चित करणाऱ्या व्योमीका सिंह आणि सोफिया कुरेशी या महिला कर्नलमुळे जातीयवाद्यांच्या डोळ्यात झणझणीत अंजन घातले आहे. लष्कर आणि भारताचे पंतप्रधान यांचे ही विशेष अभिनंदन ! कारण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लष्कराला सर्वाधिकार देत यशस्वीपणे पाकिस्तानचे पानिपत करून त्यांना गुडघे टेकावयास भाग पाडले आहे. भारतात वारंवार अतिरेकी हल्ले करणाऱ्या पाकिस्तानवर भारताने भविष्यात अशीच धडाकेबाज कारवाई करत, पाकिस्तानला अद्दल घडवत पाकिस्तान उद्ध्वस्त करावा.

– इकबाल मुल्ला

## लष्करातील महिला भरतीवरून राजकारण

भारत-पाक युद्धात महिलांच्या कर्तबगारीचे गुणगान गायले जात असताना या महिलांना लष्करात शरद पवारांनी संधी दिली की नरेंद्र मोदींनी यावर समाज माध्यमात खल सुरू झाला आहे. ऑपरेशन सिंदूरमध्ये कर्नल सोफिया कुरेशी आणि विंग कमांडर व्योमिका सिंग यांच्यासारख्या महिला अधिकाऱ्यांनी देशाचं नेतृत्व केले. या दोघींनी महत्त्वाच्या पत्रकार परिषदेत सहभाग घेतला आणि मीडियाला संबोधित केले. यानंतर महिलांना सैन्य दलात संधी मिळवून देणाऱ्या तत्कालीन संरक्षण मंत्री शरद पवार यांच्या धोरणी निर्णयामुळेच या दोघींच्या शौर्याची जगाला प्रचिती आली, असे समाज माध्यमातून सागीतले गेले. ही फक्त संधी नव्हती स्त्री शक्तीची ओळख होती. तो निर्णय नव्हे तर क्रांती होती. नरसिंहराव सरकारमध्ये १९९१ ते १९९३ या काळात संरक्षण मंत्री असताना शरद पवार यांनी नक्की कोणता निर्णय घेतला? यावर टीकाटीप्पणी सुरू झाली. महिलांना मिळणाऱ्या संधी नर्सिंगपुरत्या मर्यादित होत्या. त्यात पवारांनी फक्त वाढ केली. प्रत्यक्ष युद्धात महिलांना सहभागी करून घेण्याचा निर्णय शरद पवारांनी घेतला नव्हता, असे भाजपच्या सोशल मीडियाने सांगायला सुरूवात केली. ते म्हणतात की, सत्य परिस्थिती अशी आहे की, २०१५ भारतीय वायुदल, २०१९ साली भारतीय लष्कर, २०२१ साली भारतीय नौदलात मोदी सरकारने महिलांना प्रथम देशसेवा करण्याची पहिली संधी दिली.

## धर्माच्या राजकारणाचा फायदा कोणाला झालाय?

प्रोब्लेम असा आहे की बहुसंख्य लोकांची मानसिकता 20-22 या मानसिक वयाच्या पुढें जात नाही. यासाठी काहींनी प्लॅनिंग करुन बनवलेली अभ्यास पद्धतीही कारणीभूत आहे. देशाच्या नावे लोकांनां सरळ इमोशनल फूल बनवलं जातंय. भारत असो की पाकिस्तान असो, धर्माच्या राजकारणाचा फायदा कोणाला झालाय? पाकिस्तान हे धर्मांध राष्ट्र आहे. भारतासोबत त्याचीही निर्मिती झाली. आज कुठं आहे तो देश भारताच्या तुलनेत. कारण भारताने सेक्युलर राजनीती केली. ज्यामुळे देशाचा मोठ्या प्रमाणात विकास होऊ शकला. आज देशातले बहुसंख्य लोक वयाने 20- 22 मानसिक वयाचे असल्याने त्यांना या गोष्टी बहुधा लक्षात आलेल्या नाहीत. त्यामूळे पुढल्या पिढीला त्या सांगण्यात आलेल्या नाहीत. आता भाजपा ही धार्मिक पार्टी आहे का तर नाही. ते फक्त धार्मिक असल्याचं आव आणतात. देशात अमूक जिहाद तमूक जिहाद असे अजेंडे राबवतात, तर दुसरीकडे मुस्लिम देशात जाऊन त्यांच्या गळ्यात पडतात. भाजपाचा आयटी सेल अधांधुंद वापर करत इथल्या लोकांना मानसिक गुलाम बनवायचा प्रयत्न करीत आहे. आज रोजी भारत हा तरुणांचा देश म्हटला जातो. असाच अविचाराने वागत हा तरुण म्हातारा होईल आणि आपण भारतीय एक लवकरच नष्ट होणारी जनता ठरणार आहोत.

– छाया थोरात

## मनोहर परींकरांची आठवण येत आहे

पाकड्यांच्या मिसाईल्स निष्प्रभ करणारी S-400 प्रणाली विकत घेण्याचा निर्णय कित्येक वर्ष प्रलंबित होता. मनोहर परींकरांनी चिकाटीने तो व्यवहार तडीस नेला. फक्त तेवढंच केलं असं नव्हे तर तो व्यवहार होत असताना फार क्वचित केलं जातं असं डिफेन्स परचेस प्लॅनचं रिव्हॅल्यूएशन केलं आणि देशाचे तब्बल ४९,३०० कोटी रुपये वाचवले होते. आज आपले शुर सैनिक रणांगण दणाणून सोडत असताना परींकर आणि त्यांची अफाट मेहनत ही आठवत आहे. अमेरिकेच्या दबावाला भीक नं घालता केलेली ५ सिस्टिम्सची खरेदी कौतुकास्पदच आहे. राफेल असो वा S400 खरेदी, परींकरांनी महत्वाचे निर्णय घेऊन एकेक समस्या सोडवण्याचा धडाकाच लावला. S400 च्या बाबतीत मात्र एक महत्वाचा पैलू तितकासा समोर आला नाहीये. एअर डिफेन्स स्ट्रॅटेजी आखताना म्हणजे शत्रूची विमानं, क्षेपणास्त्र दुरूनच पाडायची सोय करताना तीन टप्प्यांचा विचार होतो. लांब पल्ल्याचा, मध्यमचा आणि जवळचा हल्ला थांबवणे. S400 खरेदी लांब पल्ल्यावरील हल्ला हवेतल्या हवेतच उधळून लावण्यासाठी केली गेली आहे. ३८० किमी रेंजमधील हल्ला थांबवण्याची क्षमता असणाऱ्या ह्या ५ डिफेन्स शिल्ड्सची खरेदी करण्याचा विचार पर्रिकरांच्या काळातच झाला.

– ओंकार दाभाडकर

# ऑपरेशन सिंदूर ते शस्त्रसंधीकडे...

यापुढे कुठलाही दहशतवादी हल्ला हा देशविरोधातील युद्ध मानले जाईल, असे केंद्र सरकारने जाहीर केले आणि काही तासांतच भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने भारत-पाकिस्तान शस्त्रसंधी झाल्याचे घोषीत केले. अमेरिकेने केलेल्या मध्यस्थीमुळेच दोन्ही देशांनी शस्त्रसंधी किंवा युद्धविराम मान्य केला आहे. अमेरिकेच्या परराष्ट्रमंत्री मार्को रूबियो यांनी दोन्ही देशांच्या परराष्ट्रमंत्र्याशी चर्चा केली. त्यानंतर अमेरिकचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दोन्ही देशांनी शस्त्रसंधी करण्याचे मान्य केल्याचे एक्सवरून पोस्ट केली आणि दोन्ही देशांचे अभिनंदन केले. भारत-पाकिस्तान या दोन्ही देशांत शस्त्रसंधी झाल्याचे प्रथम अमेरिकेने जाहीर केले व नंतर भारताने त्याला दुजोरा दिला. दोन्ही देशांत शस्त्रसंधी झाल्यानंतर भारताने हवाई, जमीन आणि सागरी मार्गावरून हल्ले थांबविण्यात येत असल्याचे जाहीर केले. मात्र दहशतवादाच्या मुद्द्यावर कोणतीही तडजोड केली जाणार नाही, असे परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी जाहीर करून पाकिस्तानला शस्त्रसंधीनंतर सज्जड इशारा दिला आहे.

शस्त्रसंधी झाल्यामुळे दोन्ही देशांवर होणारे हल्ले थांबतील. गोळीबार, ड्रोन, क्षेपणास्त्रे यांचा वर्षाव थांबेल पण पाकिस्तानप्रेरीत दहशतवाद थांबेल काय? पहलगाम किंवा पुलवामा येथे निरपराध नागरीकांचे आणि सुरक्षा दलाचे जे भीषण हत्याकांड झाले, ते घडविणारे दहशतवादी कुठे गेले? त्यांना प्रशिक्षण कोणी दिले? त्यांना शस्त्रे व स्वयंचलित बंदुका कोणी दिल्या? त्यांना कोणी पाठवले? तुमचा धर्म कोणता हे विचारून हिंदू पर्यटकांना त्यांच्या परिवारासमोर पॉइंट ब्लँक गोळ्या घालून ठार करा असे त्यांना कोणी सांगितले? हत्याकांडानंतर त्यांना कोणी लपवले? त्यांना कोणी संरक्षण दिले? या प्रश्नांची उत्तरे शस्त्रसंधीनंतर मिळणार आहेत का? या प्रश्नांची उत्तरे देण्यास अमेरिका पाकिस्तानला भाग पाडणार आहे का? शस्त्रसंधीमुळे पाकिस्तान सुधारणार आहे का? त्याची हमी कोण घेणार? आणखी काही दिवस युद्ध चालले असते, तर भारताच्या ताकदवान व कुशल सेना दलापुढे पाकिस्तानची दाणादाण उडाली असती. अंतर्गत असंतोषामुळे पाकिस्तानचे आणखी तुकडे झाले असते. शस्त्रसंधीसाठी अमेरिकेने दोन्ही देशांवर दबाव आणला. दोन्ही देशांत तणाव निर्माण झाला असताना आम्ही त्यात मधे पडणार नाही असे अमेरिका दोन दिवसांपूर्वी सांगत होती मग मध्यस्थी करावी असे अचानक काय घडले? शस्त्रसंधीचा लाभ नेमका कोणाला होणार? दहशतवाद चालूच राहणार असेल, तर शस्त्रसंधी कशासाठी व कोणासाठी?

भारतीय सैन्य दलाने गेल्या चार दिवसांत पाकिस्तानात घुसून दहशतवादी तळांवर हवाई हल्ले केले आणि पाकिस्तान व पाकव्याप्त काश्मीरमधील ९ दहशतवादी तळ उद्ध्वस्त केले. दि.२२ एप्रिल २०२५ रोजी काश्मीरमधील पहलगाम येथे दहशतवाद्यांनी निसर्गाचा आनंद लुटायला आलेल्या २६ पर्यटकांना त्यांचा धर्म विचारून गोळ्या घातल्या. परिवारातील महिलांच्या समोर त्यांच्या पतींची हत्या केली. दहशतवाद्यांना हात जोडून आपल्या पतीला मारू नका अशी विनंती करणाऱ्या महिलांना, जाके मोदी से कह दो... असे त्यांनी बंदुका रोखून बजावले. काश्मीरच्या नंदनवनात परिवारासह गेलेल्या महिला आपल्या पतीचा मृतदेह घेऊन आपल्या घरी परतल्या. या दहशतवादी हल्ल्याचा बदला घेण्यासाठी भारताने ७ मेच्या मध्यरात्रीनंतर ऑपरेशन सिंदूर मोहीम सुरू केली आणि पाकिस्तानात घुसून ड्रोन आणि क्षेपणास्त्रांचा वर्षाव केला. त्यात शंभरहून अधिक दहशतवादी ठार झाले. ऑपरेशन सिंदूर मोहीम राबविताना भारतीय सैन्य दलाने जगाला संदेश दिला की, सिव्हिलियन्स से कोई बैर नही, आतंकवादीयों की खैर नहीं...

पहलगाम हत्याकांडानंतर सर्व जगाला दिसून आले की पाकिस्तान व दहशतवादी यांचे नाते कसे जवळचे आहे. पाकिस्तान व दहशतवाद या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत हे भारताने अनेकदा जगापुढे पुराव्यांसह मांडले आहे. भारतात दहशतवाद घडविणाऱ्यांचा सूत्रधार मसूद अजहर याच्या नातेवाइकाच्या अंत्ययात्रेला पाकिस्तानमध्ये पोलीस आणि लष्करी अधिकारी गणवेशात उपस्थित राहतात, त्याला मानवंदना दिली जाते. दहशतवाद्यांच्या मृतदेहाला पाकिस्तानच्या झेंड्यात गुंडाळून त्याचा शासकीय इतमामाने अंत्यस्कार होतो, याच्या क्लिप्स व फोटो भारताने जगापुढे मांडले आहेत. पाकिस्तानातून प्रशिक्षण घेऊन दहशतवाद्यांच्या ब्रिगेड तयार होतात, त्यांना आधुनिक शस्त्रांसह भारतात रक्तपात घडवायला पाठवले जाते आणि पाकिस्तानचे सरकार त्यांना संरक्षणही देते. हे वर्षांनुवर्षे चालूच आहे.

राष्ट्रनामा



सुकृत खांडेकर
०९५९४२२४०००
sukritforyou@ gmail.com

दहशतवादाची केवळ भारतालाच नव्हे, तर जगातील असंख्य देशांना झळ बसली आहे. सर्वसामान्य लोक शांततापूर्ण जीवन जगणे पसंत करतात, पण पाकिस्तानप्रेरीत दहशतवादाने भारतातील शांततेला आणि दैनंदिन जीवनाला वारंवार रक्ताचे डाग लावले आहेत. भारतात जाऊन बॉम्बस्फोट, रक्तपात-हत्याकांड घडविणारे दहशतवादी पाकिस्तानला आवडतात. कोणाचे आई-वडील, कोणाची मुले, कोणाचे नातेवाईक, तर कोणाचे शेजारी दहशतवादाला बळी पडले आहेत. बंदुका हातात घेऊन भारतातील असंख्य महिलांचे कुंकू पुसून टाकण्याचे काम दहशतवाद्यांनी केले आहे. भारतावर पाकिस्तानप्रेरीत दहशतवादी हल्ले करणाऱ्यांमध्ये लष्कर-ए-तोयबा आणि जैश-ए-मोहम्मद या संघटना प्रमुख आहेत. जगातील सर्वात मोठी संसदीय लोकशाही म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भारताच्या दिल्लीतील संसद भवनात लष्करी गणवेशात घुसून १३ डिसेंबर २००१ रोजी दशतवाद्यांनी हल्ला केला होता. सन २००२ मध्ये अक्षरधाम मंदिरावर दहशतवादी हल्ला झाला. २६ नोव्हेंबर २००८ रोजी समुद्रमार्गे मुंबईवर येऊन दहशतवादी हल्ला करणारे पाकिस्तानीच होते. लष्कर-ए-तोयबाशी त्यांचा संबंध होता. दहशतवाद्यांनी मुंबईत केलेल्या गोळीबारात व घडविलेल्या बॉम्बस्फोटात १६६ निरपराध लोकांचे बळी गेले व तीनशेहून अधिक जखमी झाले. मुंबई पोलिसांनी अजमल कसाबला जिवंत पकडण्यात यश मिळवले. दहशतवादाचे प्रशिक्षण त्याला पाकिस्तानमध्येच मिळाले होते. पाकिस्तानचा दहशतवादी चेहरा म्हणून भारताने त्याला जगाला दाखवले. सन २०१६ मध्ये उरी, २०१९ मध्ये पुलवामा आणि २२ एप्रिल २०२५ रोजी पहलगाम हे पाकिस्तानप्रेरीत मोठे दहशतवादी हल्ले होते. पाकिस्तानच्या दहशतवाद्यांनी १९९९ मध्ये कंधार येथून इंडियन एअर लाइन्सच्या विमानाचे अपहरण केले. विमानातील प्रवाशांचे प्राण वाचविण्यासाठी त्यावेळी भारताच्या जेलमध्ये असलेल्या तीन खतरनाक दहशतवाद्यांची भारताला मुक्तता करावी लागली होती. पहलगाम हत्याकांडानंतर पंधरा दिवसांनी भारतीय सैन्याने पाकिस्तान व पाकव्याप्त काश्मीरमधील दहशतवादी तळांवर हवाई हल्ले केले. ड्रोन व क्षेपणास्त्रांचा मारा करून भारतीय हवाई दलाने कराची, रावळपिंडी, लाहोर, इस्लामाबाद, पेशावर अशा प्रमुख शहरांमध्ये पाकिस्तानी सैन्याला सळो की पळो करून सोडले. लाहोर ते पेशावर आणि रावळपिंडी ते इस्लामाबाद भारतीय हवाईदलाने केलेल्या हल्ल्याने पाकिस्तानात जीव वाचविण्यासाठी मोठी पळापळ झाली. पाकिस्तानच्या पंतप्रधानांच्या निवासस्थानापासून अवघ्या वीस किमी अंतरावर बॉम्बस्फोट झाल्याने त्यांना सुरक्षित जागेवर हलविण्यात आले, तर लष्करप्रमुख असीम मुनीर यांना बंकरमध्ये लपण्याची पाळी आली. पाकिस्तानने भारताच्या हद्दीत विशेषत: गुजरात, राजस्थान, पंजाब व काश्मीरच्या सरहद्दीवर मोठ्या प्रमाणावर ड्रोन हल्ले केले पण भारतीय सेना दलाने ते परतावून लावले. पाकने केलेल्या हल्ल्यात काही भारतीय जवान व निरपराध लोकांचे बळी पडले. भारताने केलेले हल्ले हे प्रामुख्याने दहशतवादी तळांवर होते, नागरी क्षेत्रावर व लष्करी तळावर हल्ले करण्याचे भारताने कटाक्षाने टाळले पण पाकिस्तानने मात्र कोणतेही धरबंध पाळले नाहीत.

ऑपरेशन सिंदूर नंतर पाकिस्तानचा दहशतवादी चेहरा सज्जड पुराव्यानिशी उजेडात आला. पाकिस्तानकडून दहशतवाद्यांना कसे संरक्षण दिले जाते, याचे फोटो व व्हीडिओ भारताने जगापुढे मांडले. पाकिस्तानचे लष्करी अधिकारी व लष्कर-ए-तोयबाचे कमांडर अब्दुल रहुफ एकत्र असतानाचे पुरावेच भारताने जाहीर केले.

पुलवामा येथे दहशतवाद्यांनी भारतीय सुरक्षा दलाच्या ४४ जवानांचे बळी घेतल्यानंतर भारताने बालकोटमध्ये घुसून भारताने केलेल्या सर्जिकल स्ट्राईकने दहशतवादी तळ उद्ध्वस्त केले होते. पण त्यानंतर पाकिस्तानने बोध घेतला नाही. भारताबरोबर झालेल्या चारही युद्धात पराभव झाल्यानंतरही पाकिस्तानने धडा शिकला नाही. पहलगाम येथे झालेल्या हत्याकांडानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी शांत बसणार नाहीत हे सर्व जगाला ठाऊक होते. म्हणूनच चीन, तुर्की वगळता कोणत्याही देशाने पाकिस्तानला भारताच्या विरोधात पाठिंबा जाहीर केला नाही. भारताचा आक्रमक प्रतिकार बघून चीननेही आपण दहशतवादाच्या विरोधात आहोत अशी नंतर पुस्ती जोडली.

गेले चार दिवस भारत-पाकिस्तान दोन्हीकडून ड्रोन आणि क्षेपणास्त्रांचा मारा केला गेला. भारताने पहिल्याच फेरीत रात्रीच्या अंधारात पाकिस्तानवर २४ क्षेपणास्त्रे डागली तेव्हा इस्लामाबाद, लाहोर, पिंडीमध्ये सारे सैरभैर झाले होते. जैश- ए-मोहम्मदचा प्रमुख मसूद अजहरच्या परिवारातील दहा व निकटचे चार असे चौदा जण भारतीय हवाई हल्ल्यात ठार झाले. ठार झालेल्यांची नावांसह यादीही मीडियातून प्रसिद्ध झाली आहे. आजही लष्कर-ए-तोयबा व जैश-ए-मोहम्मदचे दहशतवादी पाकिस्तानात खुले आम फिरत आहेत. त्याची दृश्य टीव्हीच्या पडद्यावरही दाखवली जात आहेत. दोन्ही देशांनी युद्ध सुरू झाले असे म्हटलेले नाही. भारताने तर आमची लढाई दहशतवादाच्या विरोधात आहे असे स्पष्ट केले आहे. बिहारमधील मधुबनी येथील जाहीर सभेत बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बजावले होते- आतंकवादियों कों ऐसी कठोर सजा दी जाएगी, जिसकी उन्होंने कल्पना भी नही की होगी...

पाकिस्तानचे संरक्षणमंत्री ख्वाजा असिफ कधी भारताला अण्वस्त्र हल्ल्याची धमकी देतात तर कधी भारताने हल्ले थांबवले, तर पाकिस्तान तणाव कमी करण्यासाठी तयार आहे असेही म्हटले. पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ, रक्ताच्या एकेक थेंबाचा बदला घेऊ असा इशारा भारताला दिला होता. चीन व तुर्कीने दिलेल्या शस्त्रांवर पाकिस्तान भारताशी लढत होता. देशाची अर्थव्यवस्था डळमळीत झाली म्हणून जागतिक बँक व आंतराष्ट्रीय नाणेनिधीसमोर पाकिस्तान भिकेचा कटोरा घेऊन आजही उभा आहे.

पहलगाम हत्याकांडात ज्या महिलांचे कुंकू पुसले गेले त्या महिलांना न्याय देण्याचा प्रयत्न ऑपरेशन सिंदूरने केला आहे. ऑपरेशन सिंदूर हा कारगिल, मुंबई, अमरनाथ यात्रा, पठाणकोट, उरी, पुलवामा, पहलगाम अशा दहशतवादी हल्ल्यांचा बदला घेणारी मोहीम आहे. लढाई अजून संपलेली नाही. मुंबई पोलीस दलातील निवृत्त सहायक आयुक्त सुजाता पाटील यांनी पोस्टमध्ये म्हटले आहे-ऑपरेश सिंदूर हा शब्द ऐकूनच डोळ्यांत पाणी आलं. जय हो. सन्मानीय मोदीजी, भारतीय सेना, जय हिंद...!

# आता देशद्रोह्यांना शोधण्याची मोहीम हाती घ्यावी!

पहलगाम येथील आतंकवादी हल्ल्यानंतर भारताने प्रत्युत्तरादाखल राबवलेल्या ऑपरेशन 'सिंदूर'ने समस्त भारतीयांमधील देशप्रेम कमालीचे जागवले. हे देशप्रेम समस्त भारतीय परस्परांतील चर्चांतून आणि सोशल मीडियाच्या माध्यमातून व्यक्त करत होते. युध्दविरामामुळे काही जण काहीसे नाराज झाले असले, तरी भारताने घेतलेला निर्णय समस्त भारतीयांच्या हिताचाच असणार यावर दृढ विश्वास असणाऱ्यांची संख्याही मोठी आहे. सोशल मीडियाच्या माध्यमातून देशप्रेमाची पोचपावती देताना बहुतांश जण भारतीय सैनिकांच्या शौर्याचे कौतुक करत होते, त्यांच्या सुरक्षेसाठी प्रार्थना करत होते आणि इतरांनाही प्रार्थना करण्याचे आवाहन करत होते. भारतीय सैन्याचे कौतुक करताना आपल्या शत्रूराष्ट्राचा करता येईल तेव्हढा तिरस्कारही केला जात होता. दहशतवादाला पोसणाऱ्या पाकिस्तानला जन्माची अद्दल घडावी अशी इच्छा प्रत्येक जण व्यक्त करत होता. अशातच भारतात राहून येथील सुख सुविधांचा लाभ घेणाऱ्या काही पाकिस्तानप्रेमींना मात्र पोटशूळ उठला आणि त्यांनी आपले पाकप्रेम सोशल मीडियावर दाखवण्याचा प्रयत्न केला. रत्नागिरीमध्ये अशाच एका पाकिस्तानप्रेमीचा शोध घेऊन नागरिकांनी त्याला चांगलाच चोप दिला. त्यापाठोपाठ पुण्यातील सिंहगड इन्स्टिट्यूटमध्ये शिकणाऱ्या खादिजा शेख या तरुणीने 'पाकिस्तान झिंदाबाद' असे लिखाण सोशल मीडियावर प्रसारित केले. तिच्या पाकप्रेमाच्या विरोधात पोलिसांत तक्रारही करण्यात आली असून सदर तरुणीला अटकही करण्यात आली आहे. सिंहगड इन्स्टिट्यूटमधूनही तिला काढून टाकण्यात आले आहे.

युद्धविराम झाला असला तरी स्वातंत्र्यानंतर आजवरचा पाकिस्तानचा इतिहास पाहता पाकिस्तानच्या कुरापत्या काही थांबणाऱ्या नाहीत. आयएमएफ कडून आठ हजार कोटी रुपयांचे कर्ज मिळाल्यावर पाकिस्तान हा पैसा आपले शस्त्रबळ वाढवण्यासाठी करेल हे निश्चित आहे. आज जरी युद्ध थांबले असले, तरी येणाऱ्या काळात त्याची कधीनाकधी ठिणगी निश्चित पडेल असे अनुमान तज्ञ मंडळींकडून वर्तवले जात आहे. त्यामुळे भविष्यात मोठे युद्ध झाल्यास भारताची अंतर्गत सुरक्षा व्यवस्था बिघडवण्याचे काम देशाचे खाऊन शत्रूचे गुणगान गाणाऱ्या मंडळींकडून केले जाण्याची दाट शक्यता आहे. सोशल मीडियावर आपले पाकिस्तानप्रेम उघडपणे व्यक्त करणाऱ्यांची संख्या अल्प आहे; मात्र छुप्या पद्धतीने ते पाकप्रेम उराशी बाळगणारे या देशाने लाखोंच्या संख्येने असतील. पहलगाम हल्ल्यानंतर पाकिस्तानी नागरिकांना देशाबाहेर काढण्याच्या मोहिमेत अनेक धक्कादायक बाबी निदर्शनास आल्या. देशातील लाखो महिलांनी पाकिस्तानी पुरुषांशी लग्न करून त्या आणि त्यांची मुले गेल्या कित्येक वर्षांपासून भारतातच राहत असल्याचे या मोहीमेतूनच समोर आले. त्यांच्या आणि त्यांच्या मुलांकडे भारताचे अधिकृत आधारकार्ड, मतदान ओळखपत्र, पॅन कार्ड आणि पासपोर्टसुद्धा आहेत. भारतातील स्वपंथीयांना डावलून पाकिस्तानी नागरिकांशी निकाह करणारया अशा महिलांचे आणि आणि त्यांच्या मुलांचे इमान कोणाशी आहे वेगळे सांगायला नको. अशांना भारतात ठेवायचे कि पाकिस्तानात पाठवायचे असा यक्षप्रश्न सुरक्षा यंत्रणांपुढेही निर्माण होतो. आजवर भारतात जे काही आतंकवादी हल्ले झाले आहेत ते सर्व पाकपुरस्कृत असले, तरी कोणतीही आतंकवादी कारवाई ही स्थानिकांच्या मदतीशिवाय पूर्ण होत नाही हे सर्वांनाच ठाऊक आहे. या आतंकवाद्यांना साहाय्य करणारे, त्यांना रसद पुरवणारे, त्यांच्या राहण्या-खाण्याची सोय करणारे भारतातील स्थानिक नागरिकच होते. आजमितीला घुसखोरी ही भारतासमोरील एक मोठी समस्या आहे. बांगलादेशी, रोहिंग्या घुसखोरांची संख्या आज कोटींच्या घरात गेली आहे. त्यांना शोधणे आणि शोधून त्यांच्या देशात पाठवणे आज सुरक्षा यंत्रणांसमोरील मोठे आव्हान आहे कारण यातील बहुतांश लोकांकडे भारताची अधिकृत ओळखपत्रे आहेत. ही ओळखपत्रे त्यांना उपलब्ध करून देणारे, त्यांच्या निवासाची आणि रोजीरोटीची सोय करणारे देशद्रोही भारतातच राहतात. आज युद्धविराम झाला आहे. सैनिकी कारवाया थांबल्या आहेत, आता अंतर्गत सुरक्षा यंत्रणांनी कार्यान्वित होण्याची नितांत आवश्यकता आहे. शत्रूला चोख उत्तर दयायचे असेल तर देशाची अंतर्गत सशक्तताही तितकीच महत्वाची आहे. येत्या काळात देशाच्या कानाकोपऱ्यात वसणाऱ्या देशद्रोही मंडळींना शोधून त्यांच्यावर देशद्रोहा अंतर्गत कारवाई करण्याची मोहीम सरकारने हाती घ्यायला हवी. या मोहिमेत जनतेचा सहभागही अत्यंत महत्वाचा असून आपल्या आजूबाजूला अशी मंडळी वावरत असल्याचे जाणवल्यास त्याची सुरक्षा यंत्रणांना वेळीच खबर देण्याचे काम जनतेला करावे लागणार आहे. बाहेरील शत्रूशी दोन हात करण्यास आपले सैन्यबळ पूर्णतः सक्षम असल्याचे मागील आठवडाभरात आपण पहिलेच आहे आता आपल्यालाही आपली देशभक्ती दाखवण्याची संधी असून आपल्या भोवताली वावरणाऱ्या देशद्रोह्यांना वेचून पोलिसांच्या ताब्यात देऊया!



जगन घाणेकर
घाटकोपर, मुंबई
मो.क्र. ९६६४५५९७८०

# बुद्ध पौर्णिमा

आज १२मे, आज वैशाख पौर्णिमा आजच्याच दिवशी भगवान गौतम बुद्धांचा महामाया व राजा शुद्धोदन यांचा पुत्र म्हणून लुम्बिनी वनातील शाल वृक्षाखाली जन्म झाला होता म्हणून वैशाख पौर्णिमेला बुद्ध पौर्णिमा असेही म्हणतात. ही तिथी वर्षातील सर्वात पवित्र आणि महत्वाची तिथी मानली जाते. बुद्ध पौर्णिमा आणखी तीन कारणांसाठी पवित्र मानली जाते ती म्हणजे याच दिवशी तथागत भगवान गौतम बुद्धांचा जन्म झाला होता, याच दिवशी बुद्धांना ज्ञानप्राप्ती झाली होती आणि याच दिवशी बुद्धांचे महानिर्वाण झाले होते म्हणून या पौर्णिमेला त्रिगुणी पौर्णिमा असेही म्हणतात. बुद्ध पौर्णिमा केवळ भारतातच नाही तर जगातील १८० हुन अधिक देशात साजरी केली जाते. भारत, चीन, जपान, नेपाळ, भूतान, म्यानमार, थायलंड, श्रीलंका, मलेशिया, व्हिएतनाम, सिंगापूर, अमेरिका, कंबोडिया, इंडोनेशिया या देशात तर बुद्ध पौर्णिमा मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. जगातील सर्व बौद्ध धर्मीय बांधव बुद्ध पौर्णिमा मोठ्या उत्साहात साजरी करतात. बुद्ध पौर्णिमेला बोध गया येथे जगभरातून बौद्ध अनुयायी येतात आणि प्रार्थना करतात. बौद्ध धर्माच्या धर्मग्रंथाचे वाचन, पठण केले जाते. भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या अध्यक्षतेखाली दिल्ली येथे २ मे १९५० रोजी भारतात पहिली सार्वजनिक बुद्ध पौर्णिमा साजरी केली गेली. २७ मे १९५३ रोजी भारत सरकारने बुद्ध पौर्णिमेला सार्वजनिक सुट्टी जाहीर केली. आज बुद्ध पौर्णिमेला सार्वजनिक स्वरूप आले आहे. भारतातील बौद्ध अनुयायी हा दिवस मोठ्या उत्साहात साजरा करतात. या दिवशी बुद्ध विहारे रंगीबेरंगी पताका, फुलांनी सजवली जातात. बौद्ध बांधव यादिवशी गोडधोडाचे जेवण करून आपले मित्र नातेवाईक यांना घरी आमंत्रण देतात. बुद्ध पौर्णिमेच्या दिवशी सर्व बौद्ध भिक्षु व बौद्ध बांधव बुद्ध विहारात एकत्र येऊन प्रार्थना करतात. बुद्ध मूर्तीजवळ दीपप्रज्वलन करतात. बुद्धांची शिकवण अंगिकारण्याचा संकल्प करतात. बुद्धांनी सांगितलेल्या मार्गाने चालण्याचा निश्चय करतात. गौतम बुद्ध हे भारताचे सर्वोत्तम भूमिपुत्र आहेत. तथागत भगवान गौतम बुद्धांनी त्यांना मिळालेले ज्ञान समाजापर्यंत नेऊन एका वेगळ्या बदलाची पायाभरणी केली. त्याकाळात अंधश्रद्धा, कर्मकांड पाखंड यांनी उच्चांक गाठला होता. गौतम बुद्धांनी यावर प्रहार केला. नरबळी, पशुबळी, अंधश्रद्धा, कर्मकांड यांना त्यांनी कडाडून विरोध केला. गौतम बुद्धांनी मानव कल्याणाचा उपदेश केला. लोकांमध्ये असलेल्या स्वर्ग,नरक या भंपक गोष्टींबद्दल असलेली भीती दूर करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. गौतम बुद्धांनी आपल्या अनुयायांना चार आर्यसत्य सांगितली ती चार आर्यसत्य आचरणात आणल्यास मानवाचे जीवन आनंदमय होऊ शकते. ती चार आर्य सत्य म्हणजे

१) मानवाला दुःख असते.
२) दुःखाला कारण असते.
३) दुःखाचे निवारण करता येते.
४) दुःख कमी करण्याचे उपाय आहेत.

मानवी जीवनातील दुःख निवारण्यासाठी बुद्धांनी आठ मार्ग सांगितले आहेत. यम, नियम, आसन, प्राणायम, प्रत्याहार, ध्यान, धारणा, समाधी. गौतम बुद्धांनी आयुष्यभर शील, समाधी आणि प्रज्ञेचा मार्ग शिकवला. त्यांनी करुणा विकसित करण्याचा आणि समता, स्वातंत्र्य व बंधुत्व यावर आधारित जीवन जगण्याचा धडा लोकांना दिला. आज बुद्ध पौर्णिमेपासून सर्वांनी शिलाचे काटेकोरपणे पालन करून आपली काया, वाचा व मनाची कृती निष्कलंक राहील असा संकल्प करावा. सर्व नागरिकांनी तथागत गौतम बुध्दांच्या मार्गाने चालावे. गौतम बुद्धांनी दाखवलेला मार्ग हाच मानव मुक्तीचा मार्ग आहे.



श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

# सावधान ! देख ले पाकिस्तान सिन्दुर मे कितनी ताकद होती है

पाकिस्तानने नेहमीच आतंकवाद्यांच्या मदतीने भारतावर छुपे हल्ले करून शांती भंग करण्याचे काम केले व भारताच्या पाठीत खंजीर खुपसण्याचे काम केले आहे.यावर भारताने सुध्दा अनेक कारवाया सुरू पाकिस्तानला जशास तसे प्रत्युत्तर सुध्दा दिले.परंतु पहलगाममध्ये पाकिस्तानने आतंकवाद्यांच्या मदतीने २८ निरअपराध पर्यटकांचा बळी घेतला व त्यांचे सिन्दुर पुसण्याचे घृणास्पद काम केले ही सर्वात मोठी घोडचूक पाकिस्तानने करून भारतीय संस्कृतीवर हात टाकण्याचे काम केले.कारण सिन्दुर काय असते हे पाकिस्तानला माहीतच नाही.परंतु सिन्दुरमध्ये किती ताकद व हुंकार असते ही बाब भारताला,भारतीय संस्कृतीला, भारतीय मुस्लिमांसह संपूर्ण धर्माच्या लोकांना चांगल्याप्रकारे ग्यात आहे.त्यामुळे सिन्दुरची रक्षा करण्याचे दायित्व भारतीय सेनेने स्विकारले असुन संपूर्ण १४० कोटी जनाता भारतीय जवानांन सोबत उभी आहे आणि जगातील अनेक देशांसह मुख्यत्वे करून मुस्लीम देशांनी सुध्दा भारतीय कारवाईचे स्वागत केले आहे एवढी मोठी ताकद सिन्दुरमध्ये असते ही बाब पाकिस्तानने लक्षात ठेवली पाहिजे.पहलगाम हल्ला हा सरळ भारतीय संस्कृतीवर हल्ला होता.पहलगाम हल्ल्यामध्ये पाकिस्तानी आतंकवाद्यांनी भारतीय महिलांचे सिन्दुर पुसण्याची सर्वात मोठी चुक केली आहे.भारतीय संस्कृतीत सिन्दुरला किती महत्त्व असते ही बाब ऑपरेशन सिन्दुरने पाकिस्तानला दाखवून दिली आहे.भारताने आतापर्यंत पाकिस्तानी आतंकवाद्यांवर कारवाया केल्यात आणि अनेक आतंकवाद्यांना यमलोक सुध्दा पाठविले.परंतु ऑपरेशन सिन्दुर असा ऑपरेशन आहे की भारत, पाकिस्तानला चिडफार केल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही आणि त्याला घरात घुसून मारेल तेच काम ऑपरेशन सिन्दुरने केले.चुटकीभर सिन्दुरमध्ये किती ताकद असते ही बाब भारताने पाकिस्तानी आतंकवाद्यांचे ९ कॅम्प उध्वस्त करून दाखवून दिली आहे.भारताची ऑपरेशन सिन्दुर ही कारवाई आरपारची असल्याचे स्पष्ट दिसून येते.ऑपरेश सिन्दुर एअर स्ट्राईक अशा पध्दतीने केला की त्याची कल्पना पाकिस्तान सुध्दा करू शकत नाही.कारण भारतीय सेनेने पाकिस्तानमध्ये असलेले ९ आतंकवादी कॅम्प उध्वस्त करून जगाला एक संदेश दिला की पाकिस्तानने भारतावर जीतक्याही आतंकवाद्यां कारवाया केल्या असेल त्याचा संपूर्ण बदला भारत सरकार ऑपरेशन सिन्दुर मार्फत शेवटच्या क्षणापर्यंत घेईल हे भारताने जगाला दाखवून दिली.आता आतंकवादी कारवायांच्या बाबतीत भारत सरकार सुईच्या टोकाएवढाही समझोता करणार तर नाहीच उलट मदत करणाऱ्यांना सुध्दा सोडणार नाही ही बाब स्पष्ट झाली आहे.भारताने पाकिस्तानच्या १०० किलोमीटर हद्दीत घुसून एअर स्ट्राईक केला यात ९० पेक्षा अधिक आतंकवादी मारल्या गेल्याचे सांगितले जाते. भारत हा जगासाठी शांती दुत आहे आणि त्या पध्दतीने जगासाठी कार्य सुध्दा करीत आहे.परंतु जर कोणी भारताच्या विरूद्ध तिरप्या नजरेने जो-जो पाहिल त्याला नेस्तनाबूत केल्या जाईल ही बाब ऑपरेशन सिन्दुरने स्पष्ट करून दाखविली आहे आणि जगाने सुध्दा पाहीली.महत्वाचे म्हणजे या ऑपरेशनमध्ये आतंकवाद्यांचा टॉप कमांडर मसुर अझरच्या १० नातेवाईक मारल्या गेल्याचे सांगितले जाते.त्यामुळे सिन्दुर ऑपरेशनने पाकिस्तानला स्पष्ट संदेश दिला आहे की भारत जितका शांत आहे त्याच्या हजार पटीने अक्राळविक्राळ रूप धारण करू शकते.ऑपरेशन सिन्दुर हा पाकिस्तानसाठी फक्त ट्रेलर आहे आगे आगे होता है क्या ही बाब पाकिस्तानने व जगाने सुध्दा पाहावी.शरमेची गोष्ट म्हणजे काही दिवसांपूर्वी पाकिस्तानचे लष्करप्रमुख जनरल असीम मुनीर यांनी काश्मीरचा मुद्दा उपस्थित करून आग ओकण्याचे काम केले होते.यामुळे पाकिस्तानी जनता व तेथील विरोधी पक्षसुध्दा त्यांच्या विरोधात गेले होते.त्यामुळे एवढ्या मोठ्या पदावर विराजमान असीम मुनीर यांनी केव्हा काय बोलावे हे सुध्दा यांना माहीत नाही मग हे कसे काय पाकिस्तानची रक्षा करणार.आज भारताच्या एअर स्ट्राईकमुळे पाकिस्तानी जनता अमीम मुनीर ला व पाकिस्तान सरकारला कोसत आहे.पाकिस्तान अब भी वक्त सुधरजा नहीं तो तेरा अंत निश्चित है.पाकिस्तानला त्याची जागा दाखविण्याकरीता भारत सरकार एअर स्ट्राईक करीत आहेच.परंतु त्याला नेस्तनाबूत करण्यासाठी संपूर्ण भारतभर मॉक ड्रिलला सुध्दा सुरूवात झाली आहे म्हणजेच ही पाकिस्तान सोबतची आरपारची लढाई आहे.कारण पाकिस्तानचा पापाचा घडा संपूर्णपणे भरलेला आहे.जय हिंद!

लेखक
रमेश कृष्णराव लांजेवार
(स्वतंत्र पत्रकार)
नागपूर
मो.नं.९९२१६९०७७९



## वाचकाचे मनोगत

### तुर्कस्तान आणि अझरबैजानमधील यात्रा वर बहिष्कार घालवा

सोशल मीडियावर मिळालेल्या लेखाच्या आधारे, २०२४ मध्ये २.७५ लाख भारतीयांनी पर्यटनासाठी तुर्कस्तानला आणि २.५ लाख भारतीयांनी अझरबैजानमधील बाकूला प्रवास केला. भारतीय पर्यटकांच्या आगमनामुळे या देशांच्या अर्थव्यवस्थेवर मोठा प्रभाव पडला आहे. भारतीय पर्यटकांची अझरबैजानमधील सरासरी राहण्याची कालावधी ४-६ दिवस असून तुर्कस्तानमध्ये ती ७-१० दिवस आहे. भारतीय पर्यटक अझरबैजानमध्ये दरवर्षी १,०००-१,२५० कोटी आणि तुर्कस्तानमध्ये २,९००-३,३५० कोटी इतके योगदान देतात.

भारताची मध्यमवर्गीय लोकसंख्या वाढून ४० कोटींपर्यंत गेली असून, सोशल मिडिया आणि चित्रपटांमुळे तुर्कस्तान व अझरबैजानकडे ओढ वाढली आहे. यामुळे २०,००० थेट आणि ४५,००० हून अधिक अप्रत्यक्ष रोजगार निर्माण झाले. परंतु ऑपरेशन सिंदूरनंतर तुर्कस्तान व अझरबैजान यांनी भारतविरोधात पाकिस्तानला समर्थन दिले आहे. त्यामुळे पुढील वेळी पर्यटनाची योजना करताना हे दोन देश वगळा. भारतात व जगात इतर अनेक सुंदर ठिकाणे आहेत. जय हिंद!

आल्हाद माळगावकर
पनवेल

# विश्वाला युद्धाची नव्हेतर शांतीदूत बुद्धाच्या विचारांची गरज



खरं म्हणजे जग आज विनाशाच्या दिशेने वाटचाल करीत असून,मानवी हिंसा, क्रोध, द्वेष, तृष्णा,अहंकार, विध्वंस, संघर्ष अशा विविध मानवविरोधी कृत्यांकडे आकर्षिला जात असून, मोठ्या प्रमाणात देश विदेशांमध्ये सातत्याने अशांती पसरवण्याचे कटकारस्थान रचले जात आहेत.जगाच्या पाठीवर जेथे कुठे मानवप्राणी आहेत ते सर्व शारीरिक दृष्ट्या एकसमान असून,त्यांची मातृभूमी, भाषा, खानपान, पेहराव, चालीरीती ह्या त्यांच्या देशाच्या भौगोलिक परिस्थिती, नैसर्गिक वातावरण तथा विविध कारणांनी भिन्न दिसत असलीतरी, शेवटी ते सुद्धा माणसेच आहेत आणि त्यांना सुद्धा जगण्याचा तेवढाच अधिकार आहे.परंतु भिन्न विचार समजून न घेता आपले श्रेष्ठत्व सिद्ध करण्यासाठी इतरांना कमी लेखण्याची अहंकारी आणि मनमानी प्रवृत्ती त्याचप्रमाणे आपल्या देशाची ठरवून दिलेली भौगोलिक सिमारेषा सुरक्षित असतांनाही इतर देशांच्या भुभागावर बळजबरीने अतिक्रमण करणे, शेजारी देशात अनधिकृत छुप्या पद्धतीने घुसून तेथील जनतेत दहशतीचे वातावरण निर्माण करणे आणि त्यांच्यातच कुरापती करून आपसी हल्ले घडवून आणने, ज्यामुळे शेजारी देशांच्या मित्रत्वाच्या संबंधात शत्रुत्व निर्माण होईल अशा विघ्नसंतोषी मानसिकतेचा अवलंब करून दहशतवादी त्यांचे मनसुबे सिद्ध करीत असतात त्यामुळे अशा देशविघातक कृत्यावर कारवाई करण्यात ढिलाई झाली तर निश्चितच शेजारच्या विरोधाने पछाडलेल्या देशाचे मनोबल वाढते आणि देशाच्या सिमेवर विध्वंसक कारवाया कमी होण्यापेक्षा त्या वाढीस लागतांना दिसतात.अशा विपरीत परिस्थितीत सारे विश्व विनाशाच्या उंबरठ्यावर उभे असतांना विश्वाला शांतीचा संदेश देणारे महाकारूणिक तथागत भगवान गौतम बुद्धांची शिकवण तथा त्यांची तत्वप्रणाली खऱ्याअर्थाने जगाला विनाशापासून मुक्त करणारी आणि जगाला शांतीचा संदेश देणारी ठरत असल्याने, विश्वातील अनेक देश त्यांच्या शांतीच्या मार्गाने मार्गक्रमण करीत विकासाच्या दिशेने झेप घेत आपला आणि आपल्या देशाचा विकास साधत आहेत.बुद्धाच्या तत्वप्रणालीचा विचार केल्यास केल्यास सर्वसाधारणपणे बुद्धाचा अहिंसेच्या तत्त्वाशी संबंध जोडण्यात येतो. बुद्धाने शिकवले ते अहिंसेच्याही फार पलीकडचे, अत्यंत व्यापक आहे,जी त्रिपिटकाच्या वाचनातून समजली ती पुढील प्रमाणे सांगता येईल. स्वतंत्र समाजासाठी धर्म आवश्यक आहे.प्रत्येक धर्म महत्त्वाचा आहे असे नाही.धर्माचा जीवनाच्या तथ्यांशी संबंध असला पाहिजे.त्याचा ईश्वर किंवा आत्मा किंवा स्वर्ग किंवा पृथ्वी याविषयीच्या सिद्धांतांशी वा कल्पनांशी संबंध असता कामा नये.ईश्वराला धर्माचा केंद्रबिंदू मानणे चूक आहे.आत्म्याची मुक्ती हा धर्माचा केंद्रबिंदू मानणे चूक आहे.प्राण्यांचा बळी देणे हा धर्माचा केंद्रबिंदू मानणे चूक आहे.खराधर्म माणसांच्या मनात वसत असतो, शास्त्रात नव्हे.माणूस व निती हा धर्माचा केंद्रबिंदू असला पाहिजे.जर तसे नसेल तर धर्म ही एक क्रूर अंधश्रद्धा ठरेल.नीती ही केवळ धर्माचा आदर्श असणे पुरेसे नाही,ती जीवनाचा नियम झाली पाहिजे,कारण जगात ईश्वर नाही.धर्माचे कार्य जगाची पुनर्रचना करणे व त्याला सुखी बनविणे हे आहे,त्याचा आरंभ वा अंत यांचे स्पष्टीकरण करणे नव्हे.हितसंबंधांच्या कलहामुळे जगात दु:ख आहे व तो सोडवण्याचा एकमेव मार्ग म्हणजे अष्टांग मार्गाचे अनुसरण होय.संपत्तीची खाजगी मालकी एका वर्गाला सत्ता तर दुसऱ्या वर्गाला दु:ख देते.समाजाच्या भल्यासाठी ह्या दु:खाचे कारण दूर करुन ते नष्ट केले जाणे आवश्यक आहे.सर्व मानव समान आहेत.माणसाचे मुल्यमापन त्याच्या जन्माने नसून त्याच्या कर्तृत्ववाने होते.महत्वाचे काय तर उच्च आदर्श; उच्च घराण्यातील जन्म नव्हे. सर्वांबद्धलची मैत्री अथवा मित्रत्व कधीच सोडता कामा नये.आपण त्यासाठी आपल्या शत्रूचे देखील ऋणी असले पाहिजे.प्रत्येकाला अध्ययन करण्याचा हक्क आहे.माणसाला जगण्यासाठी जशी अन्नाची आवश्यकता आहे त्याप्रमाणे प्रज्ञेचीही आवश्यकता आहे.शीलाशिवाय प्रज्ञा ही घातक आहे. कोणतीही गोष्ट अस्खलनशील नाही. कोणतीही गोष्ट कायम बंधनकारक नाही. प्रत्येक गोष्ट चौकशी व परीक्षण यांस पात्र आहे. कोणतीही गोष्ट अंतिम नाही.प्रत्येक गोष्ट कार्यकारणभावाच्या नियमाला धरून आहे. कोणतीही गोष्ट कायम अथवा सनातन नाही. प्रत्येक गोष्ट बदलास पात्र आहे.अस्तित्व हे नेहमीच घडत असते.युद्ध जर सत्यासाठी व न्यायासाठी नसेल तर ते चूक आहे.विजेत्याची जितांबाबत कर्तव्ये आहेत.अशी संक्षिप्त स्वरूपात बुद्धाची ही तत्वे आहेत.यावरून ती किती प्राचीन,पण किती नवीन!त्याची शिकवण किती व्यापक व किती सखोल आहे हे कळून येते.जग दुःखाने व दैन्याने भरलेले आहे हे सत्य या नव्या धर्मतत्वाचा पाया आहे.हे सत्य केवळ दखल घेण्यापुरते नाही, तर मुक्तीच्या कोणत्याही उपाययोजनेत ते पहिले व सर्वप्रमुख मानने आवश्यक आहे.ही वस्तुस्थिती जाणून घेणे हा बुद्धाने त्याच्या धर्मतत्वाचा प्रारंभबिंदू मानला.ते धर्मतत्व कोणत्याही उपयुक्त प्रयोजनार्थ उपयोगी ठरण्यासाठी हे दु:ख व दैन्य दूर करणे हे त्याचे ध्येय व उद्दिष्ट होते.या दु:खाची कारणे असू शकतील याची चौकशी करता बुद्धाला ती केवळ दोन कारणे असतील असे दिसून आले.माणसाचे दु:ख व दैन्य काही अंशी त्याच्या स्वतःच्या गैरवर्तणूकीचा परीणाम असतो.दु:खाचे हे कारण दूर करण्यासाठी त्याने पंचशील आचरणात आणण्याचा उपदेश केला.त्यानुसार पंचशीलामध्ये पुढील नियमांच्या पालणाचा अंतर्भाव होतो. कोणत्याही प्राणीमात्राला ठार करण्यापासून वा ठार करण्यास कारण ठरण्यापासून अलिप्त राहणे, चोरीपासून म्हणजे दुसऱ्याची मालमत्ता लबाडीने किंवा बळजबरीने संपादन करण्यापासून वा बाळगण्यापासून अलिप्त राहणे,असत्य भाषणापासून अलिप्त राहणे,कामवासनेपासून अलिप्त राहणे,मादक पेयांपासून अलिप्त राहणे.जगातील दु:ख व दैन्य याचा काही भाग, बुद्धाच्या मते माणसाच्या माणसाबाबत असलेल्या असमानतेचा परीणाम होय.यावरून तथागत भगवान गौतम बुद्धांचे एकूणच तत्वज्ञान मानवजातीला कसे मार्गदर्शक आहे हे कळून येते.सोबतच आजच्या परिस्थितीत युद्धाचे विनाशकारी ढग मानवजातीच्या डोक्यावर तरंगत असतांना विश्वाला युद्ध हवे की, बुद्ध हवा याचा विचार प्रत्येकाने करण्याची वेळ आली आहे.शेवटी बुद्ध जयंतीच्या सर्वांना मंगलमय हार्दिक शुभेच्छा!

आर.एस.तायडे
सामाजिक कार्यकर्ता,
कोणार्क कॉलनी, अमरावती
मो.९४२०१२५७६१

# बेस्ट भाडेवाढ पहिल्याच दिवशी उत्पन्न वाढले


## मात्र प्रवासी घटले



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ११: बेस्ट प्रशासनाने बसगाड्यांच्या प्रवासी भाड्यात दुपटीने वाढ केल्यानंतर पहिल्याच दिवशी शुक्रवारी बेस्टच्या प्रवासी संख्येत घट झाली. त्याच वेळी उत्पन्न मात्र एक कोटी रुपयांनी वाढ झाली आहे. मे महिन्यामुळे आधीच प्रवासी कमी असल्यामुळे बेस्टचे नक्की किती प्रवासी घटले याबाबत निष्कर्ष काढण्यास वेळ लागेल असे प्रशासनाचे म्हणणे आहे.बेस्ट उपक्रमाने बसच्या प्रवासी भाड्यात शुक्रवारपासून वाढ केली. सर्वसाधारण बसचे किमान भाडे ५ रुपयांवरून १०रुपये, तर वातानुकुलित बसचे किमान भाडे ६ रुपयांवरून १२ रुपये करण्यात आले. त्याचबरोबर मुंबईच्या हद्दीबाहेर जाणाऱ्या बस प्रवाशांना वाढलेले बसभाडे आणि त्यावर अधिक २ रुपये भरावे लागणार आहेत. एकदम दुपटीने भाडेवाढ केल्यामुळे प्रवाशांमध्ये पहिल्याच दिवशी नाराजीचे वातावरण होते. शेअर टॅक्सीला प्रोत्साहन देण्यासाठीच हे भाडे वाढवण्यात आल्याचाही आरोप प्रवासी करीत आहेत. समाजमाध्यमांवरही हा आरोप केला जात आहे. काही ठिकाणी जिथे शेअर टॅक्सी १५ रुपये आकारते, तिथे बेस्टचे भाडे१२ रुपये झाले आहे. मात्र आतापर्यंत बसगाडीसाठी थांबणारे प्रवासी यापुढे शेअर टॅक्सीचा पर्याय निवडण्याची शक्यता आहे. तसेच एक दोन किमीच्या प्रवासासाठी १२ रुपये देणे महाग वाटत असल्याचेही प्रवाशांचे म्हणणे आहे. दरम्यान, पहिल्या दिवशी बेस्टचे प्रवासी घटलेले असले तरी त्यावरून आताच निष्कर्ष काढता येणार नाही, असे मत बेस्टच्या अधिकाऱ्यांनी व्यक्त केले. सध्या मे महिन्याची सुट्टी असल्यामुळे बस, मेट्रो, रेल्वे सगळ्याच ठिकाणी प्रवासी घटलेले आहेत. त्यातच शुक्रवारी आठवडाअखेर असल्यामुळे बेस्टचे प्रवासी कमी असतात. तसेच युद्धसदृश परिस्थिती असल्यामुळे पर्यटकांची संख्याही कमी आहे. त्यामुळे प्रवासी घटलेले दिसत असल्याचे बेस्टच्या अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. भाडेवाढीमुळे प्रवासी घटले का हे जून महिन्यात समजू शकेल, असे अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे.शुक्रवार, ४मे रोजी रात्रीपर्यंत एका दिवसात २३ लाख १६ हजार प्रवाशांनी बेस्टच्या बसमधून प्रवास केला. तर तिकिट विक्रीतून बेस्टला एका दिवसात .२,४३ कोटी रुपये महसूल मिळाला. मात्र गुरुवारी ८ मे रोजी बेस्टच्या बसमधून २५ लाख प्रवाशांनी प्रवास केला होता. बेस्टची सरासरी दैनंदिन प्रवासी संख्या ३१ लाख इतकी आहेत. तर दैनंदिन उत्पन्न सरासरी पावणेदोन कोटी रुपये आहे. त्यामुळे भाडेवाढ दुप्पट करण्यात आली असली तरी महसूल मात्र दुपटीने वाढलेला नाही.

# जितेंद्र गवारेंकडून मकालू शिखर सर

## सात अष्टहजारी शिखरांवर चढाई करणारे पहिले महाराष्ट्रीय



**पुणे :** गिरिप्रेमीचे अनुभवी गिर्यारोहक जितेंद्र गवारे यांनी शनिवारी पहाटे जगातील पाचवे सर्वोच्च शिखर मकालूवर (, ८,४८५मीटर) यशस्वी चढाई केली. या यशामुळे आठ हजार मीटरवरील जगातील एकूण १४ शिखरांपैकी सात शिखरे गवारे यांनी सर केली असून, अशी कामगिरी करणारे ते पहिले महाराष्ट्रीय ठरले आहेत.नेपाळ मधील मकालू हे शिखर चढाईसाठी अवघड मानले जाते. वेगाने वाहणारे अतिथंड वारे, उणे ३५ ते ४० अंश तापमान, सरळरेषेतील अवघड चढाई यामुळे मकालूवर आजवर खूप कमी गिर्यारोहकांनी चढाई केलेली आहे. ज्येष्ठ गिर्यारोहक उमेश झिरपे यांच्या मार्गदर्शनाखाली गवारे यांनी गेल्या महिन्यापासून या शिखरावरील चढाईसाठी प्रयत्न सुरू केले होते. आज पहाटे ४ वाजून५० मिनिटांनी हे शिखर सर करण्यात त्यांना यश आले. हे शिखर नेपाळ आणि चीनच्या सीमेवर आहे. हिमालयाच्या महालंगूर भागात एव्हरेस्टपासून १४ किलोमीटर अंतरावर त्याचे स्थान आहे. चढाईसाठी प्रतिकूल अशी खडक बर्फमिश्रित पर्वतभूमी आणि अत्यंत प्रतिकूल हवामान ही याची वैशिष्ट्ये आहेत. जितेंद्र यांनी एव्हरेस्ट, कांचनजुंगा, ल्होत्से, धौलागिरी, मनासलू, अन्नपूर्णा- १आणि आज मकालू अशा सात अष्टहजारी शिखरांवर यशस्वी चढाई केली आहे. जितेंद्रची समर्पणाची भावना, नम्रता आणि शिस्त सदैव उल्लेखनीय राहिली आहे. त्यांचे यश महाराष्ट्राच्या गिर्यारोहण इतिहासातील एक सुवर्णक्षण आहे, असे झिरपे म्हणाले.

# ऑपरेशन सिंदूर : देशाविरोधात समाज माध्यमांवर पोस्ट केल्याप्रकरणी मुंबईत दोन गुन्हे, एकाला अटक

**मुंबई :** ऑपरेशन सिंदूरनंतर भारत-पाकिस्तानातील तणाव वाढल आहे. या पार्श्वभूमिवर देशाविरोधात पोस्ट केल्याप्रकरणी मुंबईत दोन गुन्हे दाखल झाले आहेत. देशाच्या सार्वभौमत्त्वाला धोका निर्माण होईल, असे कृत्य केल्याप्रकरणी चुनाभट्टी व मालवणी पोलिसांनी गुन्हे दाखल केले आहेत. त्यातील एका प्रकरणात चुनाभट्टी पोलिसांनी २० वर्षीय तरूणाला अटक केली आहे. कुर्ला परिसरातील तरूणाने इन्स्टाग्राम पोस्टवर भारताविरोधी पोस्ट ठेवल्याप्रकरणी चुनाभट्टी पोलिसांनी भारतीय न्याय संहिता कलम १५२,१४७(२),३५३ १(ई) अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे.२० वर्षीय तरूणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून त्याला याप्रकरणी अटक करण्यात आल्याची माहिती अधिकाऱ्याने दिली. पोलिसांनी स्वतः याप्रकरणी तक्रार केली आहे. भारत-पाकिस्तान तणावाच्या पार्श्वभूमीवर आरोपी तरूणाने भारतविरोधी पोस्ट इन्स्टाग्रामवर ठेवली होती. गुन्हा दाखल झाल्यानंतर शनिवारी रात्री उशीरा चुनाभट्टी पोलिसांनी कुर्ला येथील राहत्या परिसरातून या तरूणाला अटक केली. अटक करण्यात आलेला २० वर्षीय तरूण शिक्षण घेत असल्याची माहिती पोलिसांनी दिली. मालाड येथे २६ वर्षीय तरूणाच्या तक्रारीवरून मालवणी पोलिसांनी भारतीय न्याय संहिता कलम ३५३(२) अंतर्गत गुन्हा मोबाइल क्रमांक धारकाविरोधात गुन्हा दाखल केला आहे. तक्रारदार तरूण केबल नेटवर्कचा व्यवसाय करतो. शनिवारी तो व्हॉट्सअॅप स्टेटस बघत असताना एका ब्यूटी पार्लरच्या नावाने सेव्ह केलेल्या क्रमांकावर भारताने राबवलेल्या ऑपरेशन सिंदूरविरोधात स्टेटस ठेवले होते. तसेच विरोधी हावभाव करणारे इमोजी ठेवले होते. भारतात राहून देशाविरोधात कृती केल्याबाबत याप्रकरणी गुन्हा दाखल झाल्यानंतर मोबाइल क्रमांकाद्वारे आरोपीचा शोध सुरू आहे.

# मराठी चित्रपटांची प्रदर्शनासाठी झुंबड

## मे महिन्यात १७ मराठी चित्रपट प्रदर्शन

### एकाच दिवशी सहा चित्रपट




**मुंबई :** मराठी चित्रपटांच्या निर्मितीची संख्या वाढत आहे आणि हिंदी वा दाक्षिणात्य चित्रपटांच्या स्पर्धेला न घाबरता मराठी चित्रपट प्रदर्शित केले जातात, ही मराठी चित्रपटसृष्टीच्या प्रगतीच्या दृष्टीने सुखावणारी बाब आहे. मात्र, सध्या एकाच आठवड्यात सहा ते सात मराठी चित्रपट, महिन्याला २० ते २२ मराठी चित्रपट प्रदर्शित होत असल्याने धड कोणालाही चित्रपटगृहात नीट शो मिळत नाहीत. एकाच वेळी प्रदर्शनाची झुंबड उडाल्याने मराठी चित्रपटांची आपापसातच स्पर्धा सुरू असल्याचे चित्र निर्माण झाले आहे. मे महिन्यात सुट्टीचा काळ असूनही हिंदीत रेड वगळता एकही मोठा चित्रपट नाही, त्याच वेळी मराठीत मात्र १७ चित्रपट प्रदर्शित होणार आहेत.

# मौजे बिबवेवाडी येथे पर्यावरणाचा ऱ्हास करणाऱ्याविरुद्ध प्रशासनाच्यावतीने धडक कारवाई : जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी



**पुणे:** पुणे शहरातील सर्वे क्रमांक ५७४/१ब, मौजे बिबवेवाडी येथे पर्यावरणाचा ऱ्हास करुन अनधिकृतपणे डोंगरफोड करणाऱ्या विरुद्ध प्रशासनाने धडक कारवाई केली आहे; यापुढे अनधिकृतपणे उत्खनन करुन पर्यावरणाचा ऱ्हास करणाऱ्याविरुद्ध कडक कारवाई करण्यात येणार आहे, अशा इशारा जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिला आहे.मौजे बिबवेवाडी येथे अनधिकृतपणे डोंगरफोड करुन जागेचे सपाटीकरण करण्याचे काम सुरु असल्याबाबतची माहिती प्रशासनाला मिळाली; या ठिकाणी प्रशासनाच्यावतीने ड्रोनद्वारे स्थळ पाहणी करुन पंचनामा केला.या ठिकाणी अनधिकृत उत्खनन आणि डोंगरफोड करुन जागा सपाटीकरण होत असल्याचे निदर्शनास आले आणि प्रशासनाच्यावतीने ते तात्काळ थांबविण्यात आले. याकामी वापरण्यात आलेले पोकलँड हुंडाई टू टेन ताब्यात घेण्यात आले आहे.या मिळकतीचे मालक राकेश शर्मा असून त्यांनी व विकसकानी उत्खनन तसेच जागा सपाटीकरणाकरीता शासनाकडून कोणतीही परवानगी घेतली नसल्याचे कार्यवाहीत निदर्शनास आले आहे. या प्रकरणी पोलीस स्टेशनमध्ये संबंधिताविरुद्ध गुन्हा नोंदविण्याबाबत फिर्याद दाखल करण्यात आली आहे.

# मुंबई विद्यापीठाच्या नावाने बनावट परिपत्रक परीक्षा पुढे ढकलल्याचा खोटा दावा




■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ११: भारत आणि पाकिस्तानात सुरू असलेल्या ताणतणावात समाजमाध्यमांवर बनावट छायाचित्रे, चित्रफिती आणि पत्रके पसरविण्याचा धुमाकूळ सुरू आहे. मुंबई विद्यापीठाच्या नावानेही युद्धजन्य परिस्थितीमुळे सुरक्षेच्या कारणास्तव १४मे २०२५ पासून सुरू होणाऱ्या सर्व परीक्षा पुढे ढकलण्यात येत आहेत असे नमूद करून परिपत्रक समाज माध्यमांवर प्रसारित झाले आहे. मात्र परीक्षेसंदर्भातील संबंधित परिपत्रक बनावट असल्याचे मुंबई विद्यापीठ प्रशासनाने स्पष्ट केले आहे.युद्धजन्य परिस्थितीमुळे सुरक्षेच्या कारणास्तव १४ मे २०२५ पासून सुरू होणाऱ्या सर्व परीक्षा पुढे ढकलण्यात येत आहेत असा खोटा दावा करून आणि मुंबई विद्यापीठाच्या बोधचिन्हाचा वापर करून बनावट परिपत्रक समाजमाध्यमांवर व्हायरल करण्यात आले आहे. मात्र सदर परिपत्रक हे संपूर्णतः बनावट असून मुंबई विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाने कोणत्याही परीक्षा पुढे ढकललेल्या नाहीत. अधिकृत माहिती ही मुंबई विद्यापीठाच्या .. या अधिकृत संकेतस्थळावरून वेळोवेळी कळविण्यात येईल. तसेच अधिकृत समाजमाध्यम खात्यावरूनही माहिती देण्यात येणार आहे. दरम्यान, चुकीची माहिती पसरविणे हा दंडनीय गुन्हा आहे, खोट्या महितीला बळी पडू नका, सतर्क रहा, मुंबई विद्यापीठाच्या अधिकृत समाजमाध्यम खात्यांना फॉलो करा आणि अधिकृत समाजमाध्यम खात्यांवरील माहितीवरच विश्वास ठेवा, असे आवाहन मुंबई विद्यापीठ प्रशासनाने एक्स (पूर्वीचे ट्विटर) या समाजमाध्यमावर एक पोस्ट करीत केले आहे. बनावट परिपत्रकात नेमके काय?सर्व संबंधित प्राचार्य, परीक्षा नियंत्रक, विभागप्रमुख आणि विद्यार्थ्यांच्या लक्षात आणून दिले जाते की, भारत आणि पाकिस्तान यांच्यात सध्या निर्माण झालेल्या युद्धजन्य परिस्थितीमुळे सुरक्षेच्या कारणास्तव १४ मे २०२५ पासून सुरू होणाऱ्या सर्व विद्यापीठ परीक्षा पुढे ढकलण्यात येत आहेत. ही बाब अत्यंत गंभीर असून, विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आलेला आहे. नवीन परीक्षेच्या तारखा परिस्थिती स्थिर झाल्यानंतर लवकरच विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळावर जाहीर करण्यात येतील. सर्व विद्यार्थ्यांनी आणि संबंधित शैक्षणिक अधिकाऱ्यांनी कृपया अधिकृत घोषणा येईपर्यंत संयम बाळगावा व चुकीच्या अफवांवर विश्वास ठेवू नये, असा संपूर्णतः खोटा मजकूर लिहिण्यात आला आहे.

# मुंबई शिक्षक मतदारसंघ निवडणूक, शिवसेनेच्या (ठाकरे) नेत्याची आमदारकी धोक्यात?

## मोरे यांच्या याचिकेतील दावामुंबई शिक्षक मतदारसंघाचा निकाल १जुलै २०२४ रोजी जाहीर झाला

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ११: मुंबई शिक्षक मतदारसंघासाठी जून २०२४ मध्ये झालेल्या निवडणुकीत शिवसेनेचे (ठाकरे) उमेदवार जे. एम. अभ्यंकर विजयी झाले होते. त्यांच्या निवडणुकीला दुसऱ्या क्रमांकावरील शिक्षक भारतीचे उमेदवार सुभाष सावित्री किसन मोरे यांनी उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. तथापि, अभ्यंकर यांनी मोरे यांची याचिका फेटाळण्याच्या मागणीसाठी केलेला अर्ज उच्च न्यायालयाने शुक्रवारी फेटाळला. त्यामुळे, अभ्यंकर यांच्या निवडणुकीला आव्हान देणाऱ्या मोरे यांच्या याचिकेवर न्यायालय सुनावणी घेणार आहे.न्यायमूर्ती गौरी गोडसे यांच्या एकलपीठाने मोरे यांनी अभ्यंकर यांच्या आमदारकीविरोधात दाखल केलेली निवडणूक याचिका रद्द करण्याची मागणी फेटाळली. तसेच मोरे यांची याचिका सुनावणीसाठी दाखल करून घेत असल्याचे स्पष्ट केले. अभ्यंकर यांनी अपात्र व्यक्तींची मतदार म्हणून बेकायदेशीरपणे नोंदणी केल्याच्या आरोपांवरील आक्षेपांबाबत मोरे यांच्या निवडणूक याचिकेत पुरेशी आणि महत्त्वाची माहिती आहे. त्यामुळे अभ्यंकर यांच्यावर मोरे यांनी निवडणूक याचिकेद्वारे केलेले आरोप सिद्ध झाले, तर या निवडणुकीच्या निकालावर त्याचा परिणाम होईल. तसेच, या पुराव्यांच्या आधारे आवश्यक ती कारवाई केली जाऊ शकते, असे एकपीठाने मोरे यांची निवडणूक याचिका रद्द करण्याच्या मागणीसाठी अभ्यंकर केलेला अर्ज फेटाळताना प्रामुख्याने स्पष्ट केले. दरम्यान, अभ्यंकर यांच्या वतीने वकील वरिष्ठ एम. एम. वशी, तर मोरे यांच्या वतीने वरिष्ठ वकील राजीव पाटील आणि सचिन पुंडे यांनी युक्तिवाद केला होता. त्यांच्या युक्तिवादानंतर एकलपीठाने मार्चमध्ये अभ्यंकर यांच्या अर्जावरील निर्णय राखून ठेवला होता. मोरे यांच्या याचिकेतील दावामुंबई शिक्षक मतदारसंघाचा निकाल १जुलै २०२४ रोजी जाहीर झाला. या निवडणुकीत पहिल्या फेरीच्या मतमोजणीदरम्यान विजयी उमेदवार अभ्यंकर यांना ३०७४ मते, तर मोरे यांना ३०११ मते मिळाली. दोन्ही उमेदवारांमध्ये केवळ ६८ मतांचा फरक होता. हा फरक शेवटून दुसऱ्या फेरीत २०८ मतापर्यंत गेला. अभ्यंकर यांनी आपल्या पदाचा गैरवापर करून मुख्याध्यापकांमार्फत ५८७ अपात्र मतदारांची नोंदणी केल्याचा आरोप मोरे यांनी अभ्यंकर यांच्या निवडणुकाला आव्हान देणाऱ्या याचिकेत केला आहे. तसेच, या अपात्र मतदारांमध्ये शिशुवर्ग, पूर्व प्राथमिक, प्राथमिक आणि काही शिक्षकेतर कर्मचारी यांचा समावेश आहे. काही मतदारांचे वय १८ ते २५ वर्ष असून त्यांना किमान तीन वर्षांचा शिकवण्याचा अनुभव देखील नाही, असेही मोरे यांनी याचिकेत अधोरेखीत केले आहे. तसेच, अभ्यंकर यांची निवड रद्द करून आपल्याला विजयी उमेदवार म्हणून घोषित करण्याची मागणी मोरे यांनी केली आहे.

# विमानतळापर्यंत दळणवळणास चालना

## टर्मिनलपर्यंत थेट पोहोचण्याचा मार्ग लवकरच खुला होण्याचे सिडकोचे संकेत

■ महासागर प्रतिनिधी, नई मुंबई, दि. ११: अदानी समूहाचे सर्वेसर्वा गौतम अदानी यांनी जून महिन्यात नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या पहिला टप्प्यातून प्रवासी वाहतूक सुरू करण्याची घोषणा केली होती. विमानतळ टर्मिनलपर्यंत प्रवाशांना थेट पोहचता यावे यासाठी सिडको महामंडळ आणि राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (एनएचएआय) उत्तम दळणवळणाची सुविधा उभारत असून त्याचे काम अंतिम टप्प्यात आहे. पुढील काही दिवसांत हा मार्ग विमान प्रवास करणाऱ्यांसाठी खुला होणार असल्याचे संकेत सिडकोने शुक्रवारी दिले. विमानतळाला पश्चिमेकडून दळणवळणाची सुविधा प्रदान करण्याकरिता विकसित करण्यात येत असलेल्या पश्चिम प्रवेश आंतरबदलाचे काम जून पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित असल्याचे सिडकोने स्पष्ट केले. यामुळे आम्रमार्ग आणि उलवे सागर किनारी मार्ग येथून विमानतळाकडे ये-जा करणारी वाहतूक सुरळीत होईल.सिडकोतर्फे काही कनेक्टिव्हिटी प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत. अटल सेतू ते विमानतळादरम्यान कनेक्टिव्हिटी निर्माण करण्याकरिता उलवे किनारी मार्ग नियोजित आहे. आम्र मार्ग (राष्ट्रीय महामार्ग ३४८ ए) आणि उलवे किनारी मार्ग येथून विमानतळाकडे ये-जा करणारी वाहतूक सुरळीत चालावी याकरिता एमजेपीआरसीएलच्या प्रकल्पांतर्गत विमानतळ पश्चिम प्रवेश आंतरबदल मार्गाचा समावेश करण्यात आला आहे. पश्चिम प्रवेश आंतरबदल हा उलवे किनारी मार्गाच्या १.२. कि.मी.च्या उन्नत विमानतळ जोड रस्त्याला जोडला आहे. आंतरबदल मार्गावर दोन लूप आणि दोन रॅम्प यांचा समावेश आहे. आम्र मार्गावरून विमानतळाच्या दक्षिण बाजूस जाणाऱ्या वाहतुकीकरिता लूप ए व आम्र मार्गावरून विमानतळाच्या उत्तर बाजूस जाणाऱ्या वाहतुकीकरिता रॅम्प ए चा वापर करता येणार आहे. लूप बी आणि रॅम्प बीद्वारे विमानतळाकडून आम्र मार्गाच्या अनुक्रमे उत्तर व दक्षिणेकडे जाण्याकरिता पर्याय असणार आहे. पश्चिम प्रवेश आंतरबदल मार्ग प्रकल्पांतर्गत एक अतिरिक्त वाहन निम्नमार्ग आणि उलवे नदी परिवर्तित प्रवाहावरील लहान पूल यांचा समावेश आहे. जूनच्या पहिल्या आठवड्यापर्यंत पश्चिम आंतरबदल मार्ग पूर्णत: कार्यान्वित होऊन वाहतुकीकरिता खुला होणे अपेक्षित आहे.परिपूर्ण कनेक्टिव्हिटी लाभावी याकरिता सिडकोतर्फे अनेक कनेक्टिव्हिटी प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत.

# मुंबईभोवती सुरक्षा वाढवली

## समुद्रात नौदलाचा ताफा तैनात



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ११: भारत-पाकिस्तानांच्यातील तणाव सध्या सीमावर्ती राज्यांपुरता मर्यादित असला तरी, पाकिस्तानने केलेल्या दहशतवादी हल्ल्यांचा भूतकाळातील अनुभव लक्षात घेता मुंबईभोवती सुरक्षा वाढवण्यात आली आहे. समुद्र आणि हवाई मार्गाने प्रवेशाचे पर्याय असल्याने सुरक्षेच्या चिंता वाढल्या आहेत, त्यामुळे भारतीय नौदलाने ताफा तैनात केला आहे. याचबरोबर नौदलाने मासेमारी नौका आणि त्यांच्या कर्मचाऱ्यांचीही तपासणी व नोंदणी सुरू केली आहे.मुंबईच्या किनाऱ्याभोवती पूर्णपणे सतर्कता आहे. येथे उत्तर आणि अरबी नौदलाला तैनात करण्यात आले आहे. मच्छीमार बोटी आणि त्यांच्या कर्मचाऱ्यांवरही देखरेख वाढवण्यात आली आहे. त्यांना सतर्क राहण्यास आणि समुद्रात कोणत्याही असामान्य हालचाली आढळल्यास त्यांची माहिती देण्यास सांगितले आहे, असे नाव न सांगण्याच्या अटीवर नौदलाच्या एका अधिकाऱ्याने सांगितले. याबाबत इंडियन एक्सप्रेसने वृत्त दिले आहे. दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर, सर्व बोटी आणि त्यांच्या कर्मचाऱ्यांवर लक्ष ठेवणे आणि त्यांची दररोज तपासणी करणे खूप महत्वाचे आहे, असे या अधिकाऱ्याने पुढे म्हटले आहे. काही दिवसांपूर्वी नौदलाच्या प्रमुखांची मत्स्यव्यवसाय आयुक्तांसोबत बैठक झाली होती. मासेमारी अधिकाऱ्यांना बोटींचा नोंद, तपासणी आणि बोटींची संख्या, त्यांचे मालक आणि बोटीवरील कर्मचाऱ्यांची माहिती दररोज जाहीर करण्यास सांगण्यात आले आहे. याचबरोबर मच्छिमारांनाही सतर्क राहण्याचा सल्ला देण्यात आला आहे, या असे अधिकाऱ्याने सांगितले.२००८ मध्ये मुंबईत दहशतवादी हल्ला झाला होता.अजमल कसाब आणि पाकिस्तानातील त्याच्या इतर नऊ साथीदारांनी समुद्रमार्गे मुंबईत प्रवेश केला आणि शहर आणि देशाला हादरवून टाकणारा दहशतवादी हल्ला केला होता. नौदल कोणताही धोका पत्करू शकत नाही आणि म्हणूनच ते सर्व स्थानिक बोटींवर लक्ष ठेवून आहेत. याचबरोबर दररोज त्यांच्या नोंदी आणि तपासणी करत आहेत. अशा प्रकारच्या दुर्दैवी घटनेचा धोका नेहमीच असतो आणि म्हणूनच बोटींची तपासणी आणि त्यांच्या नोदीं ठेवण्यात येत आहेत,

# दोन एलईडी बोटींवर कारवाई, बंदी असतानाही करंजा किनाऱ्यावर एलईडी तंत्राने मासेमारी



■ महासागर प्रतिनिधी, उरण, दि. ११: करंजा बंदर परिसरात मत्स्यव्यवसाय विभागाच्या परवाना अधिकाऱ्यांनी शुक्रवारी सकाळी छापा टाकत दोन एलईडी मासेमारी बोटींवर कारवाई केली.केंद्र व राज्य सरकारने एलईडी पद्धतीने मासेमारी करण्यास बंदी घातलेली असतानाही या तंत्राचा वापर करीत खोल समुद्रात मासेमारी केली जात आहे.एलईडी पद्धतीने मासेमारी करीत असतांना लाखोंच्या संख्येने मासे जाळ्यात पकडले जातात. यात माशांचे लहान जीवही पकडण्यात येतात. मात्र यातील जीव हे मृत पावतात त्यामुळे पुढील मासे आणि प्रजनन थांबून माशांची व काही ठराविक जातीच्या माशांची संख्याही कमी होऊ लागली आहे. याच कारणास्तव शासनाने या पद्धतीने मासेमारी करण्यास बंदी घातली आहे.

एलईडी मासेमारी पद्धतखोल समुद्रात मासेमारी करण्यासाठी गेल्यावर अतिउच्च दाबाच्या वीज दिव्यांचे सेट घेऊन जात आहेत. हे दिवे समुद्रात सोडण्यात येतात. त्यामुळे या प्रकाशावर आकर्षित होऊन लाखोंच्या संख्येने विविध प्रकारचे मासे जाळ्यात येतात. या प्रकारामुळे जलद व मुबलक मासेमारी करून कमी वेळात जास्तीत जास्त नफा कमावला जात आहे.

करंजा बंदर परिसरात एलईडी मासेमारी करणारे साहित्य असणाऱ्या करंजा आणि पेण तालुक्यातील दादर येथे प्रत्येकी एक अशा दोन बोटींवर कारवाई करण्यात आली आहे. त्यानुसार जिल्हा मत्स्यव्यवसाय उपायुक्त यांच्याकडे हा प्रस्ताव पाठविण्यात येणार आहे. यामध्ये बोटींना साडे पाच लाख रुपयांचा दंड आकारण्याची तरतूद आहे. सुरेश बागुलगावे, परवाना अधिकारी, उरण मत्स्यव्यवसाय विभाग

# पनवेलमध्ये तांदळाची तस्करी, १२७४ गोणी तांदूळ जप्त



**पनवेल :** मुंबई गोवा महामार्गावरील पळस्पे फाटाजवळील ओशियन गेट पार्किंग कंपाऊंडजवळ बुधवारी (७ मे) सायंकाळी साडेचार वाजता सार्वजनिक वितरण व्यवस्थेमधील १२७४ गोणी तांदळाने भरलेला ट्रक पनवेलच्या पुरवठा अधिकाऱ्यांनी पनवेल शहर पोलिसांच्या मदतीने पकडला. हा तांदळाचा साठा खालापूर येथील जय आनंद फुड इंडस्ट्रीज कंपनीचा असल्याचे पोलिसांच्या आतापर्यंतच्या तपासात उघड झाले आहे.गरीब नागरिकांच्या हक्काचा तांदूळ परदेशात पाठविण्यासाठी पनवेल येथे आणणार असल्याची माहिती पुरवठा अधिकारी अश्विनी धनवे यांना मिळाली होती. पुरवठा विभागाच्या कर्मचाऱ्यांसह धनवे यांनी सापळा रचला. पळस्पे येथील ओशियन गेट पार्किंग कंपाऊंड येथे एक ट्रक पोलीस पथकाला सापडला. मात्र तांदळाने भरलेला दुसरा ट्रक तेथून चालकाने पळवला. ट्रकचालक शिवप्रसाद सरोज याच्याकडे पोलिसांनी चौकशी केल्यावर त्याने १२७४ गोणी तांदूळ साठा खालापूर येथील आनंद फूड इंडस्ट्रीजच्या मालकाचा असल्याचे सांगितले. तस्करीसाठी पनवेल सुरक्षित ठिकाण ?जेएनपीटी बंदरमार्गे जल वाहतुकीने देशातील रेशनिंगचा तांदूळ परदेशात पाठविणारी टोळी सक्रिय आहे. पाच वर्षांपूर्वी देखील पनवेल येथील टेक केअर या कंटेनर गोदामात तांदळाचा २२२० गोणी साठा तत्कालीन वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजयकुमार लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली जप्त केला होता. परदेशात तांदळाची तस्करी करून विक्रीसाठी पनवेल हे सुरक्षित ठिकाण मानले जाते.



# खिडकीच्या छिद्रामुळे विमानप्रवास सुरक्षित!

विमानाची खिडकी इतर कोणत्याही वाहनाच्या खिडकीसारखी नसते, तर त्यात हवेचा दाब सांभाळून विमानातल्या प्रवाशांना उच्च दाबापासून वाचवण्याचं तंत्रज्ञान असतं. ही खिडकी प्रत्यक्षात ॲक्रिलिकच्या तीन थरांनी बनलेली असते. बाहेरील थर बाहेरील हवेला तोंड देतो आणि दाब हाताळतो. मधल्या थरात एक लहान छिद्र असते. तुम्ही तुमच्या सीटवरून सर्वात आतल्या थराला स्पर्श करू शकता. मधला थर संपूर्ण प्रणाली सुरक्षित ठेवतो.

विमान उंच जातं, तसतसा वाऱ्याचा जोर अधिक वाढतो. या वाऱ्यामुळे खिडक्यांवर जास्त दाब पडतो. या दरम्यान, काचेतील हे लहानसं छिद्र मदत करतं आणि ते केबिन आणि खिडकीच्या थरातील जागेतील दाबांचं संतुलन राखतं. अशा परिस्थितीत बाहेरील काच दाब सहन करते आणि आतील काच सुरक्षित राहते. शिवाय, विमान थंड हवेत उडतं, तेव्हा हवा वाफेसारखी बनते. अशा वेळी हे छिद्र ओलावा जमा होण्यापासून रोखतं आणि आवश्यक हवा आत आणण्यास मदत करतं. त्यामुळे खिडकी स्वच्छ राहते आणि तुम्ही ३५ हजार फूट उंचीवरूनही बाहेरचं दृश्य स्पष्ट पाहू शकता.

हे लहान छिद्र उड्डाण सुरक्षित आणि सुरळीत ठेवण्यात खूप मदत करतं. बहुतेक प्रवाशांच्वम ते लक्षातही येत नाही; परंतु ही एक स्मार्ट रचना आहे. ती प्रत्येक फ्लाइटमध्ये शांतपणे आपलं काम करत असते. या छोट्या छिद्राला 'ब्लीड होल' असं म्हणतात. ते खिडकीच्या थरांमधील दाब आणि ओलावा कमी करण्यात मदत करतं.

## कॅलिडोस्कोप

# तीन किलोचा 'शरद आंबा'



सोलापुर जिल्ह्यातील माढा तालुक्यात अरन नावाचं एक गाव आहे. इथल्या एका शेतकऱ्याने तर कमालच केली. दत्तात्रय घाडगे नावाच्या या शेतकऱ्याने आपल्या शेतात आंब्यावर विविध प्रयोग करत तीन किलोचा आंबा पिकवला. त्याने या आंब्याला चक्क 'शरद मँगो' असं नाव दिलं आहे. शरद पवार यांच्यावरील अतूट भक्तीमुळे त्याने या आंब्याला शरद पवार यांचं नाव दिलं. आजूबाजूच्या जिल्ह्यातूनही लोक इथे येत असून घाडगे यांच्या आंब्याला मोठी मागणी आली आहे.

घाडगे यांनी याबाबतची माहिती दिली. ते म्हणतात, या जातीच्या प्रत्येक आंब्याचं वजन सरासरी तीन किलो आहे. आमच्या शेतात विविध प्रकारचे आंबे लावले आहेत. केसर, झाडी आणि केळी याच्यावरही ग्राफ्टिंग प्रयोग केला आहे. ही शेती करण्यासाठी शरद पवार मुख्यमंत्री असताना सुरू केलेल्या योजनेचा आधार घेतला. या अनोख्या आंब्याला पेटंटही मिळाल्याचं दत्तात्रय घाडगे यांनी सांगितलं. शरद पवार राज्याचे मुख्यमंत्री असताना त्यांनी फळबाग योजना राबवली होती. या योजनेअंतर्गत घाडगे यांनी आठ एकर शेतात १० हजार केसर आंब्याची रोपं लावली होती. ही रोपं चांगलीच मोठी झाली आहेत. आंब्याचं उत्पादनही मोठ्या प्रमाणात होत आहे. त्यामुळेत घाडगे यांनी माजी केंद्रीय मंत्री शरद पवार यांचं नाव या आंब्याला दिलं आहे.

ते सांगतात, तीन किलोचा आंबा उगवण्यासाठी आम्ही विविध प्रकारच्या आंब्यावर ग्राफ्टिंग केलं. केसर आंब्यावर विविध प्रकारचे प्रयोग केले. होमिओपॅथी खते आणि औषधांचा वापर केला. त्याचा यशस्वी वापर झाल्याने प्रयोग यशस्वी ठरला. देशात पहिल्यांदाच अडीच किलोच्या आंब्याचं उत्पादन झालं. हा आंबा बारामतीतील कृषीमहाविद्यालयातील शास्त्रज्ञांनाही दाखवण्यात आल्याचं घाडगे यांनी सांगितलं.

कल्पकतेतून लागवड केल्याने

गाडगे यांनी आंब्याला शरद मँगो अर्थात शरद आंबा असं नाव दिलं आहे. विशेष म्हणजे घाडगे यांना या आंब्याचं पेटंटही मिळालं आहे.

# पक्ष्यांची गायन स्पर्धा



विविध ठिकाणी संगीत स्पर्धा, संगीत महोत्सवांचं आयोजन केलं जातं. या महोत्सवांमध्ये ठिकठिकाणचे गायक आपली गायकी सादर करतात. अशीच एक संगीत स्पर्धा थायलंडमधल्या नारथीवाटमध्ये होते. इथेही मोठ्या संख्येने गायक येतात. पण हे गायक साधेसुधे नसतात. या संगीत स्पर्धेत पक्षी सहभागी होतात. म्हणजेच ही पक्ष्यांची संगीत स्पर्धा आहे. थायलंडसह सिंगापूर आणि मलेशियातले पक्षीही या स्पर्धेत सहभागी होतात. १८०० पेक्षा जास्त पक्षी या स्पर्धेत सहभागी होतात. यासाठी पक्ष्यांना चार महिन्यांचं प्रशिक्षण दिलं जातं. बुलबुल, पोपट, कबुतर आणि इतर छोटे पक्षीही या स्पर्धेत सहभागी होतात. या स्पर्धेच्या चार फेऱ्या असतात. प्रत्येक फेरीत पक्ष्यांना तीन वेळा २५ सेकंद गायचं असतं. या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या पक्ष्यांना पंधरा फूट उंची खांबावरच्या एका पिंजऱ्यात ठेवलं जातं. हे पिंजरे खाली घेऊन त्यांना गायला सांगितलं जातं. गाण्यानुसार पक्ष्यांना गुण दिले जातात. सर्वात जास्त गुण मिळालेला पक्षी विजेता ठरतो. त्याला म्हणजे त्याच्या मालकाला भारतीय चलनात दीड लाख रुपयांचं बक्षिस दिलं जातं. पक्ष्यांची ही गायन स्पर्धा थायलंडमधलं एक आकर्षण आहे.

# दिल्लीत सदनिका शंभर कोटींना?



मुंबई हे देशातलं सर्वात महागडं शहर मानलं जातं. इथे अनेक उच्चभ्रू गृहसंकुलं आहेत. मात्र भारतातील सर्वात महागडी हौसिंग सोसायटी दिल्लीत आहे. इथे एका फ्लॅटची किंमत १०० कोटींच्या आसपास आहे. 'डीएलएफ कॅमेलियास' असं या सोसायटीचं नाव आहे. ही सोसायटी भारतातील सर्वात महागड्या निवासी सोसायट्यांपैकी एक आहे. देशातील आघाडीचे उद्योगपती, 'सीईओ', गुंतवणूकदार आणि भरपूर संपत्ती असलेल्या व्यक्ती इथे राहतात.

या सोसायटीमधील आलिशान घरांचे आतील भाग पूर्णपणे पांढऱ्या रंगाच्या थीममध्ये आहेत. घरांचे इंटेरियर एखाद्या महालालाही लाजवेल असे आहे. घरं दोन भागात विभागलेली आहेत. पहिला भाग म्हणजे स्पेशल लिव्हिंग एरिया. दुसरा भाग खास कुटुंबासाठी डिझाइन केलेला 'प्रायव्हेट एरिया' आहे. घरात एक मास्टर बेडरूम, सेकंडरी रूम, बार एरिया, लाउंज असून डिनरसाठी खास अरेंजमेंट करण्यात आली आहे. या अपार्टमेंटची सर्वात खास गोष्ट म्हणजे ७२ फूट लांबीची काचेची बाल्कनी. ही बाल्कनी संपूर्ण घराचा केंद्रबिंदू आहे. इथे डायनिंग एरियासह आणखी बरंच काही आहे. या बाल्कनीत एकावेळी चक्क ५० लोक बसू शकतात. या सोसायटीचं 'कॅमेलियास' हे नाव आशियातील एका दुर्मिळ आणि सुंदर फुलांच्या प्रजातीवरून ठेवण्यात आलं आहे. डीएलएफच्या 'द अरालियास' आणि 'द मॅग्नोलियास' या दोन लक्झरी प्रकल्पांच्या यशानंतर हा प्रकल्प सुरू करण्यात आला. लाँचच्या वेळी त्याची किंमत २२,५०० रुपये प्रति चौरस फूट होती, पण आज ती ८५,००० रुपये प्रति चौरस फूट झाली आहे.

# अखंड जळतोय बल्ब

घरातली ट्यूब किंवा बल्ब काही काळानंतर बंद पडतो. बल्ब किंवा ट्यूब दोन ते तीन वर्षं चालतात. पण जगातला एक बल्ब १२४ वर्षांनंतरही सुरूच आहे. या बल्बला 'सेंटेनियल' असं नाव देण्यात आलं आहे. हा बल्ब म्हणजे एक चमत्कारच आहे. सर्वाधिक काळ सुरू असणाऱ्या या बल्बची नोंद गिनिज बुकमध्ये करण्यात आली आहे. कॅलिफोर्नियातल्या लिव्हरमोर शहरातल्या अग्निशमन दलाच्या केंद्रातला हा बल्ब अनेकांसाठी आकर्षणाचं केंद्र आहे. शेल्बी कंपनीने हा बल्ब तयार केला होता. १९०१ मध्ये हा बल्ब पहिल्यांदा पेटवण्यात आला. तेव्हापासून आजपर्यंत हा बल्ब सुरूच आहे. १९३७ मध्ये वायर बदलण्यासाठी हा बल्ब काही काळ बंद होता. पण नंतर तो पुन्हा सुरू करण्यात आला. त्यानंतर तो अखंड सुरूच आहे. विशेष म्हणजे हा बल्ब २४ तास सुरू असतो. २००१ मध्ये या बल्बला १०० वर्षं पूर्ण झाल्यानिमित्ताने विशेष समारंभाचं आयोजन करण्यात आलं होतं. २०१३ मध्ये हा बल्ब बंद पडला होता. पण यामागे काही तांत्रिक कारणं होती. तांत्रिक बिघाड दूर केल्यानंतर बल्ब पुन्हा सुरू झाला.



# ते करतात फर्निचरची शेती

लाकडी फर्निचर बनवण्यासाठी झाडं तोडली जातात. ५० वर्षं जुन्या झाडांपासून फर्निचर बनवण्याऐवजी झाडालाच फर्निचरचा आकार दिला तर... हे जास्त सोपं आणि पर्यावरणपूरक असेल हा विचार इंग्लंडमधल्या गेविन आणि ॲलिस मुन्रो यांच्या मनात आला आणि त्यांनी चक्क फर्निचरची शेती करायला सुरुवात केली. फर्निचरची शेती हे ऐकायला थोडं विचित्र वाटतं. पण हे प्रत्यक्षात घडतंय. आजवर या जोडप्याने ५० सोफे, १०० लॅम्प शेड आणि २५० खुर्च्यांची लागवड केली आहे. हे कसं घडू शकतं, हा प्रश्न तुम्हाला पडला असेल. फर्निचरची शेती करायची म्हणजे रोपट्यांनाच फर्निचरचा आकार द्यायचा. रोपट्यांची लागवड केल्यानंतर त्यांना फर्निचरच्या आकारात वाकवलं जातं. गेविनने २००६ मध्ये ही संकल्पना राबवली. त्याने सुरुवातीला अशा पद्धतीने खुर्च्या लावल्या आणि मग ही शेती मोठ्या प्रमाणावर सुरू झाली. २०१२ मध्ये गेविनने ॲलिसशी लग्न केलं. तिलाही गेविनची कल्पना खूपच आवडली. मग त्यांनी कंपनी सुरू केली. गेविनने बोन्सायचं रोपटं बघितलं होतं. या रोपट्याचा आकार खुर्चीसारखाच होता. हे रोपटं बघून गेविनला ही कल्पना सुचली. रोपट्यांना फर्निचरचा आकार देणं खूप कठीण असतं. यासाठी रोपट्यांच्या फांद्यांना फर्निचरप्रमाणे वाकवावं लागतं. गेविन आणि त्यांची पत्नी ॲलिस आता या कामात तरबेज झाले आहेत.अशा पद्धतीने खुर्ची बनवण्यासाठी जवळपास आठ ते नऊ महिन्यांचा काळ लागतो. मग ही खुर्ची वाळवावी लागते. त्यासाठीही तेवढाच काळ लागतो. त्यामुळे हे काम वेळखाऊ आणि मेहनतीचं आहे.



# नोकरीसाठी पदव्या आणि गुण निकामी?

जगातील अनेक लोक नोकरी मिळविण्याच्या शर्यतीत व्यस्त आहेत; पण बरेचदा नोकरीसाठी पदवी आणि अभ्यासातील गुणांचा उपयोग होत नाही.

सध्या 'सोशल मीडिया'वर एक पोस्ट व्हायरल होत आहे. त्यात दिल्ली विद्यापीठातील एक विद्यार्थिनी आपली व्यथा मांडताना दिसते. 'अनेक पदके आणि प्रमाणपत्रे असूनही मला इंटर्नशिप मिळत नाही', असं बिस्मा नावाची दिल्ली विद्यापीठाची ही विद्यार्थिनी सांगते. तिच्या 'लिंक्डइन पोस्ट'ने सर्वांना आश्चर्यचकित केले आहे. ती पुढे म्हणते माझ्याकडे अनेक ट्रॉफीज आहेत. आपण त्या खूप कष्टाने जिंकल्या आहेत. याशिवाय माझ्याकडे ५० हून अधिक प्रमाणपत्रे आहेत; मात्र त्यांचा उपयोग केवळ कागदाच्या तुकड्यांएवढाच राहिला आहे.

एका पोस्टमध्ये बिस्मा म्हणते, उच्च गुण आणि पदवी असूनही इंटर्नशिप मिळत नाही. ५० प्रमाणपत्रे आणि १० पदके असूनही दिल्ली विद्यापीठाची ही विद्यार्थिनी इंटर्नशिपसाठी दारोदार भटकत आहे. बिस्माने आपल्या पोस्टमध्ये लिहिले आहे, तुम्ही पुस्तके जाळून टाका असं मी म्हणत नाही: परंतु एक कौशल्य निवडणं आणि त्यात तज्ज्ञ बनणं महत्त्वाचं आहे. त्यानंतर, संधी तुमच्याकडे चालून येतील.

ही पोस्ट 'सोशल मीडिया'वर व्हायरल होताच लाखो लोकांनी पाहिली आणि अनेकजण आता पोस्टवर कॉमेंटही करत आहेत. एका यूजरने लिहिले, आम्हीही या परिस्थितीतून गेलो आहोत, तुमची जिद्द सोडू नका. दुसरा यूजर लिहीतो, प्रमाणपत्रे मुलाखतींमध्ये उपयुक्त असतात, तर कौशल्ये करिअर घडवण्यात मदत करतात. याशिवाय अनेक यूजर्सनी लिहिले की त्यांना अनेक महिने फ्री इंटर्नशिप करावी लागली




# जनावरांनाही पडतं स्वप्न

आपण झोपेत स्वप्नं पाहतो, काही चांगली तर काही भयानक. पण आपल्या घरातला कुत्रा किंवा मांजरदेखील स्वप्न पाहू शकतात, असा विचार तुम्ही कधी केला आहे? हो, हे सत्य आहे! माणसांप्रमाणेच काही जनावरांनादेखील स्वप्नं पडतात, असं वैज्ञानिक संशोधनांमधून समोर आलं आहे. विशेषतः कुत्रा आणि मांजरांसारख्या पाळीव प्राण्यांमध्ये स्वप्नं पाहण्याचं प्रमाण अधिक आढळतं. चला, या विषयाविषयी अधिक जाणून घेऊया.

वैज्ञानिकांच्या मते, झोपेत असताना मेंदूचा एक भाग सक्रिय असतो. त्यामुळे शरीराच्या मानसिक प्रक्रिया आणि स्वप्नांचे अनुभव सुरू राहतात. १९५० मध्ये वैज्ञानिकांनी 'रॅपिड आय मूव्हमेंट' (रेम)चा शोध लावला. हा झोपेचाच एक प्रकार असून या (रेम) काळात आपण स्वप्नं पाहत असतो. 'रेम' काळात माणसांसोबतच कुत्रं आणि मांजरदेखील स्वप्नं पाहतात. 'रेम' ही झोपेची अवस्था माणसांप्रमाणेच अन्य सस्तन प्राणी, पक्षी आणि काही सरपटणारे प्राणीदेखील अनुभवतात.

कधी कधी आपल्या घरातील कुत्रं किंवा मांजर झोपेत दचकून उठतं किंवा अचानक पाय हलवतं. हे स्वप्न पाहण्याचं लक्षण आहे. कुत्रं झोपेत भुंकत असेल किंवा पाय हलवत असेल, तर ते स्वप्नात एखाद्या प्राण्याचा पाठलाग करत असू शकतं. त्याचप्रमाणे, मांजर झोपेत 'म्याऊ' करत असेल, तर तेदेखील काही चांगलं किंवा भयानक स्वप्न पाहत असू शकतं.

वैज्ञानिकांच्या मते जनावरांनादेखील चांगली आणि वाईट स्वप्नं पडतात. चांगली स्वप्नं म्हणजे, ते कदाचित आपल्या आवडत्या खेळण्याशी खेळत असू शकतात किंवा मजा करत असू शकतात. भयानक स्वप्न पडले, तर ते घाबरतात आणि झोपेत विचित्र हालचाली करतात.

प्रत्येक प्राणी आपल्या मानसिक आणि शारीरिक अनुभवाच्या आधारावर स्वप्नं पाहतो. कुत्रं किंवा मांजर जर भयानक स्वप्न पाहत असतील, तर दचकून उठतात किंवा विचित्र हालचाली करतात. यामुळे त्यांच्या शरीराची ऊर्जा आणि मानसिक स्थिती प्रभावित होऊ शकते. तथापि, स्वप्न हा एक मानसिक प्रक्रियांचा भाग आहे आणि यामुळे कोणत्याही प्रकारचा धोका नाही. तुम्ही घरी असलेल्या पाळीव प्राण्यांच्या स्वप्नांचा अनुभव घेत असाल, तर पुढच्या वेळेस त्यांचं झोपेत दचकणं किंवा हलणं अधिक समजून घेऊ शकता. खरं तर, हे सर्व त्यांच्या मानसिक स्थितीचं आणि शारीरिक प्रक्रियेचं लक्षण असू शकतं.



# भाड्याने घ्या मित्रमैत्रिणी

सोशल मीडियाने अनेकांना वेड लावलं आहे. फक्त भारतातच नाही तर जगभरातच सोशल मीडियाची प्रचंड क्रेझ आहे. फेसबुक, इन्स्टाग्रामवर विविध फोटो पोस्ट केले जातात. पण प्रत्येक वेळी धमाल करण्यासाठी कोणी भेटेलच याची खात्री नसते. मित्रमैत्रिणी, नातेवाईक आपापल्या कामात व्यस्त असतात. मग अशावेळी करायचं तरी काय, धमाल करायची तरी कोणासोबत आणि फोटो पोस्ट तरी कसे करायचे असे प्रश्न पडत रहातात. पण सध्याच्या काळात सगळ्या सोयीसुविधा उपलब्ध आहेत. सोशल मीडियावर फोटो अपलोड करण्यासाठी तुम्ही मित्रमैत्रिणी भाड्याने घेऊन शकता. जपानमधल्या कंपनीने ही सोय उपलब्ध करून दिली आहे. या भाड्याच्या मित्रमैत्रिणींसोबत तुम्ही मजा करू शकता, भरपूर फोटो काढू शकता आणि हे फोटो सोशल मीडियावर अपलोडही करू शकता. 'रिअल अपील' या कंपनीने ही संकल्पना राबवली आहे. या कंपनीतले कर्मचारीच मित्रमैत्रिणी म्हणून जातात. त्यांच्यासोबत दोन तास घालवण्यासाठी आठ हजार येन म्हणजे पाच हजार रुपये मोजावे लागतात. या मित्रमैत्रिणींसोबत तुम्ही कितीही फोटो काढू शकता आणि सोशल मीडियावर अपलोडही करू शकता. या भाड्याच्या मित्रमैत्रिणींच्या प्रवासाचा आणि खाण्यापिण्याचा खर्च ग्राहकांनाच करावा लागतो. काळ आता बराच बदलला आहे. म्हणूनच सोशल मीडियावर फोटो अपलोड करण्यासाठी मित्रमैत्रिणी भाड्याने घेण्याची वेळ आली आहे.



# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची आमदारकी धोक्यात?



## काँग्रेसचे उमेदवार प्रफुल्ल गुडधे पाटील यांनी उच्च न्यायालयात दाखल केली याचिका

**■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ११ :**
विधानसभा निवडणुकीत घोळ झाल्याची शंका व्यक्त करत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विजयाला आव्हान देणारी निवडणूक याचिका मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात दाखल करण्यात आली आहे. नागपूर दक्षिण-पश्चिम विधानसभा मतदारसंघातून फडणवीस यांनी विजय प्राप्त केला होता.

काँग्रेसचे उमेदवार प्रफुल्ल गुडधे पाटील यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल करत फडणवीस यांची आमदारकी रद्द करण्याची विनंती केली आहे. उच्च न्यायालयाने यप्रकरणात देवेंद्र फडणवीस यांना समन्स बजावत जबाब नोंदविण्याचे आदेश दिले होते. फडणवीस यांनी आता उच्च न्यायालयात अर्ज दाखल करत भूमिका स्पष्ट केली आहे.

दक्षिण-पश्चिम नागपूर मतदारसंघातून जिंकलेले मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याविरुद्ध प्रफुल्ल गुडधे, दक्षिण नागपूरमधून जिंकलेले मते यांच्याविरुद्ध गिरीश पांडव, चंद्रपूर जिल्ह्यातील चिमूरमधून जिंकलेले भांगडिया यांच्याविरुद्ध सतीश वारजूरकर, बल्लारपूरमधून विजयी झालेले मुनगंटीवार यांच्याविरुद्ध संतोषसिंग रावत , राजुरा येथून जिंकलेले भोंगळे यांच्याविरुद्ध सुभाष धोटे यांनी निवडणूक याचिका दाखल केली आहे. या सर्वांची निवड अवैध ठरवून रद्द करण्यात यावी, अशी याचिकाकर्त्यांची मागणी आहे.

फडणवीस व इतरांनी या निवडणूक याचिकांना दिवाणी प्रक्रिया संहितेतील सातव्या प्रवर्गातील नियम ११ अंतर्गत विरोध केला आहे. या निवडणूक याचिका लोकप्रतिनिधित्व कायद्यातील कलम ८१ (१) मधील निकष पूर्ण करीत नाहीत.

त्यामुळे सुरुवातीच्या टप्प्यातच त्या फेटाळून लावा, असे फडणवीस व इतरांनी संबंधित अर्जात म्हटले आहे. या याचिका गुणवत्ताहीन असल्याचा दावा करत त्या फेटाळून लावण्याची विनंती फडणवीस यांच्यासह इतर आमदारांनी न्यायालयात केली आहे. न्यायालयाने याचिकाकर्त्यांना या अर्जावर येत्या १० जूनपर्यंत उत्तर सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.

### फडणवीसांवर आरोप काय?

निवडणुकीत कायदेशीर प्रक्रियेचे पालन करावे लागते. मात्र, ईव्हीएमने निवडणूक घेण्यापूर्वी या कायदेशीर प्रक्रियेची पूर्तता निवडणूक आयोगाने केली नाही. ईव्हीएमने निवडणूक घ्यायची असल्यास काही निकष देण्यात आले होते. याची कारणेही स्पष्ट करावी लागतात. तेसुद्धा केले नाही. एवढेच नव्हे तर ईव्हीएमने निवडणूक घेण्यासाठी नोटिफिकेशनसुद्धा निवडणूक आयोगाने काढले नसल्याचा आरोप याचिकाकर्ते गुडधे यांनी याचिकेत केला. निवडणुकीच्या निकालानंतर पराभूत उमेदवारांनी मागणी केल्यानंतरही सीसीटीव्हीचे फुटेज, फॉर्म नंबर १७ दिले जात नाही. पाच व्हीव्हीपॅटची फेरमोजणी करण्यास मान्यता आहे. अनेकांनी याकरिता पैसे भरले आहेत. मात्र, व्हीव्हीपॅटची मोजणीसुद्धा केली जात नाही, असेही याचिकेत नमूद करण्यात आले.

# महापालिका निवडणुकीच्या तोंडावर शहर भाजपवर वर्चस्वासाठी रस्सीखेच

**■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ११ :**
आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहर अध्यक्षपद आपल्या गटाकडे असावे यासाठी नागपूर भाजपमध्ये प्रचंड रस्सीखेच आहे. विद्यमान अध्यक्ष बंटी कुकडे गडकरी समर्थक मानले जातात. आता आ. प्रवीण दटके यांचे नाव अचानक या पदासाठी पुढे आले आहे. आ. दटके माजी महापौर आहेत. त्याही पेक्षा ते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे कट्टर समर्थक आहेत हे महत्त्वाचे आहे.

दरम्यान शहर अध्यक्ष निवडण्याची प्रक्रिया पूर्ण झाली असून तीन नावे पक्षश्रेष्ठींकडे पाठवण्यात आली आहेत. सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार तीन नावांपैकी कोणाला अध्यक्ष करायचे याबाबत नेत्यांमध्ये सहमती होत नाही. महापालिका निवडणूक काळात शहर अध्यक्षपद आपल्या गटाकडे राहावे असा आग्रह एका गटाचा आहे. रस्सीखेचे हे सुद्धा एक कारण आहे. २००७, २०१२ आणि २०१७ अशा सलग तीन निवडणुका जिंकून भाजपने १५ वर्ष नागपूर महापालिकेवर सत्ता राखी. मार्च २०२२ पासून आतापर्यंत प्रशासकीय राजवट सध्या सुरू आहे. राज्यात भाजप सरकारच असल्याने अप्रत्यक्ष भाजपची सत्ता आहे. त्यामुळे आता होऊ घातलेल्या महापालिका निवडणुकीत भाजपला त्यांची सत्ता राखणे आवश्यक आहे. त्यासाठी त्यांना कुठल्याही परिस्थितीत महापालिका निवडणूक जिंकावी लागणार आहे. या प्रक्रियेत पक्षपातळीवर शहर भाजप अध्यक्ष हे पद महत्त्वाचे ठरते. त्यामुळे ते आपल्याच गटाकडे असावे, असा भाजपमधील दोन प्रमुख गटांचा प्रयत्न

राज्याच्या राजकारणात भाजपमध्ये महत्त्वाचे असणारे तीन प्रमुख नेते नागपूरचे आहेत. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेश भाजप अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी या तीन नेत्यांमध्ये समावेश आहे. गडकरी नागपूरचे खासदार आहेत तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा विधानसभा मतदारसंघ दक्षिण पश्चिम हा नागपुरातील आहे. त्यामुळे महापालिकेतील विजय हा जसा नेत्यांचा असेल तसाच पराभव झाल्यास तो नेत्यांचा मानला जातो. या पूर्वी पदवीधर मतदारसंघात भाजपला पराभवाचा सामना करावा लागला होता. ती नामुष्की महापालिका निवडणुकीत येऊ नये यासाठी ही निवडणूक भाजपसाठी महत्त्वाची आहे. पक्षातर्फे शहर अध्यक्षपदासाठी तीन नावे वरिष्ठांकडे पाठवण्यात आली. त्यात आ. प्रवीण दटके, माजी स्थायी समिती अध्यक्ष नरेंद्र उर्फ बाल्या बोरकर व विद्यमान प्रदेश उपाध्यक्ष संजय भेंडे यांचा समावेश आहे. संजय भेंडे हे नाव तटस्थ आहे. बोरकर पूर्वी आ. खोपडे समर्थक होते. आता नाही. हे येथे उल्लेखनीय. शहर अध्यक्षांच्या नावाची आतापर्यंत होणे अपेक्षित होते.

### आ. प्रवीण दटके की संजय भेंडे?

महापालिका निवडणुकीत भाजप नेते नितीन गडकरी सक्रिय भूमिका बजावतात. ते पक्षाचे ज्येष्ठ नेते असल्याने त्यांनी घेतलेला निर्णय अंतिम मानला जायचा. २०१७ च्या निवडणुकीत असेच चित्र होते. २०१९ नंतर चित्र बदलले. शहर अध्यक्षपदाच्या स्पर्धेत फडणवीस समर्थक आ. दटके यांचे नाव येणे यातच सर्व काही आले आहे.

# नवे प्रयोग, नव्या कल्पना आणि निवेदनांची गर्दी
# नितीन गडकरी यांचा जनसंपर्क कार्यक्रम

**■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ११ :**
केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या जनसंपर्क कार्यक्रमाला नागपूरसह संपूर्ण महाराष्ट्राच्या विविध भागातील तसेच इतर राज्यांमधील नागरिकांनीही हजेरी लावली. कुणी नव्या प्रयोगांचे प्रेझेंटेशन दिले. तर कुणी कृषी, आयटी आदी क्षेत्राच्या प्रगतीसाठी नव्या कल्पना गडकरी यांच्यापुढे मांडल्या. मंत्री महोदयांनी प्रत्येकाशी संवाद साधला व प्रयोगांचे कौतुक केले.



खामला येथील जनसंपर्क कार्यालयात आयोजित या कार्यक्रमासाठी नागरिकांनी सकाळपासूनच गर्दी केली होती. विविध क्षेत्रातील नागरिकांनी आपल्या अडीअडचणी, समस्या आणि मागण्या थेट मंत्री महोदयांपुढे मांडल्या. विशेषतः दिव्यांग नागरिकांनी कृत्रिम अवयवांच्या उपलब्धतेसाठी निवेदन सादर केले. नितीन गडकरी यांनी सकारात्मक प्रतिसाद देत तात्काळ सहकार्य करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

यावेळी रोडमार्क फाउंडेशन या संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी माझा रस्ता माझा मित्र... माझा रस्ता अपघातमुक्त रस्ता या महत्वाकांक्षी उपक्रमाची माहिती नितीन गडकरी यांना दिली. या उपक्रमाच्या पोस्टरचे अनावरण मंत्री महोदयांच्या हस्ते झाले. रस्ते सुरक्षा आणि अपघातमुक्त नागपूर या संकल्पनेला बळकटी देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येणार आहे.

नागपूर आणि विदर्भातील रस्त्यांचा दर्जा सुधारण्याबरोबरच नागरिकांनी वाहतुकीच्या नियमांचे काटेकोर पालन करणे आवश्यक आहे. रस्ते अपघातांची संख्या कमी करण्यासाठी सर्व स्तरांवर जनजागृती आवश्यक आहे. त्यादृष्टीने हा उपक्रम उत्तम असल्याची पावती नितीन गडकरी यांनी फाउंडेशनचे प्रमुख राजू वाघ यांना दिली. कार्यक्रमाला विविध सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी देखील विविध मागण्यांसाठी नितीन गडकरी यांना भेटले.

# पैशांच्या व्यवहारातून वाद
## पाच जणांनी तरुणाला चाकूने भोसकले

**■ महासागर प्रतिनिधी, यवतमाळ , दि. ११ :**
पैशांच्या व्यवहारातून झालेल्या वादात पाच जणांनी चाकूने वार करत तरूणाचा खून केला. ही घटना पुसद येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात घडली. सुमित सुरेश पवार (२७), रा. नवलबाबा वार्ड, पुसद असे मृताचे नाव आहे. या प्रकरणी पोलिसांनी चार जणांना अटक केली असून त्यातील एकजण विधीसंघर्षग्रस्त बालक आहे. एक आरोपी फरार आहे.

या प्रकरणी मृताचा भाऊ शुभम पवार याने पुसद शहर पोलिसात या प्रकरणी तक्रार दाखल केली. पोलिसांनी देव दिलीप श्रीरामे (१९), दर्शन दिलीप श्रीरामे (१८), प्रेम दीपक हाके (१९) तिघेही रा. शिवाजी वार्ड, पुसद यांच्यासह एका विधीसंर्घषग्रस्त बालकास अटक केली. चारूतोष राठोड, रा. नाईक चौक हा पसार झाला. आरोपींविरूद्ध खुनासह अनुसूचित जाती, जमाती प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पैशांच्या व्यवहारावरून नितीन तुंडलायत याचा देव श्रीरामे याच्यासोबत शुक्रवारी रात्री वाद झाला. त्यानंतर नितीन तुंडलायत, सुमित पवार, शुभम पवार, नयन तुंडलायत, आदित्य सोनवाल, रोहन जाधव, राहुल तुंडलायत हे तरूण डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात उभे असताना, दोन दुचाकींवरून आलेल्या पाच आरोपींनी सुमितच्या पाठीत चाकूने वार केले.

त्याच्या बचावासाठी धावलेल्या नितीन तुंडलायत, शुभम पवार, नयन तुंडलायत यांच्यावरही वार केले. हल्ल्यात सुमित पवारचा जागीच मृत्यू झाला, तर नितीन तुंडलायत गंभीर जखमी झाला, त्याला उपचारासाठी नांदेड येथे पाठविण्यता आले आहे.

# नागपूरला पर्यायी राजधानी घोषित करा

### काँग्रेस नेत्याची मागणी

**■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ११ :**
भारत-पाकमधील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसचे ज्येष्ठ नेते विलास मुत्तेमवार यांनी नागपूरला पर्यायी राजधानीचा दर्जा देण्याची मागणी केली आहे. राजधानी दिल्लीला असणारा संभाव्य धोका लक्षात घेता आपत्कालीन पर्यायी म्हणून महाराष्ट्राची उपराजधानी नागपूरचा विचार देशाची राजधानी म्हणून करावा. ही मागणी लोकसभेत अनेकदा केली आहे. आज भारत-पाकच्या तणावाच्या स्थितीतही माझी हीच मागणी आहे, असे ते म्हणालेत.

भारत - पाकमध्ये सध्या शस्त्रसंधीची घोषणा झाली आहे. पण त्यानंतरही पाकने भारतावर गोळीबार सुरू केला आहे. भारतही पाकला चोख प्रत्युत्तर देत आहे. त्यामुळे हा वाद आता अधिक टोकाला पोहोचण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. या पार्श्वभूमीवर अशातच आता माजी खासदार आणि ज्येष्ठ काँग्रेस नेते विलास मुत्तेमवार यांनी सुरक्षेच्या कारणास्तव नागपूरला देशाची पर्यायी राजधानी करण्याची मागणी केली आहे.

विलास मुत्तेमवार रविवारी नागपुरात पत्रकारांशी बोलताना म्हणाले की, नागपूरला पयार्यी राजधानी घोषित करण्याची मागणी मी २००१ व २०१३ मध्ये संसदेत केली होती. त्यानंतर महिन्याभरातच संसदेवर हल्ला झाला होता. तत्कालीन पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्याकडेही ही मागणी आम्ही केली होती. नागपूर हे देशाच्या मध्यभागी असणारे शहर आहे. त्यामुळे संभाव्य परिस्थिती पाहता आपत्कालीन पर्यायी राजधानी म्हणून नागपूरची घोषणा करावी.

# १२ तरुणींना प्रेमाच्या जाळ्यात ओढून
## दुसऱ्या प्रेयसीवर अनैसर्गिक अत्याचार

**■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ११ :**
एका रियल इस्टेट कंपनीत मोठ्या पदावर कार्यरत असल्याचे सांगून कामठीतील एका तरुणाने एक नव्हे तर तब्बल १२ उच्चशिक्षित तरुणींना प्रेमाच्या जाळ्यात ओढले. सर्व तरुणींना लग्नाचे आमिष दाखवून एकीशी लग्नसुद्धा केले. दुसऱ्या प्रेयसीवर अनैसर्गिक अत्याचार केला. या प्रकरणी पिडीत प्रेयसीच्या तक्रारीवरुन प्रियकरावर गुन्हा दाखल करुन अटक करण्यात आली. अर्जून राजेंद्र कनोजे (३०, रा. कामठी) असे अटकेतील आरोपीचे नाव आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित तरुणी जानव्ही (बदललेले नाव) उच्चशिक्षित असून ती एका मोठ्या आयटी कंपनीत नोकरीवर आहे. तिला २०२० मध्ये कळमेश्वरला भूखंड घ्यायचा होता, त्यामुळे तिने शिवांश नावाच्या मित्राशी संपर्क केला होता. त्याचवेळी आरोपी युवक अर्जून कनोजे हासुद्धा सोबत आला होता. तेव्हापासून दोघेही एकमेकांच्या संपर्कात होते. अर्जून हा एका युनिटी प्रॉपर्टी डिलिंग कंपनीत नोकर होता. मात्र, त्याने कंपनीत मोठ्या पदावर कार्यरत असल्याचे सांगून जानव्हीला प्रेमाच्या जाळ्यात ओढले. त्याने विवाहित असल्याची बाब जान्हवीकडून लपून ठेवली.

अर्जूनची नजर जानव्हीच्या गलेलठ्ठ पगारावर होती. त्याने १८ डिसेंबर २०२४ मध्ये रात्री नऊ वाजता त्याने फिरायला जाण्याच्या बहाण्याने जानव्हीला कन्हान-रामटेक रोडवरील व्हिला ओयो हॉटेलवर नेले. तेथे तिला शारीरिक संबंधाची मागणी केली. मात्र, तिने नकार दिला असता लग्नाचे आमिष दाखवून बळजबरीने तिच्यावर बलात्कार केला. शारीरिक संबंध करताना मोबाईलने जानव्हीचे नग्न फोटो आणि न्यूड व्हिडिओ काढले. त्यानंतर तो वारंवार तिला अनैसर्गिक शारीरिक संबंध ठेवण्यासाठी बळजबरी करीत होता. त्याला नकार दिल्यास तो सोशल मिडीयावर न्यूड व्हिडिओ टाकण्याची धमकी देत होता.

जानव्हीला लग्नाचे आमिष देऊन तो रोज पैसे उकळायला लागला. जानव्ही अचानक त्याच्या घरी गेली असता तो विवाहित असल्याचे समजले. एका महिला पोलीस कर्मचाऱ्याशी त्याचे लग्न झाले असून तिच्यावरसुद्धा तो अत्याचार करीत होता.

### प्रेयसीचा गर्भपात

जानेवारी २०२५ ला त्याने जानव्हीला शिर्डीला देवदर्शनाला नेले. तेथे लग्न करण्याचे आमिष दाखवले. मात्र, तेथे हॉटेलमध्ये नेऊन लैंगिक अत्याचार केला. जानव्ही गर्भवती झाल्यामुळे तिने लग्न करण्याची गळ घातली असता त्याने लग्नास नकार दिला. तसेच तिला जबर मारहाण केली. त्यामुळे तिचा गर्भपात झाला. सर्व विसरुन जानव्हीने लग्न करण्याचे ठरविले असता त्याने विरोध करुन तिचे अश्लिल फोटो व्हायरल करण्याची धमकी दिली. त्यामुळे जानव्हीने कन्हान पोलीस ठाण्यात तक्रार दिली. पोलिसांनी गुन्हा दाखल करुन अर्जून कनोजे याला अटक केली.

# नागपुरातून १३ मे ला सुरू होणार विदर्भ संकल्प पदयात्रा

**■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ११ :**
नागपूरस्वतंत्र विदर्भ राज्याची मागणी कायम निकाली निघण्याच्या दृष्टीने लोक सहभाग वाढावा या हेतूने १३ मे २०२५ रोजी दुपारी १ वाजता विदर्भ चंडिका, नागपूर येथून विदर्भ संकल्प पदयात्रा निघणार असून, २५ मे २०२५ रोजी अभियंता भवन, अमरावती येथे समारोप होणार असल्याची माहिती विदर्भ राज्य आंदोलन समितीने दिली आहे.

विदर्भातील जनता ४ वर्ष द्विभाषक मुंबई राज्यात राहून व ६५ वर्ष मराठी भाषकांच्या राज्यात राहूनही तहानलेली आहे. नागपूर करारात कबूल केल्याप्रमाणे सिंचनाचा २३ टक्के निधी न मिळाल्यामुळे, ६०,००० कोटींचा अनुशेष भरून न निघाल्यामुळे विदर्भातील १३१ धरणे पूर्ण होऊन १४ लाख हेक्टर जमीन पाण्याखाली येऊ शकली नाही. तसेच सार्वजनिक आरोग्य, उद्योग, ऊर्जा, रस्ते, पिण्याचे पाणी, ग्रामविकास, आदिवासी विकास व समाज कल्याण विभागाचा १५ हजार कोटींचा अनुशेषही भरून निघालेला नाही.

महाराष्ट्र राज्य दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर असून, राज्याचे महसुली उत्पन्न ५ लाख ६० हजार ९५३ कोटी असून वर्षाचा खर्च भागविण्याकरिता ६ लाख, ६ हजार ८५५ कोटी रुपए लागणार आहे. राज्याचा अर्थसंकल्प ४५ हजार, ८९२ कोटी रुपए तुटीचा असून राज्यावर कर्जाचा डोंगर ७ लाख ८२ हजार कोटी रूपयांचा आहे. व्याजादाखल वर्षाला ५६ हजार ७२७ कोटी रुपए मोजावे लागणार आहे. अशी राज्याची आर्थिक स्थिती असतानाही राज्यानी तूर्तास १३ हजार कोटीचे कर्ज घेतले असून १.३२ लाख कोटी नवे कर्ज घेण्याकरिता केंद्र सरकारकडे परवानगी मागितली आहे. हा तर राज्य दिवाळखोरीत निघाल्याचा ताजा पुरावा आहे. १३ मे रोजी दुपारी १ वाजता विदर्भ चंडिका, शहीद चौक, नागपूर येथून विदर्भ संकल्प पदयात्रा कट्टर विदर्भवादी नेते बाबा शेळके, सुनील चोखारे, मुकेश मासुरकर यांच्या नेतृत्वात ४० विदर्भवादी सहकाऱ्यांसह निघणार असून ती नागपूर जिल्हा, वर्धा जिल्हा व अमरावती जिल्ह्यातील ग्रामीण भागातून जाऊन जनजागृती करून विदर्भावरील अन्यायाची गाथा गावागावातील सामान्य माणसापर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न करणार आहे.

# हमास समर्थनाचे पोस्ट वाटणाऱ्या तरुणांना जमावाची मारहाण

**■ महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. ११ :**
पुण्यातील कर्वेनगर परिसरात वादग्रस्त संघटनेच्या समर्थनार्थ पोस्टर वाटणाऱ्या काही तरुणांना स्थानिक नागरिकांनी मारहाण केल्याची घटना रविवारी घडली आहे. या घटनेमुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. या घटनेचा व्हिडिओ आता सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार पुण्यातील कर्वेनगर परिसरात हमासच्या समर्थनार्थ काही तरुण पोस्टर वाटत होते. स्थानिक नागरिकांच्या हे लक्षात येताच त्यांनी त्या तरुणांना विरोध केला. त्यानंतर त्या तरुणांना जमावाने चांगलाच चोप दिला. तसेच त्याचे व्हिडिओ रेकॉर्डिंग करून ते सोशल मीडियावर देखील शेअर करण्यात आले. याप्रकरणी पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप करून संबंधित तरुणांना ताब्यात घेतले आहे. तसेच त्यांची चौकशी करण्यात येत आहे. या प्रकरणाची गंभीर दाखल घेत पोलिसांनी या तरुणांचा नेमका हेतू काय होता? याचा तपास पोलिसांकडून केला जात आहे. या प्रकरणी तरुणांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे. मात्र कोणत्याही प्रकारच्या सामाजिक तेढ निर्माण करणाऱ्या कृतीला सोडले जाणार नाही, अशा शब्दात पोलिसांनी दोन्ही बाजूंना सांगत वातावरण शांत करण्याचा प्रयत्न केला आहे.

# तुर्की आणि अझरबैजानचे पर्यटन बुकिंग करू नये
## टीएएआयचे आवाहन, भारताविरोधी भूमिका घेतल्याने निर्णय

**■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ११**
नागपूर ट्रॅव्हल एजंट्स असोसिएशन ऑफ इंडियाने तुर्की आणि अझरबैजान या दोन पाक समर्थक राष्ट्रांमध्ये पर्यटनासाठी बुकिंग करू नये, असे आवाहन केले आहे. असोसिएशनच्या विदर्भ चॅप्टरकडूनही या दोन देशांसाठी बुकींग न करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. भारत सरकारने पाकिस्तानला समर्थन देणाऱ्या या दोन राष्ट्रांविरुद्ध कठोर भूमिका घेतली आहे आणि त्यांच्यासोबतचे संबंध तोडण्याचा निर्णय घेतला आहे. ट्रॅव्हल एजंट्स असोसिएशन ऑफ इंडियाने या निर्णयाची घोषणा केली आहे आणि देशभरातील एजंट्सना तुर्की आणि अझरबैजानला जाण्यासाठी बुकिंग न घेण्याचा सल्ला दिला आहे. इतर अनेक भारतीय कंपन्यांनी देखील या दोन राष्ट्रांसोबतचे संबंध तोडण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे, या दोन राष्ट्रांमध्ये पर्यटनासाठी जाणाऱ्या नागरिकांची संख्या कमी होण्याची शक्यता आहे.

दहशतवादाला पाठिंबा देणाऱ्या कोणत्याही देशाकडून किंवा त्यांच्यासोबत व्यवसाय करण्यास नकार द्या, न्याय, सुरक्षा आणि जबाबदारीसाठी आवाज उठवा, संकटाच्या वेळी भारत आणि भारतीय एक आहेत, हे जगाला दाखवून देऊ असे विदर्भ चॅप्टरने म्हटले आहे. पर्यटन नेहमीच शांतीचा संदेशवाहक राहिले आहे. पण व्यवसायापूर्वी देशभक्ती येते. आणि जेव्हा आपला देश युद्ध सुरू करतो. तेव्हा प्रसंगी व्यावसायिक हित बाजूला ठेवून देश म्हणून एकत्र येणे आवश्यक ठरते. कागाळ्या करणाऱ्या पाकिस्तानला उघड समर्थन देणाऱ्या देशांका आपण विसरणार नाही आणि क्षमा करणार नाही असे विदर्भ चॅप्टरने म्हटले आहे.

# नागपूर रेल्वे विभागाकडून ऐतिहासिक विहिरीची स्वच्छता

**■ महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. ११ :**
मोतीबाग येथील २०० वर्षे जुन्या ऐतिहासिक महाकाय विहिरीच्या स्वच्छतेचे काम नुकतेच आग्नेय मध्य रेल्वे नागपूर विभागाने मोठ्या उत्साहात सुरू केले. वर्षानुवर्षे दुर्लक्षित असलेली ही विहीर, जी एकेकाळी स्थानिक पाणीपुरवठ्याचा मुख्य स्त्रोत होती, ती आता जीर्ण अवस्थेत पोहोचली आहे. झेडआरयूसीसीचे माजी सदस्य डॉ. प्रवीण डबली यांनी ही विहीर स्वच्छ करण्यासाठी बरेच वर्ष प्रयत्न केले. त्यानंतर रेल्वेने ते पुनरुज्जीवित करण्याच्या दिशेने पहिले पाऊल उचलले - परंतु प्रयत्न अपयशी ठरत असल्याचे दिसून येत आहे.



आतापर्यंत, स्वच्छता प्रक्रियेचा भाग म्हणून लाखो लिटर पाणी विहिरीतून काढण्यात आले आहे. पाणी काढून टाकण्यामागील उद्देश तळाशी साचलेला कचरा आणि गाळ साफ करणे हा होता. पण वास्तव असे आहे की आतापर्यंत फक्त पाणीच बाहेर काढण्यात आले आहे, तर तळाशी साचलेला प्लास्टिक, चिखल, दगड आणि इतर घनकचरा तसाच पडून आहे. बाहेर काढण्याचा प्रयत्नही केला गेला नाही.

स्वच्छता मोहिमेच्या सुरुवातीच्या काही दिवसांत, यंत्रे आणि कामगारांची मोठ्या प्रमाणात तैनाती होती. पण गेल्या १० दिवसांपासून हे संपूर्ण काम अचानक बंद पडले आहे. पाणी बाहेर काढण्याचे काम सुरू नाही, आत जाऊन कचरा काढण्याचा प्रयत्न केला जात नाहीये. त्यामुळे मान्सूनपूर्व साफसफाई पूर्ण होण्याची अपेक्षा कमी झाली आहे. स्थानिकांच्या मते, क्दह विभागाने दोन 6 HP चे पंप काढून टाकले आहेत आणि कोणतीही प्रगती झालेली नाही.

नागपूरसारख्या शहरात पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे, तिथे लाखो लिटर पाण्याचा अपव्यय हा पर्यावरणवादी आणि सामाजिक कार्यकर्त्यांसाठी चिंतेचा विषय बनला आहे. अनेक संघटनांनी याला जलसंपत्तीचा 'अवास्तव अपव्यय' म्हटले आहे. ते म्हणतात की जर संपूर्ण स्वच्छता योजना आगाऊ तयार केली नाही, तर फक्त पाणी काढून टाकणे म्हणजे संसाधनांचा अपव्यय ठरेल. तसेच, या कडक उन्हात शहरातील झाडांना पाणी देण्यासाठी या विहिरीतील ८० ते ९० लाख लिटर पाणी वापरले जाऊ शकले असते. शहरातील रस्त्यांवरील दुभाजकांवर लावलेल्या झाडांना नाल्यातून पाणी आणून पाणी दिले जात आहे हे लक्षात घ्यावे. अशा परिस्थितीत या विहिरीतून निघणारे पाणी टँकरद्वारे झाडांना पुरवता येईल. पण महानगरपालिका किंवा रेल्वेच्या कोणत्याही अधिकाऱ्याने याची दखल घेतली नाही. या संपूर्ण घटनेवर नागपूर रेल्वे विभागाकडून अद्याप कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया आलेली नाही. तथापि, काही अधिकाऱ्यांनी नाव न सांगण्याच्या अटीवर सांगितले की, कंत्राटदारासोबतच्या करारात काही तांत्रिक अडचणी आल्या आहेत, ज्या सोडवण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत.

स्थानिक रहिवाशांचे म्हणणे आहे की रेल्वेने या ऐतिहासिक विहिरीच्या स्वच्छतेच्या नावाखाली फक्त ढोंग केले. "जर तुम्हाला काम अपूर्ण सोडायचे होते, तर तुम्ही ते का सुरू केले?" एका वृद्ध रहिवाशाने प्रश्न उपस्थित केला. या विहिरीची स्वच्छता करण्यासाठी प्रयत्न करणारे डॉ. प्रवीण डबली आणि स्थानिक नागरिकांचीही मागणी आहे की रेल्वेने याबाबत स्पष्ट अहवाल द्यावा आणि पुन्हा संपूर्ण स्वच्छता काम सुरू करावे आणि पावसाळ्यापूर्वी ते लवकरात लवकर पूर्ण करावे.

डॉ. प्रवीण डबली म्हणाले की, ऐतिहासिक आणि पर्यावरणीय दृष्टिकोनातून महत्त्वाची असलेली ही विहीर जर पूर्ण प्रामाणिकपणाने आणि धोरणात्मक पद्धतीने स्वच्छ केली असती तर ती नागपूर शहरासाठी एक मोठी कामगिरी ठरू शकली असती. सध्या, हे प्रयत्न अर्धवट राहिले.

# खासगी बस व ट्रकच्या धडकेत २ महिलांसह ३ जण ठार

**■ महासागर प्रतिनिधी सातारा, दि. ११ :**
उज्जैनला देवदर्शनासाठी जाणाऱ्या भाविकांच्या खासगी बसला भीषण अपघात झाला आहे. त्यात २ महिलांसह ३ जण ठार झालेत. ही घटना रविवारी पहाटे २.३० च्या सुमारास साताऱ्याच्या फलटण तालुक्यात घडली आहे.

यासंबंधीच्या माहितीनुसार, इचलकरंजी येथील एक खासगी बस (एमएच०४ सीपी २४५२) काही भाविक महिलांना घेऊन उज्जैन येथे देवदर्शनासाठी निघाली होती. ही बस शनिवारी रात्री वाठार स्टेशन मार्गे सालपे घाट उतरून लोणंदच्या दिशेने जात होती. ती बिरोबा मंदिराजवळ आली असता लोणंदहून साताऱ्याकडे जाणाऱ्या ट्रकने (एमएच ४२ बीएफ ७७८४) तिला जोराची धडक दिली. त्यात बस चालक सलमान इम्तियाज सय्यद (२४, रा. मालबाग पाटील गल्ली, शिरढोण, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर) व रजनी संजय दुगुळे (४८, रा. पेठ वडगाव ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर) हे दोघे जागीच ठर झाले. तर अन्य एका गंभीर जखमी महिलेचा सातारा सिव्हिल रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला.

या घटनेनंतर सालपे ग्रामस्थांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेऊन भाविकांना मदत करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी लोणंद पोलिसांनीही ही गोष्ट कळवली. त्यानंतर पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी पोहोचून जखमींना लोणंद स्थित खासगी रुग्णालयात दाखल केले.